# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. विशेष महासभा दि. १३/०८/२०२०**

आज गुरुवार दि. १३/०८/२०२० रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.३० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. ०४/०८/२०२० रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ४) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ५) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ६) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ७) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ८) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ९) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १०) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १४) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १५) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १६) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| १९) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २०) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २१) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २२) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २३) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २४) | जैन गीता भरत | सदस्या |
| २५) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २६) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २७) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |
| २८) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| २९) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३०) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३१) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३२) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३३) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ३४) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३५) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३६) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३७) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३८) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ३९) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४०) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ४१) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४२) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४३) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४४) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ४५) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४६) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४७) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ४८) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ४९) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५०) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५१) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५२) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५३) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५४) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ५५) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ५६) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ५७) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ५८) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ५९) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६०) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६१) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६२) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६३) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६४) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ६५) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ६६) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६७) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ६८) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ६९) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७०) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७१) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७२) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ७३) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ७४) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ७५) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ७६) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ७७) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ७८) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ७९) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |

गैरहजर सदस्य -

| | | |
|---|---|---|
| १) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| २) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| ३) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| ४) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ५) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ७) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ८) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ९) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| १०) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ११) | भोईर भावना राजू | सदस्या |
| १२) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| १३) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| १४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| १५) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

रजेचा अर्ज - निरंक

**नगरसचिव :-**

**मिरा भाईदर महानगपालिकेच्या इतिहासातील पहिली महासभा आपण आज ऑनलाईन घेणार आहोत. ह्या ऑनलाईन सभेकरीता सर्व सन्मा . सदस्यांचे महानगरपालि कच्या पदाधिका -याचे, मा. आयुक्त साहेब, मा. अतिरिक्त आयुक्त साहेब ह्यांचे ह्याठिकाणी स्वागत आहे. सभेच्या कामकाजाला सुरूवात करू या. मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा गुरुवार दि. १३/०८/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी Video Conferencing द्वारे आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा . सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती . आजच्या सभेच्या कामकाजा ला सुरूवात करण्यापूर्वी काही सुचना आहेत . त्या मी पून्हा एकदा वाचून दाखवतो. सन्मा. सदस्यांना सभेत बोलावयाचे असेल तेव्हा more मध्ये request hand बटनावर क्लिक करावे. त्यामूळे मा. महापौर ह्यांना समजेल की आपणास बोलावयाचे आहे किंवा आपला हात वर करावा. तसेच मा. महापौर ह्यांच्या परवानगीने बोलावे कृपया सभेला जॉईन्ट होण्यासाठी हेड फोनचा वापर करावा. सन्मा. पालिका सदस्यांना पाठविण्यात आलेली लिंक कोणत्याही व्यक्तिस शेयर करू नये. लॉगआऊट झाल्यास सभेमध्ये पून्हा सहभागी होण्यासाठी यूझर आयडी व पासवर्डचा वापर करावा. काही तांत्रिक अडचण असल्यास आपणास जे नंबर मिळाले आहेत त्यावर संपर्क करावा.**

आजच्या विशेष महासभेच्या दिवशी मा. सभापती महोदय, सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रक सभागृहापूढे सादर करीत आहेत. ते. मा. महापौराकडे सादर करतील. प्रकरण क्र. ८, परिवहन सेवेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २०/०३/२०२० रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १५९, ठराव क्र. १३२) प्रकरण क्र. ९, अग्निशमन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदा जपत्रकास मंजूरी मिळणेबाबत . (मा. स्थायी समिती सभा दि . २०/०३/२०२० रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १६०, ठराव क्र. १३३) प्रकरण क्र. १० मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत . ("अ" + "क" + "महिला व बाल कल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण") (मा. स्थायी समिती सभा दि. २०/०३/२०२० रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १६१, ठराव क्र. १३४)

मा. स्थायी समिती सभापती अशोक तिवारीनी सभागृहापूढे अंदाजपत्रक मान्यतेसाठी सादर करीत आहोत.

मा. महापौर :-

सचिव साहेब विषयाला सुरूवात करावी.

नगरसचिव:-

सभापती महोदय आपले मनोगत सादर करीत आहेत.

मा. सभापती :-

मिरा भाईदर शहर मे बहूत सारे बांधकाम डिपार्टमेन्ट के पाणी डिपार्टमेन्ट के बहोत सारे इस बार के बजेट है । काम लिए गए है और उसको इस साल पुरा किया जाऐगा अभी नाम लेने से बहोत सारे नाम है । बडे बडे कमसे कम ४०-५० काम है । बांधकाम डिपार्टमेन्ट में आर सी सी, रस्ता, पानी डिपार्टमेन्ट मिरा भाईदर तक पानी पहूचाना इस साल के बजेट में सब कुछ लिया गया है । और अधिकारीयोसे मैं उम्मीद करता हूॅ की कोव्हिड रहने के बाद भी काम करके इस साल का पुरा काम करने की कोशिश करेंगे ।

मा. महापौर :-

स्थायी समिती सभापती तिवारी साहेब ह्यांनी ह्या ठिकाणी आपले निवेदन केलेले आहे. ज्या सन्मा. नगरसेवकांना आपले मत मांडायचे असेल कृपया त्यांनी हात वर करायचा आहे. तत्पूर्वी सचिव साहेब काही सुचना देणार आहेत.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ८, परिवहन सेवेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २०/०३/२०२० रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १५९, ठराव क्र. १३२)

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य धृवकिशोर ह्यांना मी परवानगी देते.

धृवकिशोर पाटील :-

मा. महापौर मॅडम आजच्या विषयपत्रिकेमध्ये ३ विषय आहेत. प्रकरण क्र. ८,९,१० तसेच "ज" प्रस्ताव सुध्दा टाकलेले आहेत. तर ते "ज" चे प्रस्ताव आणि हे एकत्र घेतल्यास सोयीचे होईल. कारण की परिवहन सेवेतील जे अंदाजपत्रकास आपण जी चर्चा करणार आहोत पुरक घोषणेमध्ये सुध्दा सेवेचे जे बजेट आहे. त्याच्यामध्ये आपल्याला काही चेंजेस करायचे आहेत. म्हणून दोन्ही विषय एकत्र घेतले आणि त्याप्रमाणे अग्निशमन आणि मूळ अंदाजपत्रकातले दोन्ही विषय एकत्र घेतले तर मॅडम सोईचे होईल अशी माझी आपणास विनंती आहे.

**मा. महापौर :-**

दोन्ही विषय एकत्र घेण्यास मी परवानगी देत आहे.

**नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिकारी ह्यांनी विषय पत्रिकेवरील मुळ प्रस्ताव व त्याचे सह पुरवणी विषय पत्रिकेवरील प्रस्ताव हे एकत्र करून ह्यावर चर्चा करण्यास मान्यता दिलेली आहे . मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा गुरुवार दि. १३/०८/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता Video Conferencing द्वारे आयोजित करण्यात आलेली आहे . तरी Video Conferencing द्वारे आयोजित महासभेमध्ये सर्व सन्मा . सदस्यांनी सहभाग घ्यावा हि विनंती . ह्या सभेकरीता पूरवणी विषय पत्रिका आलेली आहे . त्या विषय पत्रिकेवरील प्रकरण क्र . ८ संबधीत जो विषय आहे . सन्मा. सदस्य श्री. सुरेश खंडेलवाल यांनी दि. ७-८-२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव प्रकरण क्र . ८, परिवहन सेवेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २०/०३/२०२० रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १५९, ठराव क्र. १३२) ह्या दोन्ही प्रकरणावर एकत्रित चर्चा करायची आहे.

**मा. महापौर :-**

चर्चेला सुरूवात करावयाची आहे. उपमहापौर गेहलोत सोहेब ह्यांना मी बोलण्याची परवानगी देत आहे.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने सभी सदस्योको मेरा नमस्कार महापौर मॅडम आपने जो परमिशन दि उसके लिये आपका शुक्रगूजार हू । सबसे पहले इस महापालिका प्रशासनद्वारा यह जो ऑनलाईन मिटींग कि गई है । उसके लिए सब अधिकारीयोंका धन्यवाद काम चलना चाहिए यह हमारे मुख्यमंत्रीजी ने भी कहा है साथही साथ शहर के विकास के लिए चर्चा के लिए आगे बढना चाहिए । महापौर मॅडम मेरी एक सुचना है की आनेवाले जो टॅक्स के बारे में मैने पत्र भी आपको लिखा था जिसमें मैने मागणी रखी थी शहर के हित के लिये यह जो कोरोना के वजह से हमारे शहर का जो हाल हूवा है उसमे काफी लोगो को नुकसान पहूचा है । चाहे वो आर्थिक हो, मानसिक हो या शाररिक हो हम मानसिक तौर पे या शारिरिक तौर पे मदत नही कर पा रहे है । लेकिन मेरी ऐसी इच्छा है महानगरपालिकाद्वारा हम आर्थिक तौर पर हम उनको मदत कर सकते है । जिस तरीके से महानगरपालिका जो टॅक्स प्रणाली है हम जो टॅक्स लेते है । प्रॉपर्टी टॅक्स उसके अंदर हम उनको थोडासा सहयोग करे ताकी उनको कमसे कम थोडी सी हम मदत कर सके । मदत करना अर्निवार्य इसके लिए भी है की जनता हमारे साथ है और यह महानगरपालिका की उनकी है तो हमारे दिलसे फर्ज बनता है की कमसे कम हम उनको थोडासा आधार लगे । हम उसके कटौती के तौर पर टॅक्स के प्रणाली के अंदर लोगोको छूट देने के तौर पर कर सकते है । तकरीबन हमने जो स्टडीज किया हूवा है सभी पार्टीसे मिल के पदाधिकारीयोसे मिलके तो इच्छा यह है की ५० प्रतिशद सामान्य करके अंदर छूट दिया है और साथही बाकीका जो प्रॉपर्टी टॅक्स है जो पेडिंग है जो बकाया है जिसके अंदर काफी करोड तक का राशी आनी बाकी है याने की किसीका किसी कारणवश आ नही पा रही है तो उसमें भी मेरी सुचना है की लोगो का मुल के अंदर नही लेकीन इंट्रेस के अंदर या फिर उसके टॅक्स के अंदर जो पॅनल्टीज लगाई गई है या इंट्रेस या बॅड लगाया गया है उसके अंदर पूरी तरह से छूट दिजीए । ताकी लोगो को भरने में सुविधा हो । और वो इनडायरेक्टली महानगरपालिका के अंदर उसकी रेव्हेन्यू यानी आर्थिक कोष भी बढ सकते है , बहूत सारी उसके अंदर सुचना भी ऐसी है लागो की टॅक्स जो लगे हूए है उसके अंदर पॅनल्टीज या व्याज है वो किसीन किसी कारणवश लगे हूए है जिसका अभीतक निवारण या उसका फलपूर्वक निकाला नही गया है । तो अगर इसमे छूट दि जाती है व्याज के अंदर, पॅनल्टीज के अंदर बकाया राशी है जुनी उसके अंदर छुट दिया जाता है तो कमसे कम

उनको इस मौहोल के अंदर छूट दिया जाता है । तो कमसे कम उनको इस माहोल के अंदर इस कोरोना परिस्थिती के अंदर उनको मदतगार होगा । और साथ में हमारे जो रिकव्हरी है मेरी ऐसी उम्मीद है की वो भी बढने के चान्सेस है । और हम शहर के प्रति बना सकते है । लोगो को महानगरपालिका आपकी है महानगरपालिका आपके हित के बारे में सोचती है जानती है । किधर न किधर महानगरपालिका उसके बदौलत ही चलती है । तो हमारा दिल करता है की उनके लिए थोडीसी सवलत होनी चाहिए । यह मेरी सुचना है ।

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ८ चे मी वाचन केलेले होते . तथापि पुरक घोषणेमध्ये प्रकरण क्र . ११,१२,१३,१४ असे चार पुरक घोषणा आहेत . पूरक घोषणा क्र . ११ मध्ये सन्मा. जुबेर इनामदार ह्यांनी प्रस्ताव दिलेला आहे. ते प्रकरण क्र. १० करीता आहे. प्रकरण क्र. १२ सन्मा. सदस्य सुरेश खंडेलवाल यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे तो प्रकरण क्र . ८ करीता आहे. प्रकरण क्र. १३ सन्मा. सदस्य राकेश शहा यांनी दिलेला प्रस्ताव आहे. तो प्रकरण क्र. ९ करीता आहे. आणि सन्मा. धृवकिशोर पाटील ह्यांनी दिलेला पुरक घोषणेचा प्रस्ताव आहे तो प्रकरण क्र . १० करिता आहे. आता प्रकरण क्र.८ चे आपण वाचन केलेले आहे. आणि तो परिवहन सेवेचा आहे आणि प्रकरण क्र .१२ हे सन्मा. सदस्य श्री. सुरेश खंडेलवाल यांनी प्रकरण क्र.८ करीता दिलेले आहे. हे दोन्ही एकत्र करून त्या च्यावरती चर्चा आयोजित करून त्यावर निर्णय घेण्यासाठी मा. महापौरानी एकत्रिकरण चर्चा करण्यासाठी धृवकिशोर पाटील यांनी सुचना दिलेली आहे. त्या सुचनेला ह्या सभेत उपस्थित असलेले सर्व सदस्यांची मान्यता आहे का ? कारण तसा क्रम बदलूनच ती चर्चा येणार आहेत कारण हा क्रम बदलण्यासाठी सर्व सभागृहाची मान्यता आहे का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य इनामदार साहेब तुम्हीच मान्यता देत नाही बाकी सर्वानी मान्यता दिलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम प्रथमत: पहिलाच जो तुम्ही प्रस्ताव घेतला त्याच्यामध्ये हा क्रम बदलायचा असेल तुम्हाला सभाशास्त्र नियमाप्रमाणे सभागृहाची मान्यता पाहिजे . सचिव महोदय तुम्हाला ह्याची जाणीव नव्हती ह्याची माहिती महापौराना दिली नाही का ? आयुक्त महोदय तुम्ही ह्या सभेमध्ये बसाल तर मेहरबानी करून हा विषय तुमच्या निदर्शनास आणून घ्या . सभाशास्त्र नियम स्पष्ट आहे कोणताही क्रम बदलायचा असेल विषयपत्रिकेवरचा तर सभागृहाची मान्यता त्याला लागते . हसमूख गेहलोतजी असे करता येत नाही. आपला कायदा चालत नाही. इथे मोगलशाही नाही तुम्ही आधी जो विषय केला त्याच्यात तुम्ही क्रम बदलला क्रम बदलताना तुम्ही सभेची मान्यता घेतली का?

**मा. महापौर :-**

इनामदार साहेब सचिव साहेबांनी तुम्हाला मान्यता द्यायची की नाही सभागृहाला असे आता सांगितले.

**जुबेर इनामदार :-**

ह्याच्या आधी तुम्ही एक विषय घेतला तो सभा शास्त्रा प्रमाणे अधिकृत आहे की अनधिकृत आहे?.

**मा. महापौर :-**

विषय अजून चालू केलेला नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही पहिला विषय घेतला ना.

**मा. महापौर :-**

घेतला नाही.

**जुबेर इनामदार :-**

विषय सचिवांनी वाचला.

**मा. महापौर :-**

फक्त वाचला.

**जुबेर इनामदार :-**

वाचला म्हणजे तसाच वाचला ना एकत्र करूया महापौर मॅडम माझी तुम्हाला विनंती आहे सर्वांना तुम्ही अनम्यूट केलात . सभा कामकाज चालवण्यासाठी कारण व्हिडियो कॉन्फरन्सवर भरपूर अडचण असणार आहे . पक्षांच्या गटनेत्यांना तुम्हाला अनम्यूट करून ठेवावे लागणार आहे . नाहीतर तुम्हाला उपमहापौराना पण अनम्यूट करायला पाहिजे. कारण सभा कामकाज फक्त महापौरच चालवू शकतो. उपमहापौराना अधिकार नाही . आपल्याला कमीत कमी गटनेत्याना तुम्हाला अनम्यूट करून ठेवावे लागेल कारण पक्षाचे प्रतोतय आहेत. व्हिडियो कॉन्फरन्सवर मिटींग चालवायची असेल तर काही सोयी तुम्हाला उपलब्ध करून द्याव्या लागतील.

**मा. महापौर :-**

तुम्हाला आम्ही बोलायची संधी दिलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम बरोबर आहे आता असा प्रकार अधुन मधून घडला आम्हाला त्याच्यामध्ये सुधार तर करून द्याव्या लागतील.

**मा. महापौर :-**

तुम्हाला बोलायची संधी दिलेली आहे तुम्ही बोला.

**जुबेर इनामदार :-**

मी सचिवांना विनंती करेन आपले जे आय टी सेक्टरला विचारा हे वरच्या क्रमांकावर पहिल्या महापौराच्या रांगेमध्ये महापौर , उपमहापौर प्रशासनाचा अधिकारी वरती नाही दिसत नाही पहिल्या पानावर तर हे पाहिल्या पानावरती येऊ शकतात का ? कारण मोठा अधिकारी वर्ग आपल्या सोबत आहे. आम्हाला फक्त सचिव दिसत आहेत. आयुक्त साहेब सभा सोडून गेले आहेत का?

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेबांना व्हिसी आहे म्हणून आयुक्त साहेब माझी परवानगी घेऊन सभेतून थोड्या वेळासाठी गेलेले आहेत . त्यांनी त्यांच्या जागी अतिरिक्त आयुक्त वरूडकर साहेब यांना आपल्या सभेसाठी स्थानापन्न केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय ह्या विषयामध्ये तुमची काय सुचना आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही तुमचे मत मांडा.

**जुबेर इनामदार :-**

माझे मत असे आहे खरतर सभागृहाची मान्यता घेतली पाहिजे. मताने घ्यावी लागते.

**मा. महापौर :-**

बहूमताने घ्यावा लागेल तुमचे एकट्याचे मत नाही असे आत दिसले.

**जुबेर इनामदार :-**

माझे एकट्याचे मत नाही माझा पक्षाचे मी पक्षाच्या वतीने बोलत आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे इनामदार साहेब.

जुबेर इनामदार :-

सेनाच्या गटनेत्यांना विचारले का? तेही प्रतोत आहेत.

मा. महापौर :-

सचिव साहेब मान्यता घेण्याची प्रक्रिया.

जुबेर इनामदार :-

संपूर्ण प्रक्रिया करा. कमीत कमी प्रतोतांना विचारा त्याला येऊ द्या मिनिट्स मध्ये येऊ द्या.

नगरसचिव :-

मी ह्या पूर्वीच प्रकरण क्र . ८ वाचले आहे. त्यासोबत प्रकरण क्र. १२ हे संलग्नपणे वाचन करून त्यावरती चर्चा करण्यासाठी कोणाची काही हरकत आहे का ? ह्यावर सभागृहाचे काय मत आहे. ह्यासाठी मी आवाहन केलेले आहे. त्यावर आपण हात वर केल्यामूळे महापौर मॅडमनी आपल्यालाच बोलण्याची संधी दिलेली होती . अजून कोणाची ह्यास काही हरकत आहे का ? कारण ह्यानुसारच आपल्याला चर्चा करण्यासाठी चर्चा करायची असेल तर एकत्रीत पणे विषयावरती दोन्ही प्रकरणे एकत्र केले तरच चर्चा हाऊ शक ते. प्रकरण क्र. ८ परिवहन सेवेचे सुधारीत अंदाजपत्रकाचे आहे . ह्याच्यासह विषय पुरक घोषणेमधील प्रकरण क्र. १२ सुरेश खंडेलवाल यांनी मांडलेला प्रस्ताव आहे . त्यावर एकत्र चर्चा करून त्यावर विचार विनिमय करून निर्णय घेण्याकरीता सभागृहाची मान्यता साठी मी आवाहन केलेले होते त्याला अनुसरून सन्मा . सदस्य गटनेता जुबेर इनामदार ह्यांनी हरकत घेतल्यामुळे मा . महापौरानी त्याच्याव रती त्यांना त्यांचे मत मांडण्यासाठी संधी दिलेली आहे . त्या व्यतिरिक्त आणि कोणाची हरकत आहे का? अनुक्रमांक आपण पुढे घेतो त्याच्या शिवाय चर्चा करताच येणार नाही जर ह्याला मान्यता मिळाली नाही.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील साहेबांना काहीतरी सुचना करायची आहे.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम ही एक प्रथा असते की आजची बजेटची मिटींग आहे . बजेटच्या मिटींगमध्ये प्रशासनाने आपल्याला तीन प्रकरण दिलेली आहेत . एक परिवहन सभेचे बजेट आहे एक अग्निशमन विभागाचे बजेट आहे . एक महानगरपालिकेचे बजेट आहे . आणि ह्याच बजेटमध्ये "ज" चे प्रस्ताव आलेले आहेत. जर आपण हे "ज" चे प्रस्ताव एकत्रित करून घेतले तरच आपण ह्या बजेटमध्ये चर्चा करू शकतो. आणि तरच ह्या बजेटमध्ये आपण थोडीशी फेरफार करू शकतो . ज्या प्रमाणे सन्मा . सदस्य जुबेर ईनामदार यांनी आपल्याला "ज" प्रस्ताव दिलेला आहे. प्रकरण क्र. ११ हा त्यांचा विषय आहे. मग मुळ बजेट मध्ये जर हे प्रकरण आपण एकत्रितपणे चर्चा केली तरच ही चर्चा होऊ शकते . अन्यथा चर्चा केली तरच ही चर्चा होऊ शकत नाही . ही आता पासूनची प्रथा नाही पहिल्या पासूनची प्रथा आहे. प्रत्येक वर्षीचा अर्थ संकल्पीय अंदाजपत्रकामध्ये आपण वारंवा र "ज" चे प्रस्ताव देतो. आणि त्याप्रमाणे आपण त्याच्यामध्ये थोडे फार चेंजेस करतो . म्हणून माझी आपणास विनंती आहे की , सगळ्यांनी आपल्याला बहुमताने मंजूरी दिलेली आहे. त्याच्यामुळे प्रकरण क्र. ८ आणि प्रकरण क्र. १२ हे एकत्रित घेण्यात यावे. आणि एकत्रित घेतले तरच हे पॉसिबल होणार नाही.

मा. महापौर :-

प्रकरण क्र. ८, ९ व प्रकरण क्र. १२ एकत्रित घेण्याकरीता मी मान्यता देत आहे. विषयावरती कोणाला चर्चा करायची असेल तर त्यांनी हात वर करावे.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम प्रकरण क्र . ८ मधील परिवहन सेवेबाबत बजेटची चर्चा ह्या ठिकाणी आपण करत आहोत परिवहन सेवा..........

मा. महापौर :-

सन्मा. नगरसेविका निलम ढवण ताई ह्यांना मी परवानगी देते त्यांनी बोलायचे आहे.

निलम ढवण :-

महापौर मॅडम मी पहिल्यांदा हे विचारते की मी सुरूवात स्क्रिन लावलेल्या आहेत त्या स्क्रिनवर हात वरती करा म्हणून मघाशी सांगि तले उपमहापौरानी सुचना दिल्या . मी राष्ट्रगीत झाल्यापासून हात वर केलेला आहे. माझा आवाज म्यूट करून ठेवला. जुबेर साहेबांनी बरोबर सांगितले तुम्ही गटनेत्यांना पण सूरूवातीपासून बोलायला देत नसाल तर काय फायदा . आणि फक्त तुम च्या नगरसेवकांना बोलायला देता प हिला माझा शो क संदेश होता. सन्मा. सदस्य कदाचित तुम्हाला विसर पडला असेल पण आमचे शिवसेना पक्षाचे आमचे सहकारी कै . हरिश्चंद्र आमगावर ह्यांचे कोरोनामध्ये दुदैवी निधन झाले त्यांचा एक शोकप्रस्ताव सुरूवातीला करून पाच मिनिटांसाठी सभा तहकूब करता आली नाही. त्यासाठी मी सुरूवातीपासून हात वर केलेला होता मला बोलायला पण संधी दिलेली नाही. ह्याचा विसर सभागृहाला कसा पडला . महापौर ह्या नात्याने तुमच्या सुध्दा हे लक्षात आले पाहिजे होते. आपल्या सदस्यांचा दुदैवी अंत झालेला आहे . त्यांना श्रध्दांजली देऊन तुम्ही पाच मिनिट थांबू शकत नाही. राष्ट्रगीत झाल्यापासून मी हात वर केलेला आहे . हात वर करत असताना स्क्रिन वर दिसला नाही का ? माझा आवाज म्यूट करून ठेवला मी १० वेळा फोन केले सचिवांना आणि बाकीच्यांना निरोप द्यायला हे काय चालू आहे . दुसरी गोष्ट जुबेरजीनी प्रस्ताव ठेवला होता की गटनेत्यांना तरी बोलायला द्या म्हणून आमच्या सहकार्याचे तुम्हाला मेसेज आलेले आहेत तुम्ही एकमताने फक्त पास करत आहेत . आमचा आवाज म्यूट करून ठेवत असाल तर मग आम्हाला बोलवू नका. तुमच्या पध्दतीने तुम्ही सगळे निर्णय घेऊन मोकळे व्हा. आमचे आवाज म्यूट करू नका. आमचे गटनेता किंवा विरोधी पक्षनेता तिथे आहेत. मी १० वेळा हात वर केले तुम्ही स्क्रिन वर जर बघत असाल तर मला सुरूवातीलाच बोलायला दिले पाहिजे होते.

मा. महापौर :-

ताई तुम्ही जसा हात वरती केला तसे इतर सर्व सदस्यांनी पण हात वर केलेले होते.

निलम ढवण :-

गटनेता म्हणून मी तुम्हाला बोलत आहे . आणि दुसरी गोष्ट सन्मा . सभागृहाने किंवा सदस्यांनी तुम्ही महापौर ह्या नात्याने पहिल्यांदा आमचे कै . हरिश्चद्र आमगावकर माजी गटनेता आणि सभागृहाचे सदस्य त्यांना श्रध्दांजली वाहणे आपले काम होते पण आपल्याला विसर पड ला तरी मी त्याच्यांसाठी हात वर के ला होता सुरूवातीला गट नेत्याने हात वर कशाला केला आहे त्याची तरी विचारणा तुम्ही केली पाहिजे होती.

मा. महापौर :-

ताई श्रध्दांजली आपण सर्वांना देणार आहोत.

निलम ढवण :-

सर्वांना देणार म्हणजे सर्वांचे वेगळे आहे ह्या सभागृहाचा एक सदस्य आपल्यातून गेला आहे तेही ह्या दुदैवी कोरानानी अंत झालेला आहे.

मा. महापौर :-

ताई सभागृहाचे सदस्य आपले आमगांवकर साहेब गेल्याचे दु:ख आपल्या सर्वांनाच आहे.

निलम ढवण :-

सर्वांना आहे पण ही जी प्रथा आहे आपल्या सभागृहाने खर तर महासभा स्थगितच केली पाहिजे होती. तरी आम्ही म्हटलं बजेटची सभा आहे पण सुरूवातीला ५ मिनिटे तुम्ही गॅप घेऊन नंतर सभा चालू करू शकत होता . उद्या आम्ही कोणी गेलो सभागृहाचा एक कोणी एक सदस्य गेला तरी हेच होणार आहे का तसे नाही मॅडम.

मा. महापौर :-

ताई तुम्हाला माहितच असेल आपण ही महासभा आधी लावली होती पण आपले सन्मा . सदस्य श्री. हरिचंद्र आमगांवकर आणि आपले पत्रकार बंधू श्री . यतिन गोलतकर यांचे निधन झाले. त्यामुळे आपण ती सभा रद्द करून सभा आपण पुढे ढकलली तर ती सभा आज आपण घेत आहोत , आपल्या माहितीसाठी मी सांगते मिरा भाईंदर शहरामध्ये बरेचशे लोक जे कोरोनामुळे मृत्यु पावलेले आहेत आणि आपल्या महानगरपालिकेचे कर्मचारी सुध्दा मृत्यु पावलेले आहेत त्या सर्वांना आपल्याला श्रध्दांजली, आजची महासभा झाल्यानंतर आपण देणार आहोत.

निलम ढवण :-

तुम्ही श्रध्दांजली घेणार आहात मी त्याच्या बद्दल म्हणत नाही मागच्या वेळची सभा निमित्त झाले. श्री. हरिचंद्र आमगावकराचे आणि यांचे नाव पुढे ढकलले गेले ती सभा कशासाठी स्थगित केली गेली, रद्द केली गेली कोरोनामुळे एकत्रित सभा घ्यायला परमिशन मिळाली नाही म्हणून रद्द करण्यात आली त्याला नाव दिले गेले की, हरिचंद्र आमगावकर आणि यांच्यामध्ये पत्रकारांमुळे आपण त्यांना हे केले म्हणून.

मा. महापौर :-

नाही.

निलम ढवण :-

पण आता तुम्ही सभागृहात नाव घेऊन तुम्ही श्रध्दांजली वाहिली पाहिजे होती . सभागृहाचे सदस्य म्हणून बाकीच्यांना आपण देणारच आहोत.

मा. महापौर :-

ताई ह्या श्रध्दांजली नंतर सभा घेऊ शकणार नाही आहोत आणि बरेच दिवस झाले सभा आपण घेतलेली नव्हती. म्हणून आपण ही सभा आज घेत आहोत.

निलम ढवण :-

पाच मिनिटासाठी मॅडम एकतर ११ वा. ची सभा होती आता १२ वाजता चालू झाली. एक तास आपला गेला ५ मिनिट जर स्थगिती दिली असती तर आपण परत सभा घेतली असती तर काय बिघडले असते. ५ मिनिटासाठी आपण थांबू शकत नव्हतो का ? एक तास जर आपण हे जॉईंड करायला थांबतो ५ मिनिटासाठी आपण नाही थांबू शकलो नसतो.

मा. महापौर :-

ताई आपण सगळयांना श्रध्दांजली देणारच आहोत आपण ही सभा झाल्यांनतर देणार आहोत.

निलम ढवण :-

ठिक आहे, तुमचे आता विषय चालू झाले आहेत . मगाशी एक विषय आला होता जुबेर इनामदारजीनी सांगितले की , गटनेत्यांना तरी विश्वासात घ्या . आम्हाला आमच्या शिवसेना पक्षाचे विरोधी पक्षाचे पक्षनेत्यांना विश्वासात घेतले ना आम्हाला विश्वासात घेतले मी गटनेता म्हणून पण तुम्ही डायरेक्ट सगळ्यांना संमती आहे असे तुम्ही जाहिर केले . फक्त जुबेर इनामदारजीना बोलायला दिले. जुबेर इनामदरजीवर प्रेम जास्त आहे.

मा. महापौर :-

प्रेम सगळयांवरतीच आहे.

निलम ढवण :-

मॅडम मी इतका वेळ हा त वर करते, इतके फोन केले तर माझा आवाज शेवट पर्यंत म्यूट राहिला. त्यांचा सपोर्ट आहे म्हणून तुम्ही जाहिर केले.

मा. महापौर :-

असे नाही.

निलम ढवण :-

तुम्ही गटनेत्यांचा किंवा विरोधी पक्षनेत्यांचा माईक तरी चालू ठेवा . आम्ही गोंधळ तर नाही घालत आपण ऑफ लाईन विषय कळू देत आमची ही मते आम्हाला मांडता येऊ दया . शेवटी पक्ष आम्हाला विचारणार आहे, असे करू नका आणि जे क्रमवारी बदलायची ग रज काय आहे जे आहे ते क्रमवारीनुसार विषय घ्या ना. जर सेम विषय असेल तर ते दोन्ही एकत्र मर्ज करून तुम्ही तो विषय चालवा.

मा. महापौर :-

ताई ते दोन्ही विषय एकत्रि त करून आपण ही सभा चालवत आहोत . प्रकरण क्र. ०८ व प्रकरण क्र. १२ एकत्रित घेणेबाबतची सुचना सन्मा. सदस्या धृवकिशोर पाटील साहेबांनी दिलेली आहे त्या पध्दतीने आपण ते दोन्ही विषय एकत्रित आपण घेऊन त्या सभेला आता आपण सुरूवात करत आहोत. बजेटच्या संदर्भामध्ये नगरसचिव साहेबांनी प्रकरण क्र. वाचलेला आहे. ज्यांना बोलायचे असेल त्यांनी सुचना कराव्यात.

निलम ढवण :-

परिवहनच्या संदर्भात मी बोलू इच्छिते , परिवहन संदर्भात तुम्ही आता बजेट मंजूर करत आहात, ठिक आहे जे काही आहे त्या विषयावर आपण बोलतोय , पहिल्यांदा आधी परिवहन सेवा बंद आहे त्यासंदर्भात काय निर्णय झाला आहे ते पहिले आयुक्त साहेब किंवा उपायुक्त साहेब जे आता आहेत आणि आपण त्या संदर्भात आम्हाला जो निर्णय झाला आहे तो पहि ले आमच्या समोर ठेवा त्यानंतर आम्हाला बरेच ह्या संदर्भात प्रश्न आहे ते आम्हाला मांडायचे आहेत . परिवहन सेवा इतके दिवस बंद होती ती पहिले चालू करा म्हणून वेळोवेळी आम्ही आमदार साहेब , सगळयांनी विरोधी पक्षनेते आम्ही सगळ्यांनी शिष्ठूमंडळ वेळोवेळी कमिशनर साहेबांशी देखील बोलेले आहे. शेवट सोमवारी देखील आम्हाला सांगितले आज ते लोक इथे आलेले आहेत त्यांच्याशी आता बैठक झाली की , आम्ही आजच्या आज बस चालू करतोय मग अजूनपर्यंत ह्या शहराला वेठीस का धरले जात आहे ? सगळया नागरिकांना का वेठीस ध रले जात आहे? बस सेवा चालू झाली का, पहिले सांगा फक्त बजेट मंजूर करायचे ह्याला काही अर्थ नाही . बजेट नंतर मंजुर करा आपण त्या लोकांना बजेट मधून काय देत आहोत लोकांचे पैसे घेतलेले आहेत . लोकांचा टॅक्स रुपाने जो पैसा आपण घेतलेला आहे त्यातूनच तुम्ही सेवा देता ना. मग पहिले ती सेवा आपण लोकांना का देत आहात हे पहिले सगळ्यांच्या समोर येऊ दया.

मा. महापौर :-

ठिक आहे.

निलम ढवण :-

त्या संदर्भात काय निर्णय झालेलाआहे तो आम्हाला सांगा.

मा. महापौर :-

प्रशांत दळवी साहेबांनी हात वर केलेला आहे, तुम्हाला काही बोलायचे आहे का? मगाशी तुम्ही बोलू शकले नाही.

निलम ढवण :-

मॅडम, मी विचारले त्याचे उत्तर तर द्या.

**मा. महापौर :-**

सगळ्याचे उत्तर द्यायला मी सांगणार आहे. आयुक्त खुलासा करतील.

**निलम ढवण :-**

त्याच्या पुढचेही माझे प्रश्न आहेत ना . एकाचे तर बोलणे पूर्ण होऊ दया . नंतर दुसऱ्या सदस्याला बोलायला दया.

**मा. महापौर :-**

ताई तुमच्या प्रश्नाचे उत्तर देण्याकरिता आपले उपायुक्त अजित मुठे साहेब येत आहेत , तोपर्यंत प्रशांत दळवी साहेबांना बोलण्याची संधी देत आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, जसे आता निलम ढवण मॅडम यांनी सांगितले त्या प्रमाणे आपण म्हणालात की, उपायुक्त नाहीत. महापौर मॅडम उपायुक्त जर नसतील तर आम्ही चर्चा करून अर्थ काय माझे म्हणणे कोण ऐकणार, त्याला उत्तर कोण देणार म्हणून माझी विनंती असेल की....

**मा. महापौर :-**

उपायुक्त आलेले आहेत.

**प्रशांत दळवी :-**

उपायुक्त जर आलेले असतील तर उपायुक्तांना पहिला अनम्यू ट करा आणि त्यांना सांगायला सांगा की, परिवहन सेवा का बंद आहे? त्याच्याकडून आम्हाला खुलासा येऊ दया. नंतर आम्ही आमचे मुख्य मुद्दे मांडतो. प्रॉब्लेम काय आहे त्यांना नंतर सांगू. त्यांचे काय प्रश्न आहेत ते पहिले आम्हाला सांगा. युनियनवाले येतात नाही संस्थेचे प दाधिकारी येतात त्यांना आवश्वासने दिली जातात की , परिवहन सेवेला पत्र देतात की , परिवहन सेवा तात्काळ सुरू करण्यात यावी . पंरतु त्यांचा काही अटी/शर्ती आहेत किंवा त्यांचे काय प्रॉब्लेम आहेत हे कोणी समजून घ्यायचे? महापौर मॅडम, आपणांस विनंती आहे, उपायुक्तांना ह्या बाबतचा खुलासा करायला सांगा त्यानंतर आम्ही आमचे स्पष्टीकरण देऊ धन्यवाद!

**मा. महापौर :-**

उपायुक्त अजित मुठे साहेब , सन्मा. सदस्या निलम ढवण ताई ते गटनेते आहेत , तसेच सन्मा. सदस्य प्रशांत दळवी साहेब ह्या दोघांनी परिवहन सेवा का बंद आहे याबाबत विचारणा केलेली आहे उपायुक्त म्हणून तुम्ही खुलासा दयावा.

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

परिवहन सेवा बंद होती त्याबाबत त्यांच्याशी मिटींग झालेली आहे. परवा ही सभेमध्ये ठरलेले आहे. परिवहन सेवा सुरू करणेबाबत त्याबद्दल करारनामा जो आहे तो पुनश्च नवीन करारनामा ह्या पिरेडसाठी आपल्याला क रायचा आहे त्याचे काय आम्ही आता सुरू केलेले आहे . परवा मिटींगमध्ये तसा ठराव झालेला आहे आता संबंधित ठेकेदार आपल्या ऑफिसला आलेला होता , करारनामा करून लगेच परिवहन सेवा सूरू करू असे त्यांनी आता आश्वासन दिलेले आहे.

**निलम ढवण :-**

करारनामामध्ये काय काय तुम्ही टाकलेले आहे ते पण कळू दया ना , का बंद होते त्यानंतर आता चालू करत आहेत. तर त्याच्यासाठी काय तुम्ही अटी/शर्ती टाकल्या आहेत त्यानंतर तुम्ही त्यात काय केले आहे त्याच्यासाठी ते ही सर्व सदस्यांना कळू दया.

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

ताई अजून करारनामा करायचे बाकी आहे.

**निलम ढवण :-**

तुम्ही म्हणता करारनामा ठरलेला आहे त्यांच्या मिटींमध्ये काय झाले ते तरी असेल त्यानुसारच तुम्ही करारनामा करणार.

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

करारनामाच्या याच्या प्रमाणे जात आहे २५ (१)(२) प्रमाणे करायचा आहे. नवीन की, ह्या पिरेडसाठी आपल्याला कसे धो रण ठरवायचे आहे त्या बाबतीत आहे , आपल्याला गाड्या कशा चालवायच्या आहेत.

**निलम ढवण :-**

साहेब, अजून गाड्या कशा चालवायच्या आहेत , कशा ठरवायच्या आहेत , ह्या विषयीवरती तुमची अजून चर्चा व्हायची आहे का?

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

नाही.

**निलम ढवण :-**

पहिले कॉन्ट्रक्टरला तुम्ही ताबडतोब सांगायचे होते चालू कर आम्ही करारनामा जो करायचा आहे, त्यांच्याशी प्राथमिक तुमची याच्यावर चर्चा झाली होती तर त्यांना तुम्ही ताबडतोब बसेस चालू करायला सांगायला पाहिजे होत्या . नसेल करत तर एकाच ठेकेदारावर काही शिक्का मारलेला नाही . त्यांना काळ्या यादीत टाका, जर लोकांना वेठीस धरत असतील आणि महानगरपालिकाचा एवढा पैसा जावून देखील तो पण लोकांचा पैसा जावून लोकांना जर वेठीस धरत असतील असे आणि त्याच्या मनमानी नुसार जर तुम्हाला वेठीस धरत असतील त्यांना काळ्या यादीत टाका . नवीन दुसरी निविदा मागवा एवढा वेळ तर जाणारच आहे.

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

हो ताई.

**निलम ढवण :-**

परवा मिटींग झाली त्या मिटींगमध्ये काय ठरले ते सर्व सन्मा . सदस्यांना कळू दया. जर काही ठरले नसेल तर आताच्या आता १० वेळा त्यांची मिटींग घ्यायला बाकीचे कामधंदे नाहीत का आपल्याला परिवहन चालू नाही करायची आहे का?

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

चालू करायची आहे ना.

**निलम ढवण :-**

चालू करायची तर मग त्यांची १० वेळा मिटींग का करायची कमिशनर साहेब देखील त्या दिवशी मिटींग केली. सोमवारी मला म्हणाले दोन्ही आमदार होते आम्ही सगळे जण होतो . त्यावेळी कमिशनर साहेब म्हणाले ते आले आहेत त्यांच्याशी फायनल मिटींग आज करतो. मग सोमवार पासून आज वार गुरूवार आहे आम्ही तेव्हाही त्यांना सांगितले होते, पहिले त्यांना बसेस चालू करायला सांगा, नंतर त्यांचा काय विचार आहे तो करा . बसेस अजून चालू होत नाही त्यांची मनमानी आपध खपवून घेणार का?

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

नाही.

**निलम ढवण :-**

मग नाही खपवून घेणारा तर त्यांना काळ्या यादीत टाका , दुसरा ठेकेदार घ्या. मग तुम्ही कसला करारनामा करणार तुमचे जर ठरले नाही तुमचे मिटींगमध्ये जे काही ठरले आहे ते सगळयांसमोर सांगा. नसेल तर काळ्या यादीत टाका त्याचा मागे न ला गता ताबडतोब पहिले आता

बस चालू करा. नाही तर हा परिवहनचा बजेट आज पास करू नका . तो विषय पेन्डींग ठेवा. नुसते तुम्ही बजेट फायनल करत जाणार आणि जर लोकांना ती सुविधा मिळत नसेत तर कशाला ते बजेट पाहिजे. इतके दिवस ते बसेस थांबलेल्या आहेत त्या बसेत आजच्या आज चालू करा . लोकांना ती सुविधा मिळू द्या . आम्ही लोकांसाठी कामे करत आहोत , लोकांना ती सुविधा मिळाली पाहिजे त्याच्यावर निर्णय काय आहे तो आजच्या आज ह्या सभेत दयवा . मला सर्व सन्मा. सदस्यांची हिच भूमिका असेल. तुमच्यामध्ये काय मिटींग झाली त्या ठेकेदाराने तुम्हाला काय सांगित ले ह्या संदर्भात सांगा आणि ताबडतोब त्याला काळ्या यादीत टाका . परिवहनच्या स्वत :च्या महानगगरपालिकेच्या माध्यामातून बसेस चालू करा याच्यापूर्वी चालत होत्या.

अजित मुठे (उपायुक्त (मु.))

हो.

निलम ढवण :-

सगळ्या ठिकाणी कशाला ठेकेदार पाहिजे. मिटींगमध्ये काय झाले ते सांगा.

मा. महापौर :-

प्रशांत दळवी साहेब काही तरी बोलत आहेत, प्रशांत दळवी साहेब तुम्ही बोलून घ्या. तुम्हाला परवानगी दिलेली आहे.

प्रशांत दळवी :-

उपायुक्तांनी फक्त दोन शब्दात सांगितले की , आम्ही तात्काळ सुरू करणार आहोत . पण त्याच्या अगोदरची काही पार्श्वभूमि सांगितलेली नाही.

निलम ढवण :-

बरोबर आहे.

प्रशांत दळवी :-

बस चालू होत्या का किंवा कधी बंद झाल्या , त्यांनी सांगावं बसे बंद होत्या म्हणून ह्या कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे बस बंद होत्या का आयुक्तांनी सांगावे. सदस्यांची का दिशाभूल करत आहेत. तर एवढे दिवस बसेस बंद होत्या. मार्च पासून बस चालू आहेत आणि त्या ठेकेदाराने ह्या प्रशासनाला वेळोवेळी पत्र दिले आहेत की, आमचे करारनामा करुन घ्या म्हणून. आता हे सांगतात की, करारनामा 7-8 दिवसात होईल म्हणून. हे का सांगत आहेत , बस चालू नव्हत्या का ? मार्च पासूनचे शेड्युल्ड माझ्याकडे आहे. मार्चपासून ह्या ठिकाणी उत्तनचही वादळ झाले त्याही वेळेला आपल्या ह्या बसेस तिकडे बसेस चालू होत्या. त्यांनी सांगावे, 70 पैकी 38 बसेस चालू होत्या की नाही? रस्त्यावर धावत होत्या की नाही धावत होत्या? बाहेरगावचे जे लोंढे उत्तर प्रदेशात जे जाणार होते त्यांनाही आपल्या बसेसने त्यांना सोयी करुन दिल्या. त्यानुसार वसई वरुन आपल्या कर्मचाऱ्यांना आणायचे होते. आरोग्य विभाग असेल किंवा हॉस्पीटलचे त्यांनाही आपल्या बस पुरवत होते. मग हे बसेस बंद होत्या असे कसे सांगु शकतात. 38 चालू होत्या की नाही चालू होत्या ? उपायुक्तांनी खुलासा करावा . काही पण बोलायचे, लोकप्रतिनिधींची दिशाभूल करायची असे करु नका . हा कोरोनाचा प्रादुर्भाव गेले 6 महिने चालू आहे ना. मग तुम्ही आता करार करायला का थांबलात. एवढे 6 महिने पर्यंत हे तुमचे निवेदन मला पटलेले नाही. महापौर मॅडम त्यांना नीट सांगा, भागीरथीने तुम्हांला पत्र दिलेली आहेत की नाही दिलेली आहेत? नंतर तुम्ही त्यांना सांगितले की , तुम्ही परिवहन सेवा बंद करा . आता तुम्ही त्यांना पत्र देत आहेत. तुमच्याकडे जेव्हा ते संघटनेची लोक आणि युनियची माणसे आली तेव्हा तुम्ही त्यांना सांगत आहात की , तात्काळ सुरु करण्यात यावे . नाहीतर तुमच्यावर कारवाई करण्यात येईल . पण त्यांचे कोण ऐकणार. त्यांनी सांगितले आहे तुमचा रेट ठरवून द्या. त्यांनी त्यांचा रेट दिला होता. मग हा रेट ठरवायला एवढे दिवस ह्यांना का ला गले? 6 महिने जातात का ? कोरोनाच्या प्रार्दुभावात आपतकालीन परिस्थितीमध्ये त्यांनी ह्या बस पुरविलेल्या आहेत आणि ते त्यांच्याकडून काय वेगळी

मागत आहोत. तेच मागत आहेत जे पूर्वी तुम्ही देत होतात. त्याच्या व्यतिरिक्त महापौर मॅडम मी जे बघितलेले आहे हे 244 कि.मी. चा प्रति बस मागे त्यांना देत होतो आणि एवढेच नाहीतर 32 बसेस बंद होत्या. त्याच्यामध्ये मागतात काय आर .टी.ओ. चा टॅक्स इन्शुरन्स आणि ड्रायव्हरचा पगार मागत आहेत. काय वाईट करत आहेत. हे कर्मचारी कोण आहेत ह्या मिरा भाईंदरचे स्थायीक आहेत. मिरा भाईंदरचे नागरीक आहेत. त्यांना ह्या कोरोनाच्या प्रार्दुभावामध्ये पगार द्यायचा नाही का? गाड्या पडूनच आहेत ना . त्यांनी गाड्या चालवण्यासाठी कधीच असमर्थता दाखवली का ? नाही दाखवली. गाड्या पडून आहेत गाड्यांचे मेन्टेनन्स, आर.टी.ओ. चा टॅक्स आहे, इन्शुरन्स आहे आणि बाकीचा जो खर्च आहे तो कोणी करायचा . प्रशासनाला ह्यांनी कधीचे पत्र दिलेले आहेत की , तुम्ही आम्हाला रेट ठरवून द्या. ह्यांना रेट ठरवायला 6 महिने लागतात का ? महापौर मॅडम त्यांनी अगोदर खुलासा करावा की गाड्या चालू होत्या की बंद होत्या आणि ह्या कारोनाच्या प्रार्दुभावामध्ये किती बसेस चालू होत्या. ने आपण करण्यासाठी बसेस चालू होत्या ना . कल्याण डोंबिवली वरुन आपले कर्मचारी येत होते. वसई, पालघर वरुन येत होते. मग तिथे गाड्या चालत नव्हत्या का ? आज माहिम दादर ह्या ठिकाणी उत्तर प्रदेश असतील , झारखंडचे असतील त्यांना सोडण्यासाठी ज्या बसेस जात होत्या त्या महापालिकेच्या जात होत्या. मग बसेस चालू नव्हत्या असे कस म्हणता येईल.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, प्रशांतजी नक्की जनतेची बाजू घेताय की ठेकेदारबद्दल तुम्ही समर्थन करत आहेत?

**प्रशांत दळवी :-**

त्यांनी सांगावे ज्या गाड्या चालू होत्या.

**निलम ढवण :-**

मला पण म्हणायचे आहे की , गाड्या चालू होत्या पण कोणासाठी होत्या . कर्मचारी आपण नागरिकांचे काय केले आहे नागरिकांसाठी किती बस चालू ठेवल्या . प्रशासनाने कर्मचाऱ्यांसाठी केलेली ती सोय होती. त्या नागरिकांसाठी का बंद केल्या? तो विषय तुम्ही घ्या.

**प्रशांत दळवी :-**

नागरिकांसाठी बसेस बंद करणे हे आमचे धोरण नव्हते . राज्य सरकारचा जो जी .आर आला होता...............

**निलम ढवण :-**

ती गोष्ट चुकीची आहे. हे आम्ही म्हणतच नाही. पण नागरिकांसाठी का बंद केली गेली.

**प्रशांत दळवी :-**

जी.आर नुसारच आपण बंद केल्या होत्या.

**निलम ढवण :-**

नागरिकांसाठी का बंद केल्या गेल्या ते सांगा . ठेकेदार जेव्हा त्याचा फायदा घेत होता तेव्हा पालिकेला पॅनल्टी देत होते का? तीन महिन्यात जरा तोटा सेल्फ डिस्टन्सींग आणि कमी प्रवासी घेत होते म्हणून माझे तेच म्हणणे आहे. कर्मचाऱ्यांचे बोलू नका, नागरिकांसाठी काय करता ते सांगा. स्टेट गर्व्हमेंटचा जो जी .आर होता त्या जी .आर नुसार त्यांनी प्रशासनाला आमचे त्याच्या त दुमत नाही . प्रशासनाला कामाला इथे येण्यासाठी त्या शिवाय सेवा सुरळीत मिळणार देखील नव्हती . त्यांना दिल्याबद्दल आमचे दुमत नाही. आमचा विषय आहे. नागरिकांसाठी ह्या बसेस बंद का केल्या गेल्या.

**मा. महापौर :-**

ही महासभा आहे . आपल्याला विषय पूर्ण करायचे आहेत . सगळयांना बोलण्यासाठी संधी मिळेल. आपले बोलणे शॉर्टमध्ये बोला . अवांतर चर्चा करु नका . तुम्ही प्रशासनाकडून खुलासा मागत आहेत. प्रशासन खुलासा देईल. परिवहनच्या विषयावर अजून कोणाला काही बोलायचे असेल तर त्यांनी

हात वर करावा. मला वाटते सन्मा. सदस्या जैन मॅडम ह्यांनी हात वर केलेला होता. मी सन्मा. जैन मॅडम ह्यांना बोलण्याची परवानगी देत आहे.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम एकदा क्लेरिफिकेशन होऊन जाऊ दे.

**मा. महापौर :-**

सर्वांचा खुलासा उपायुक्त मुठे साहेब देणार आहेत . तत्पुर्वी जैन मॅडम तुम्हाला काही बोलायचे असेल तर बोला.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम सेनेच्या गटनेत्यांनी जे काही सांगितले आम्ही नागरिकांबरोबर आहोत की नाही तर मला त्यांना हेच सांगायचे आहे की हा गर्व्हमेंटचा जी.आर होता. कल्याण डोंबिवली, ठाणे ह्या ठिकाणी पण बसेस बंद होत्या ना.

**निलम ढवण :-**

मी ह्या विषयाला विरोध केलाच नाही . प्रशासनाला ती सेवा देण्यासाठी आमचा विरोध नाही आहे. आमचा विषय एवढाच आहे की त्यांच्याशी एवढी चर्चा करुन देखील कमिशनर साहेबांनी केली आहे उपायुक्तांनी केली आहे . सगळ्यांनी केली आहे . उपायुक्तांनी केली आहे . सगळ्यांनी चर्चा करुन देखील जर ठेकेदार शेवटपर्यंत पैशासाठी अडून धरतो. जेव्हा त्याचा फायदा होतो तेव्हा पालिकेला तो रॉयल्टी देतो का ? नाही ना. मग एवढे त्या ठेकेदाराच्या मागे लागून माझे म्हणणे एवढेच आहे की आताच्या आता पहिला नागरिकांसाठी बस सेवा चालू करा.

**मा. महापौर :-**

ढवण ताई दळवी साहेब , तुमच्या विषयावरती उपायुक्त उत्तर देणार आहेत. तत्पूर्वी मी जैन मॅडमला बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यांनी बोलावे.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम, मी विचारु इच्छिते, उपायुक्त मुठे साहेब ऐकत असतील तर, जो कोरोना काळ चालत होता तेव्हा सगळे डॉक्टर सफाई कर्मचाऱ्यांना ते बसेसने इथे आणले आणि त्या नंतर ते संपावर गेले आणि दोन दिवस डॉक्टर्स आणि आपले सफाई कर्मचारी आणि सुरक्षा कर्मचारी त्यांना डेल्टा खोलून तिथे थांबावे लागले . दोन दिवसांचे जेवण आपल्याकडून गेले . त्यांची व्यवस्था आपल्याकडून करावी लागली हे खर आहे की नाही?

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

हो खरं आहे.

**गिता जैन :-**

कोरोना काळामध्ये तुम्ही गुन्हा दाखल केला आहे का?

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

याबाबतीत आपण त्यांना नोटिस दिलेली आहे.

**गिता जैन :-**

अजून त्यांच्यावर गुन्हा का दाखल झाला नाही ? कोरोना काळात आपल्याला ते लोक वेठीस धरुन आपले नाक बंद करुन तोंड उघडायचे बंद करत आहेत . तुम्ही अजून का गुन्हा दाखल केला नाही?

**अजित मुठे (उपायुक्त (मु.))**

त्यांना नोटिस दिलेली होती. नोटिसचे उत्तर आल्यावर आपण कारवाई करतच आहोत मॅडम.

**गिता जैन :-**

साहेब मला नोटिसची भाषा कळत नाही. तुम्ही गुन्हा दाखल केला की नाही ते पहिला सांगा.

अजित मुठे (उपायुक्त (मु.))

अजूनपर्यंत गुन्हा दाखल केलेला नाही.

गिता जैन :-

का केला नाही? म्हणजे आपल्याला त्यांनी केव्हाही वेठीस धरायचे.

निलम ढवण :-

बरोबर आहे.

मा. महापौर :-

जैन मॅडम, आपण कृपया आपल्याला जे काही प्रश्न विचारायचे आहेत तुम्ही एकत्रितपणे बोला आणि मग सगळ्यांचा खुलासा उपायुक्त मुठे साहेब देतील.

गिता जैन :-

मॅडम, पहिला मी सांगणार की, परिवहन सेवेचे ठेकेदारांवर पहिला गुन्हा दाखल करा. कारण कोरोना काळात आपल्याला त्यांनी वेठीस धरलेले आहे. आपले इथे सर्व कर्मचारी आणून मग ते संपावर गेलेले होते. मग दोन दिवस त्यांचे जे हाल झाले त्यांच्याकडे काहीच नव्हते. इथे रहायची व्यवस्था करावी लागली होती असे वेठीस धरणारा पहिला ठेकेदाराला आपण काळ्या यादीत टाकावा अशी माझी विनंती आहे आणि दुसरं त्यांनी वारंवार रेटसाठी आणि जो ठरलेला रेट आहे तो आपण देतोच आहे. त्यांनी लिहून दिलेले आहे की कर्मचाऱ्याला त्याने 4 महिने पगार दिलेला नाही आणि आपल्याला लिहीत आहे की, तुम्ही जेव्हा पैसे देणार तेव्हा आम्ही पगार देऊ. म्हणजे अशी अट त्यांनी आपल्याकडे आहे का? त्या कर्मचाऱ्यांना ही ड्रायव्हरना ही त्या कंडक्टरांनाही तुम्ही पैसे द्यायचे नाही, पगार द्यायचा नाही. आम्हाला वेठीस धरायचे अशा ठेकेदारावर प्रेम कशाला आहे. सत्ताधारी पार्टीला एवढे हैराण करणारे ठेकेदारावर एवढे प्रेम का दाखवत आहात.

निलम ढवण :-

बरोबर आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे अजून कोणाला परिवहनच्या संदर्भामध्ये बोलायचे आहे का?

प्रशांत दळवी :-

मॅडम आता त्यांनी आरोप केला की त्यांना पाठीशी घालत आहेत. त्यांना कोण पाठीशी घालत आहेत. कर्मचाऱ्यांना पगार दिलेला नाही......................

निलम ढवण :-

महापौर मॅडम, तुम्ही उत्तर द्या.

प्रशांत दळवी :-

4 महिन्यांपासून पगार दिलेला आहे का. ठेकेदाराला मार्च महिन्यापासून पैसे दिलेले आहेत का तुम्हीच सांगा.

मा. महापौर :-

तुम्हाला प्रशासनाकडून खुलासा पाहिजे ना. सन्मा. निलम ताई, दळवी साहेब, जैन मॅडम यांनी परिवहन संदर्भात जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या सर्व मुद्दयांवरती उपायुक्त मुठे साहेबांनी खुलासा करावा.

अजित मुठे (उपायुक्त (मु.))

सन्मा. सदस्यांना, कोरोना काळात ज्या बसेस चालवल्या गेल्या होत्या त्या फक्त आपल्या कर्मचारी आणि आरोग्य कर्मचारी, सफाई कामगार, डॉक्टर यांच्यासाठी चालवल्या गेल्या होत्या. सामान्य नागरिकांसाठी आपण बस चालविल्या नव्हत्या. त्याचप्रमाणे मगाशी म्हणण्यात आले की वसई किंवा विरारला बेसस आपल्या सोडल्या गेल्या होत्या की, मिरा भाईंदर किंवा आणखी कुठे मा.

कलेक्टर साहेबांची ही मागणी होती की जे लॉकडाऊन पिरेडमध्ये जे प्रवासी त्यांच्या त्यां च्या राज्यात जाण्यासाठी आहेत त्यांना महापालिकेने बसेस पुरवून त्यांना स्टेशनला सोडण्याची व्यवस्था करावी अशी विनंती रेव्हेन्यू डिपार्टमेंटकडून आपल्याला करण्यात आलेली होती . त्याप्रमाणे आपण त्यांना बसेस संबंधित लोकांना तिथे सोडलेले आहे. तेव्हा फक्त बसेस चालल्या होत्या. सामान्य प्रवाशींसाठी आपण शासन निर्देशाप्रमाणे निर्देश असल्यामुळे बसेस चालविलेल्या नव्हत्या. आपले आरोग्य कर्मचारी आणि हे सोडून इतर कोणासाठी बस सुरु केलेल्या नाहीत . आता शासन निर्देश आले ते 50 टक्के प्रवासी घेऊन बसेस चालवल्यात असे निर्देश दिलेले आहे त. याबद्दल परवा जी मिटींग झालेली आहे. परिवहन समितीची त्यात निर्णय घेण्यात आलेला आहे की 50 टक्के प्रवाशांना प्रवेश देऊन संबंधित ठेकेदाराने बसेस चालवायच्या आहेत आणि तसा ठराव सुध्दा पारीत करण्यात आलेला आहे. ठेकेदाराने याबाबतीत जे महापालिकेकडे रक्कमेची मागणी केली होती की , ह्यासाठी 42 रुपये पर कि.मी. हा दर मिळावा आणि व्हि.जी.एफ. ची रक्कम मिळावी आणि सॅनिटायजेशनची रक्कम मिळावी . अशी मागणी केलेली होती. मात्र ठराव झाल्याप्रमाणे 42 रुपये आपण त्याला अदा करणार नाही . आपल्या 50 टक्के प्रवाशाचे उत्पन्न त्याला मिळणार असल्यामुळे 50 टक्के किंवा जे उत्पन्न मिळेल ते वजा करता उरलेला फरक त्यातील जी रक्कम कमी असेल ती त्याला अदा केली जाईल . सॅनिटायजेशनच्या बाबतीत ती त्याची जबाबदारी आहे म्हणून सॅनिटायजेशन महापालिका करणार नाही ती ठेकेदारानेच करुन घ्यायची आहे. 25(2)(1) प्रमाणे ज्यावेळी अशी यादी आपत्ती जनक परिस्थिती निर्माण होते त्यासाठीच स्वतंत्र करारनामा करण्याची तरतूद आपल्या पूर्वी केलेल्या करारनाम्यात आहे . त्याप्रमाणे संबंधित आमचे विधी अधिकारी यांना त्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत आणि तसा करारनामा ते तयार करत आहेत आणि त्याच्या आधारे बस बहुतेक आजच सुरु होतील.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, आज नक्की होतील का?

मा. महापौर :-

होतील. आता उपायुक्त् मुठे साहेबांनी सांगितले आहे की बस आज सुरु होतील. सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील तुम्ही बोला.

धृवकिशोर पाटील :-

सर्वांनी सांगितले बसेस बंद आहेत . माझे सगळयांना आवाहन आहे की ज्या बस ऑपरेटरने जेव्हा पूर्ण मिरा भाईंदर पूर्ण देश बंद होता त्यावेळी आपल्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसाठी आपल्या महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी जर बस सेवा दिली आणि परराज्यात जाणा ऱ्या रेल्वे प्रवाशांसाठी सुध्दा त्यांनी रात्री अपरात्री बस सेवा दिली. म्हणजे इकडून प्रशासनाने फोन करायचा की, 30 बसेस पाठवा तर त्यांनी लगेच रात्रीच्या रात्री 30 बसेस पाठवायच्या. प्रशासनाने फोन केला की 40 बस पाठवा, तर त्यांनी 40 बस पाठवायच्या की जो माणूस संपूर्ण जग बंद असताना जर ही बस सेवा देऊ शकतो मग आता ही बससेवा का देऊ शकत नाही . जरा माझी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती आहे की, मुळाशी जायला पाहिजे की हे कारण का . कशामुळे बस बंद आहेत. याचा उहापोह व्हायला पाहिजे. माझी सगळयांना आपल्याला विनंती आहे की खरं तुम्ही बस ऑपरेटरसाठी बोलत आहेत. माझा तुम्हाला एक प्रश्न आहे की , साफसफाईचा ठेका हा प्रायव्हेट आहे. कर्मचारी आणणे हे त्याचे काम आहे . परंतु आपल्या महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्यांची सोय केली . 4 महिन्यापर्यंत आरोग्याचे साफसफाई कर्मचारी आणले आणि त्या ठकेदेराला सपोर्ट केला. इथे तुम्ही म्हणता त्या बस ऑपरेटरला काळ्या यादीत टाका जरा थोडीशी माहिती तुम्हा सदस्यांना विनंती आहे की व्यवस्थ्ज्ञित थोडस जर तुम्ही पुटअप केले असते तर बस झालं असते . दुसरी गोष्ट निलम ढवण मॅडम म्हणतात की त्या बस ऑपरेटरला काळ्या यादीत टाका आणि महापालिकेने परिवहन बस चालवा. मॅडम आपण ही सदस्य आहात. तुम्ही तुमच्या उत्तनच्या नगरसेवकांना विचारा की, ज्यावेळी महापालिकेची बससेवा

सुरु होती महापालिकेचे कर्मचारी ज्या वेळेस बससेवा वापरत होते त्यावेळेला आपल्या बस सेवेची परिस्थिती काय होती . मॅडम उत्तनचे लोक अक्षरशः हैराण झाले होते ज्या वेळी ह्या ऑपरेटरने सुरुवात केली काम हातात घेतले आणि अगदी व्यवस्थित तुम्ही तुमच्या तिनही नगरसेवकांना विचारा तुमचे शिवसेनेचे नगरसेवक आहेत आम्ही ठेकेदाराची बाजू घेत नाही . पण जे सत्य आहे ते समोर आणले पाहिजे. दुसरी गोष्ट मॅडम तुम्ही म्हणता त्या ला काळ्या यादीत टाका. अहो करारानाम्यामध्ये अट आहे की त्याचे प्रत्येक महिन्याचे बील विथ इन सेव्हन डेज पूर्ण आजतागयत कोणत्याही अधिकाऱ्याने 7 डेजमध्ये पेमेंट केले नाही. 7 डेजमध्ये जर पेमेंट केले नाही तर त्याला 2 टक्केप्रमाणे इंट्रेस्ट द्यायचे असे करारमानामध्ये आहे. केले का नाही केले . आता सन्मा. अधिकाऱ्यांनी परिवहन समितीमध्ये सांगितले की, पुरवणी करारनाम्याची अट आहे. 4 महिने त्या बस ऑपरेटरकडून बसेसची सुरुवात करुन घेतली मग का पुरवली नाही . काररनामा केला का त्यांचा रेट फिक्स नाही केला . 4 महिने ज्या माणसाने स्वत :च्या खिशातून डिझेल टाकले . ज्यामाणसाने स्वत:च्या खिशातून बसेस मेन्टेन केल्या. ज्या माणसाने स्वत :च्या खिशातून आर .टी.ओ. टॅक्स भरला. ज्या माणसाने बस ऑपरेटरने स्वत:ने खिशातून इन्शूरन्स भरले असे अनेक त्याने खर्च केले आणि महापालिकेने त्यांना फक्त 1 कोटी 70 लाखाचे बिल दिले. ते पण का दिले ते पण आधीचे बिल दिले . आणि अशासाठी दिले की ड्रायव्हर आणि कंडक्टर लोकांनी संप केला आणि संप केला म्हणून त्यांनी सांगितले की , युनियनवाले ऐकत नाही. पगार द्यावा लागेल. त्यावेळी डांगे साहेबांनी 1 कोटी 70 लाखाचा चेक दिला आणि आता आमदार मॅडमने सांगितले की तुम्ही त्याच्यावर गुन्हा दाखल करा वास्तविक गुन्हा आपल्या अधिकाऱ्यांवर दाखल केला पाहिजे . जो माणूस 4 महिने सतत सेवा देतो आणि एक दिवस बंद केली त्याने बंद केली नाही त्या ड्रायव्हर आणि कंडक्ट रने संप केला म्हणून ती बस सेवा बंद केली. त्याच्यानंतर आयुक्त डांगे साहेबांनी स्वत: त्या कॉन्ट्रॅक्टरला बोलवून घेतले आणि सांगितले की तुम्ही बस सुरु करा. ताबडतोब तुमचे जे काही पेंडींग असेल जो प्रॉब्लेम असेल जे काही तुमचे वाद असतील मी विदीन टू डेजमध्ये महापौर, उपमहापौर, पदाधिकाऱ्यांची आणि परिवहन कमिटीची मिटींग घेऊन तुमचा प्रॉब्लेम सॉल्व्ह करतो . मॅडम डांगे साहेब जाऊन किती दिवस झाले . आजतागयत त्या परिवहन कॉन्ट्रॅक्टरला कोणत्याही अधिकाऱ्याने बसून सांगितले नाही की तुझे प्रॉब्लेम सांग . आम्ही यातून मार्ग काढू. मिरा भाईंदरच्या जनतेसाठी जेवढे तुमचे प्रेम आहे तेवढे जास्त प्रेम आमचे आहे . कारण जी आज भारतीय जनता पार्टीचे 60 नगरसेवकांना निवडून दिले आहे आम्हाला त्या जनतेची पण काळजी आहे . परंतु मॅडम जसे लोकप्रतिनिधीने आणि अधिकारी हे जेव्हा एकत्र काम करतात त्यावेळी शहराचा विकास होतो. त्याचप्रमाणे ठेकेदार आणि अधिकारी ह्या दोघांनी व्यवस्थित काम केले तर परिवहन सेवा चांगली चालेल. दुसरी गोष्ट सांगतो की 4 महिने ही बससेवा सुरु होती. परंतु कोणत्याही अधिकाऱ्याने त्या ला विचारले नाही की 4 महिने तुला बिलींग कसे करावे . जर तुम्हाला काही प्रॉब्लेम असेल तर तुम्ही सुधारीत करारनामा करा. तुम्ही हा विषय सॉल्व्ह करा. तुम्ही म्हणता मॅडम आयुक्त साहेबांनी की त्याची बैठक घेतली आणि सांगितले उद्याच्या उद्या बस सुरु कर . पण असे सांगितले नाही तुझे जे प्रॉब्लेम आहेत ते प्रॉब्लेम मी सॉल्व्ह करतो . तुम्ही जर हक्का ने सांगु शकता उद्याच्या उद्या बस चालू कर असे हक्काने सांगितले पाहिजे . तुझे जे काही प्रॉब्लेम असतील विदीन टू डेज विद इन 8 डेज किंवा 15 डेज मी सॉल्व्ह करतो. परंतु तू परिवहन सेवा सुरु कर.

निलम ढवण :-

तुम्ही जी वस्तुस्थिती उपस्थित केली त्याच्यावर माझे पण का ही प्रश्न आहेत. तुम्ही सगळी ठेकेदारांची वकिती करत आहेत.

धृवकिशोर पाटील :-

चांगले सांगितले तर वकिली करतात . तुमच्या बाजूने बोलणार तर आमची बाजू घेतो . मॅडम ही सत्यस्थिती आहे. उद्या जर ह्या ठेकेदाराने बस सुरु नाही केली आणि तो जर कोर्टात गेला तर

मॅडम बस सेवा सु रु होणार नाही. मॅडम शिवार गार्डनच्या इथे तो प्रोजेक्ट 40 लाख रुपये वर जो आपला रेट येणार होता आर .बी. टेंडर मुळे ते अडकलेले आहे . आज किती वर्ष झाली ते ना डेव्हलप होत नाही त्याला मिरा भाईंदरच्या जनतेसाठी त्याचा काही उपयोग होत आणि नाही महापालिकेचे उत्पन्न होते. मॅडम तुम्हाला आधी सांगतो की जर एखादा कॉन्ट्रॅक्टर जर कोर्टात गेला तर हे प्रकरण अजून अटकेल आपले काम आहे याच्यातून सामंजसपणे तोडगा काढणे ही वकिली नाही मॅडम . आपल्याला आपले काम आहे आपल्या लोकांनी निवडून दिलेले आहे . एक लोकप्रतिनिधी ह्या नात्याने आपले काम आहे वस्तुस्थिती लोकांपूढे मांडली पाहिजे. आणि लोकांना न्याय दिला पाहिजे. तो ठेकेदार असो अधिकारी असो की जनता असो की नगरसेवक असो आपल्यासाठी सगळे समान आहेत . फक्त तुम्हाला वस्तुस्थिती सांगणे हे आमचे काम आहे. वकीली करतो मी एकदम व्यवस्थित वकिली करतो तुमची वेळ पडली तर तुमची पण वकीली करा हा धृवकिशोर पाटील तुमच्यासाठी हाजीर आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या ढवण ताई तुम्हाला काही बोलायचे आहे. सुरेश खंडेलवाल यांनी हात वर केला होता.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम, परिवनह के विषय पे सभी मेरे साथियो ने बहुत अच्छी चर्चा की सभीने अपने अपने विचार रखे, विषय मेरा था और ठराव भी में ही पढूँगा | चाहे मैं हॉस्पीटल से पढूँगा पर मैं पढूँगा| लेकिन जिसने भी अभी आरोप प्रत्यारोप सुने महापौर मॅडम परिवनह की सेवा के बारे में अभी मुठे साहबने सबकुछ जानकारी दे दी है | मुझे लगता है की सभी सदस्यो के मन का सारा जो वहेम था परिवहन के ठेकेदार के विषय में शायद निकल गया होगा | पाटील साहब ने दळवी साहबने बहुत अच्छी तरह से हमारे विरोधी मॅडम ढवण मॅडम को भी अच्छी तरहसे समजा दिया गया है | मुझे लगता है की जादा इस विषय पर कुछ नही बोलना है | महापौर मॅडम, मैं अपना ठराव पढूँगा बाकी मेरे सदस्य जो भी है उसके उपर बोल देंगे| मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या परिवहन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात सोबत जोडण्यात आलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदी मध्ये दुरुस्त्या करुन सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे रक्कम रु. २०.५२ लक्ष इतक्या शिलकेच्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| तपशिल | 2019-20 (सुधारित अंदाज) | 2020-21 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहित) | 6623.35 | 4900.80 |
| परिवहन खर्च | 6606.85 | 4880.28 |
| **अखेरची शिल्लक** | 16.50 | 20.52 |

**संजय थेराडे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव झालेला आहे . ह्या ठरावावरती कोणाला बोलायचे आहे का ? ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे. प्रविण पाटील साहेब काही बोलायचे आहे.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम मुळात आपली ही सभा चालू आहे सभा चालू झाल्यापासून हात वर केलेला आता हात खाली केला . मान्य करतो आता वेळ दिली त्याच्याकरिता धन्यवाद . ई सभा असल्यामुळे ह्या अडचणी येतील मी मान्य करत आहे . परंतु काही सदस्यांनी ज्या सुचना केल्या बजेटची सभा आहे मान्य करतो. 3 विषय असले तरी आता तुम्ही ठराव केला. त्या ठरावाला तुम्हीच सांगितले ठराव सर्वानुमते मंजूर . याच्यामध्ये कॉंग्रेस पक्षाचे सदस्य , शिवसेनेचे सदस्य आहेत ठराव करायची

महासभेची सभा शास्त्राप्रमाणे जी पध्दत आहे त्या पध्दतीप्रमोण सभा चालू द्या . नाहीतर तुम्हीच ठराव करता आणि तुम्हीच मंजूर करता त्याला अर्थ राहणार नाही.

**मा. महापौर :-**

पहिल्यांदा मी विचारले. ह्या ठरावावरती कोणाला बोलायचे आहे का.

**प्रविण पाटील :-**

ज्याला बोलायचे आहे जो हात वरती करतो त्यांना तुम्ही कुठे बोलू देता.

**मा. महापौर :-**

आता मी ढवण ताईला संधी दिली होती.

**प्रविण पाटील :-**

अनेक सदसय् आहेत ते हात वरती करत आहेत. टेक्नीकली अडचण आहे आम्ही मान्य करतो. याचा अर्थ असा नाही की तुम्ही ठराव सर्वानुमते मंजूर करु शकता.

**मा. महापौर :-**

ठिक आहे तुम्हाला बोलायचे असेल तुम्ही बोला. तुमचा ठराव आहे का?

**प्रविण पाटील :-**

ठराव आहे की नाही तुम्ही विचारलेच नाही. तुम्ही मंजूर केला. त्याच्या अगोदर ही जो विषय घेत असताना क्रमवारीचा जुबेर इनामदारने विषय मांडला . त्यावेळेला ही तुम्ही तसाच विषय मांडला . सभा ही महासभा मी मान्य करतो. अधिकृत महासभा असेल सभा शास्त्राप्रमाणे काम चालू द्या मॅडम.

**मा. महापौर :-**

अधिकृत महासभा आहे.

**प्रविण पाटील :-**

अधिकृत आहे मग अधिकृत नियमाप्रमाणे काम चालू द्या.

**मा. महापौर :-**

पाटील साहेब ज्या वेळेला सन्मा . नगरसेवक सुरेश खंडेलवाल साहेबांनी ठराव मांडला त्याच्यानंतर मी असे म्हटले की ठरावावरती कोणाला बोलायचे आहे का?

**प्रविण पाटील :-**

मॅडम, ठरावावरती मला बोलायचे होते.

**मा. महापौर :-**

तुम्हाला लगेच संधी दिली.

**प्रविण पाटील :-**

याच्या अगोदर ही एक तास सभा चालू आहे. आम्हाला बोलायचे होते. तुम्ही दोन ठराव मंजूर केले. दोन ठराव करत असताना.

**मा. महापौर :-**

निलम ढवण ताई बोलत होत्या, दळवी साहेब पण बोलत होते, धृवकिशोर पाटील साहेब बोलत होते, त्याच्यानंतर सुरेश खंडेलवाल साहेबांनी ठराव मांडला आणि मी विचारले की ठरावावरती कोणाला बोलायचे आहे का तुम्ही हात वर केला तुम्हाला मी बोलायला संधी दिली.

**प्रविण पाटील :-**

त्याच्या अगोदरचा जो ठराव झाला क्रमवारीचा जुबेर इनामदारांनी जो मुद्दा मांडला त्या वेळेला तो सभा शास्त्राप्रमाणे क्रमवारी सभा मतदान घेणे जरुरी होते की नाही?

**मा. महापौर :-**

सचिवांना मी म्हटले ना.

**प्रविण पाटील :-**

त्या वेळेस कशाला मतदान घेतले नाही.

**मा. महापौर :-**

सचिवांनी सभेला विचारले होते.

**प्रविण पाटील :-**

सदस्यांची तुम्ही मते कुठे घेतले. ह्या सभेला जवळ जवळ 83 सदस्य उपस्थित आहेत.

**मा. महापौर :-**

आता ह्या विषयावरती बोला.

**प्रविण पाटील :-**

ह्या विषयावरतीच बोलत आहे. सभेमध्ये जो ठराव होता मुळे तुम्ही ठरावच निट मंजू र करत नाही तर मग सभेला अर्थ काय.

**मा. महापौर :-**

फक्त् क्रम बदलला होता.

**प्रविण पाटील :-**

मग त्याच्यासाठी नियम आहेत की नाही.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. 8 व प्रकरण क्र. 12 एकत्रित घ्यावे.

**प्रविण पाटील :-**

मान्य करतो. त्याला सभेची मंजूरी पाहिजे की नाही. तुम्ही मंजूरी घेतली होती की नाही. ही ई सभा असल्यामुळे अडचण येऊ शकते . म्हणून मी तुम्हाला सांगतो ई सभा जर अधिकृत असेल तर सभा शास्त्राप्रमाणे नियमाप्रमाणे सभा होऊ द्या . दुसरी गोष्ट आता जो तुम्ही ठराव केला. सुरेश खंडेलवाल यांनी ठराव मांडला. तुम्ही बोलले ठराव मंजूर आमचे काही मतच नाही. कमीत कमी आमचे मतदान तरी घ्या. बजेट सारखा विषय आहे.

**मा. महापौर :-**

तुमचा विरोध आहे का.

**प्रविण पाटील :-**

आमचा विरोध आहे की नाही हा नंतरचा विषय आहे. मतदान तरी घ्या.

**मा. महापौर :-**

अधिकृत विषय होता. तुम्ही ठराव मांडू शकता. तुमची ह्या ठरावाला मंजूरी नसेल तर तुम्ही ठराव मांडू शकता.

**प्रविण पाटील :-**

विचारा तर खरं सर्वानुमते मंजूर कसे म्हणता.

**मा. महापौर :-**

मी पहिल्यांदा विचारले नंतर मी म्हटले.

**प्रविण पाटील :-**

विचारले तर सदस्यांनी हात कुठे वर केले.

**मा. महापौर :-**

मतदानाची प्रक्रिया सुरु झाली नाही. हात कसे वर करतील.

**प्रविण पाटील :-**

मतदानाची प्रक्रिया सुरु करायच्या अगोदर सर्वानुमते मंजुर झाला असे तुम्ही डिक्लेअर करुन टाकले.

**मा. महापौर :-**

**नाही त्याच्या आधी मी विचारले होते की, ठरावावरती कोणाला बोलायचे आहे का.**

**प्रविण पाटील :-**

**बोलणे वेगळे आणि मतदान घेणे वेगळ.**

**मा. महापौर :-**

**तुमचा ठराव यायला पाहिजे ना.**

**प्रविण पाटील :-**

**तुम्ही आम्हाला विचारा तर खरं . विचारत नाही आणि सर्वानुमते मंजूर करता . परिवहनच्या विषयावरती तुमचा ठराव आहे की नाही किंवा आमचे मतदान घेतले की नाही ते तरी विचारा . जर अधिकृत सभा असेल तर चर्चा करायची असेल तर चर्चा करा.**

**मा. महापौर :-**

**सन्मा. सदस्य खंडेलवाल साहेबांनी जेव्हा ठराव मांडला त्याच्यानंतर मी विचारले ह्या ठरावावरती कोणाला काही बोलायचे आहे का.**

**प्रविण पाटील :-**

**आम्ही हात वर केला.**

**मा. महापौर :-**

**लगेच तुम्हाला संधी दिली . कोणी विरोध दर्शविला नाही म्हणून मी बोलले सर्वानुमते मंजूर. ठिक आहे तुमचा ह्या विषयावरती वेगळे मत असु शकते तर तुम्ही तसा ठराव द्या.**

**प्रविण पाटील :-**

**असे सांगा ना मॅडम. मला विचारायचे असे आहे एखादा विषय होत असताना मतदान घ्या . जर आमची संमती असेल कदाचित विरोध असेल कमीत कमी संमती तरी विचारा . दुसरा विषय असा आहे तुम्हाला एक विनंती आहे कमीत कमी जे महापालिकेचे पदाधिकारी आहेत त्यांचे तरी माईक चालू ठेवा. जेणेकरुन आम्हाला तरी बोलता येईल . आम्ही हात वर करतो . सभागृह नेते आहेत , स्थायी समिती सभापती आहेत. दोन्ही गटनेते आहेत यांचे तरी माईक चालू ठेवा.**

**प्रविण पाटील :-**

**5-6 सदस्य आहेत. ते त्यांचे माईक चालू ठेवा त्यांना बोलायचे असेल काही ते तरी बोलतील . नाही तर कसं होत तुम्हीच बोलता आ णि तुम्हीच सगळं आम्हाला नाही. एखाद्या सदस्याला बोलायचे असेल किंवा पदाधिकाऱ्याला बोलायचे असेल.**

**मा. महापौर :-**

**जे हात वर करत आहेत त्यांना आपण बोलायला देतो.**

**प्रविण पाटील :-**

**ही बजेटची महत्वाची सभा आहे. बजेट मंजूर होणार आहे. आमचा पहिले म्हणजे मुळात ह्या बजेटला विरोध नाही . बजेट तुम्ही कराल पण विषयावर काही अंतर्गत ज्या काही बाबी असतील त्याच्यावर चर्चा होणे महत्वाचे आहे. दुसरी गोष्ट म्हणजजे बजेटचा विषय घेतल्यानंतर त्यावर मतदान घ्या. विषयावर मतदान होणे महत्वाचे आहे. मतदान झाल्यानंतर कमीत कमी विचारा तरी मतदानाची ही अडचण येऊ शकते . मी मान्य करतो पण विचारा मतदान कुठल्या प्रकारे घ्यायचे आहे . किती सदस्यांची त्याला मान्यता आहे. एखादा आमचा ठराव ही असु शकतो किंवा त्या विषयांतर्गत आमचे काही मुद्दे असतील.**

**धृवकिशोर पाटील :-**

**महापौर मॅडम, ज्यावेळी विरोधी पक्ष ठराव मांडतील किंवा दुसऱ्या एखाद्या सदस्यांनी ठराव मांडल्यानंतरच मतदान होईल अन्यथा मतदान होणार नाही.**

**प्रविण पाटील :-**

**कमीत कमी विचारायला तरी पाहिजे की ठराव आहे की नाही.**

**धृवकिशोर पाटील :-**

**ज्याप्रमाणे सुरेश खंडेलवाल यांनी ठराव मांडला त्यावेळी सांगायला पाहिजे की आम्हाला ठरा व मांडायचा आहे. मग आम्ही मांडू दिला असता.**

**प्रविण पाटील :-**

**बोलायला द्याल तेव्हा सांगू ना. आता बोलायला दिलं तेव्हा सांगितल ना आम्ही.**

**मा. महापौर :-**

**तुम्हाला बोलायला दिल ना मी.**

**प्रविण पाटील :-**

**हा मॅडम, तेव्हाच मी बोलतोय विषय सर्वानुमते मंजूर बोलण्यापेक्षा त्याच्या अगोदर असे बोला की तुमचा काही ठराव आहे का? असे विचारा.**

**मा. महापौर :-**

**विचारलं मी माझ वाक्य आहे. खंडेलवाल साहेबांचा ठराव झाल्यानंतर.......**

**प्रविण पाटील :-**

**ठीक आहे. त्याच्यानंतर तुम्ही विषय असे बोलले की तो सर्वानुमते मंजूर झाला तेव्हा माझा हातवर होता.**

**मा. महापौर :-**

**ठीक आहे. तुमचा ठराव आहे का?**

**प्रविण पाटील :-**

**आमचा त्याच्यावर ठराव नाही आहे. पण त्याच्यावर आमचे मुद्दे आहेत. जे मुद्दे ढवण मॅडमने बोलले ते ॲड करुन घेतले तर आम्ही ठराव नाही मांडणार.**

**मा. उपमा. महापौर :-**

**प्रविण पाटील यांचे मुद्दे नोंद करुन घ्यावे आणि सुचनांमध्ये ते ॲड करण्यात यावे अशी मी विनंती करतो.**

**प्रविण पाटील :-**

**जे ढवण मॅडमने मुद्दे मांडले तेच आमचे मुद्दे होते. याच्यानंतर जे विषय असतील किंवा आता महिला बालकल्याण किंवा अग्निशमनचा किंवा वृक्षप्राधिकरणचा जो बजेट आहे त्या विषयावर बोलायला द्या. त्याच्यानंतर ठराव करत असताना आम्हाला विचारा . कमीत कमी जेणेकरुन आमचा ठराव आहे की नाही. त्याच्यानंतर सर्वानुमते मंजूर करा.**

**मा. महापौर :-**

**ठीक आहे. सन्मा. सदस्या निलम ढवण ताई यांनी काही सुचना मांडल्या आहेत याच्यावर विचार करावा तसेच इतर कोणाचा ठराव नसल्यामुळे सन्मा . नगरसेवक सुरेश खंडेलवाल यांनी मांडलेला ठराव ह्या ठिकाणी मंजूर करण्यांत येत आहे. सचिव साहेबांनी विषयाला सुरुवात करावी.**

**प्रकरण क्र. 8 व 12 :-**

**परिवहन सेवेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि . २०/०३/२०२० रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र . १५९, ठराव क्र. १३२)**

**ठराव क्र. 01 :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या परिवहन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात सोबत जोडण्यात आलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदी मध्ये दुरुस्त्या करुन सन २०१९-२० चे सुधारीत व

सन २०२०-२१ चे रक्कम रु. २०.५२ लक्ष इतक्या शिलकेच्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| **तपशिल** | 2019-20 (सुधारित अंदाज) | 2020-21 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| परिवहन जमा (हस्तांतरणा सहित) | 6623.35 | 4900.80 |
| परिवहन खर्च | 6606.85 | 4880.28 |
| **अखेरची शिल्लक** | 16.50 | 20.52 |

**सुचक :- श्री. सुरेश खंडेलवाल** **अनुमोदक :- श्री. संजय थेराडे**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. 9, अग्निशमन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २०/०३/२०२० रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १६०, ठराव क्र. १३३)**

**मा. महापौर :-**

तत्पूर्वी मी सर्व सभागृहाला सांगु इच्छिते की तीन वाजता ठाणे जिल्हाधिकारी येथे आज व्ही.सी. आहे आणि त्यामुळे आयुक्तांना त्याठिकाणी जावे लागले आहे म्हणून सभागृहाची मान्यता देत आहे. आयुक्तांच्या जागी आणि आयुक्तांनी पदभार घ्यावा. सन्मा. सदस्य यांना काही बोलायचं आहे तुम्हाला परवानगी देत आहे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद. तुम्ही आता सभागृहामध्ये मला वाटते आय.टी डिपार्टमेंटला आदेश केले की सर्व पदाधिकारी, गटनेते त्यांना अनम्युट करा ते का केले नाही. तुमचे ही ऐकत नाही का? आता परिवहनचा ठराव झाला. मला याच्यावरती बोलायचं होते.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. पदाधिकाऱ्यांना अनम्युट केलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

धन्यवाद मॅडम. महापौर मॅडम, मी परिवहनचा परत विषय काढेल कारण मला परिवनहच्या विषयावर बोलायचं होतं. तुमचा ठराव बहुमताने मंजूर झाला असेल तरी ही आपल्याकडे शासनाचे काही सुचना आलेल्या होत्या , ह्या कोविड संदर्भात याच्यामध्ये की दि . 4 मे 2020 रोजी आपल्याकडे जी.आर आलेला शासनाचा , शासनाने काही निर्णय करुन पाठवलेले आहेत . त्याच्यामध्ये अर्थ व्यवस्थेवर परिणामाबाबत निधी उपाययोजना करण्याबाबत त्यांनी त्या जी .आर. मध्ये खुलासा केलेला आहे. सचिव महोदयांनी जी.आर. सर्वांना दिला पाहिजे होता . हा जी.आर. सर्व सदस्यांपर्यंत पोहचला पाहिजे होता. ठीक आहे हरकत नाही आम्हाला जास्त सवय आहे माहिती घ्यायची म्हणून आम्ही घेतोच. त्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे, ह्या परिस्थितीमध्ये शासनाकडून तुम्हाला फक्त 33 टक्के कुठल्याही नियोजनासाठी याच्या आधी केलेले मंजुर सुध्दा केलेले असतील त्याच्यासाठी सुध्दा 33 टक्के तुम्हाला निधी उपलब्ध होणार आहे. त्याच्या पलीकडे होणार नाही. हा तुमचा अर्थसंकल्पावर भरपुर परिणाम करणार आहे. हा तुमचा जी.आर. चा अर्थसंकल्प आपण करायला बसलो. अंदाजपत्रक आपण करायला बसलो हो तर दिला पाहिजे . प्रशासनाने मुठे साहेबांनी उत्तर दिला पाहिजे , निलम

ढवण मॅडम बरोबर बोलल्या, ॲड धृवकिशोर पाटील साहेबांनी उत्तर दिलं म्हणजे मुठे साहेबांना काहीच माहिती नाही. धृवकिशोरजीचा पगार वाढवा. मानधनापेक्षा जास्त पगार दिला पाहिजे. मुठे साहेब,. घरी बसा तुमचा काम नाही पालिकेमध्ये परिवहन सेवेमध्ये परिवहन विभागाचे तुम्ही उप-आयुक्त असतांना तुम्हाला त्याची माहिती नाही . ती माहिती आम्हाला धृवकिशोर पाटील देताहेत . हा प्रकार तरी काय चाललेला आहे. परिवहनची परिस्थिती अतिशय गंभिर आहे . 244 कि.मी. त्याला मंजुर करुन दिले जात आहे . 244 कि.मी. चे पैसे मोजावे जागणार आहेत महापौर मॅडम . हे करारनामा करायला चाललेले आहेत. परिवहनचे तुमचे सभापती आहेत भाजपचे उत्फुर्त सभापती असतांना एका बाजुला तुम्ही परिवहनचा ठराव करुन महासभेला मंजुरीसाठी पाठवला आहे त्याच्यामध्ये परत फेरफार खंडेलवालजी हॉस्पीटलमध्ये सुरक्षित राहावे निरोगी राहतील, त्यांनी हॉस्पीटलमध्ये बसुन त्यांनी ठराव केला त्याच्यामध्ये सरळ सुची प्रमाणे सुची तरी काय आहेत हे तुम्हाला मिाहती व्हावी . हॉस्पीटलच्या नर्सला दाखवणार की डॉक्टरांना दाखवणार कामाचे काही नियोजन असते . महापौर मॅडम, काय चालले आहे? व्हिडिओ कॉन्फरन्सींगने आहे काय फरक पडत नाही पण कमीत कमी जे चालललेले आहे पालिकेचे कामकाज पालिकेतच राहावे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य जुबेर इनामदार साहेब , आपल्याला माहिती आहे की आजची सभा बजेटची आहे.

जुबेर इनामदार :-

मी अर्थसंकल्पावर बोलतोय. दुसरं कशावर ही बोलणार नाही.

मा. महापौर :-

ह्यापूर्वी बहुतेक सदस्यांनी चर्चा केलेली आहे. ठराव झालेला आहे.

जुबेर इनामदार :-

ठराव तुम्ही केला आमचे बोलायचे बाकी आहे . आमच्या सुचना बाकी आहेत महापौर मॅडम . अर्थसंकल्प करतांना तुम्हाला याची जाणीव आहे की आपल्याकडे जी .आर. आलेला आहे आणि शासनाने आपल्याला बरेच काही त्याच्यामध्ये आदेश दिलेले आहेत . तुम्हाला कुठलाही निधी, तुम्हाला कुठलाही अर्थ व्यवस्था तुम्हाला करतांना तुम्हाला वित्त विभागाकडे पाठवावी लागणार आहे . तुम्ही कुठलेही नविन धोरण सध्या घेऊ शकत नाही.

मा. महापौर :-

तुमची सुचना त्यामध्ये नमुद करायच्या आहेत का?

जुबेर इनामदार :-

कुठल्या?

मा. महापौर :-

तुम्ही ज्या सुचना मांडणार आहेत त्या सुचना नमुद......................

जुबेर इनामदार :-

100 टक्के त्याच्यामध्ये नमुद कराव्या लागतील . तुम्हाला कारण शासनाच्या पुढे तुम्हाला जाताच येत नाही. हे अधिकारी तुम्हाला सांगणार कधी मुठे साहेबांना विचारा . सभागृहाची दिशाभुल करायला घेतली आहे का ? बजेट करा अर्थ संकल्प मंजुर करुन द्या आणि ह्या शासनाने दिलेल्या सुचना कोण बघणार?

निलम ढवण :-

जुबेरजी अधिकाऱ्यांना बोलायला दिले तर ना.

जुबेर इनामदार :-

अधिकारी कसे बोलतील. अधिकारीने सातबारा दिलेला आहे धृवकिशोर पाटीलला.

मा. महापौर :-

ठिक आहे. तुम्ही तुमचा सुचनांचा विचार केला जाईल. ह्या ठरावावर विरोध असेल तर तुम्ही ठराव मांडा.

जुबेर इनामदार :-

काँग्रेस पक्षाचा वतीने आमचा ह्या ठरावावर 100 टक्के विरोध आहे. ठराव होऊ शकत नाही महापौर मॅडम कारण मी ह्या विषयावरती "ज" चा प्रस्ताव दिलेला नाही. ह्याच्यामध्ये मी कुठलाही रद्दोबदल करु शकत नाही आणि तो मी नाही करणार . मी त्याच्या मध्ये एकच सुचना करणार आहे . तुम्ही दि . 4 मे 2020 च्या शासनाचा जो निर्णय आहे त्याला अनुसरुन ह्या परिवहनचा जो अर्थसंकल्प प्रशासनाने तयार केलेला आहे त्याची कारवाई त्याच अनुषंगानेच करण्यात यावी . तुम्हाला याचा पलिकडे करता येणार नाही. शासनाने तुमचे आमचे अधिकारच संपवून टाकलेले आहेत.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य जुबेर इनामदार साहेब, यांनी पक्षाच्या वतीने विरोध दर्शविलेला आहे. याची नोंद घेण्यात यावी. पुढील विषयाला सुरुवात करण्यात यावी. विषय वाचुन झालेला आहे. पुढचा विषयावरती कोणाला बोलायचे आहे का? ढवण ताई बोला.

निलम ढवण :-

महापौर मॅडम, फायर ब्रिगेडचा देखील बऱ्याच काही असुविधा त्यांच्याकडे आहेत. आपण एवढा बजेट करुन देखील तिथे काही ठिकाणी त्यांना ज्या आवश्यक गोष्टी लागतात त्या त्यांच्याकडे उपलब्ध नाही आहेत . गाड्या असुदे त गाड्यांची पण कमतरता आहेच . मोठ्या गाड्या आत जात नाहीत. मोठी गाडी एखादीच असेल . इकडे तिकडे फिरवली जाते आणि जेव्हा जेव्हा कोरोना मध्ये देखील सॅनिटाईज मारायची वेळ येत होती त्या त्या वेळी सॅनिटायझर देखील वेळेवर मिळत नव्हते . म्हणजे अशा त्यांच्या देखील काही समस्या आहेत तर माझी तुम्हाला एक विनंती आहे आयुक्त साहेबांना की त्यांनी फायर ब्रिगेडच्या सगळ्या अधिकाऱ्यांना घेऊन एकत्रित मिटींग करावी की त्यांना ज्या आवश्यक सोयी सुविधा आपण बजेट करतो सोडून देतो त्यांना ज्या सुविधा पाहिजे असतील तिथे स्टाफ पाहिजे असेल किंवा जे काही करायचे असेल तर ते सर्व सन्मा . सदस्यांनी देखील त्यांचे काही विचार असतील किंवा त्यांच्या सुविधा किंवा इतर देखील प्रशासनाला माहिती असतात त्या त्यांच्या समोर बाकिच्या सदस्यांनी देखील आणुन ते ते डिपार्टमेंट कसे सक्षम होईल याकडे आपण लक्ष दिले पाहिजे अशी मी आपणास विनंती करते . सॅनिटायझर असुदेत किंवा इतर काही गोष्टी असुदेत त्यानुसार त्यांना पाईप नसतात त्यांचे पाईप कट झालेले आहेत अशा सगळ्या गोष्टी आहेत . पाईप कट झालेले आहेत त्यांना नविन मिळालेले नाहीत . अशा पध्दतीने पुढची कामे आग रोखावी लागली मोठा पाईप नसेल भाईंदर पुर्वेला पुर्ण रुंद सगळ ग्रामपंचायत काळातील विकसीत झाले असल्या कारणामुळे त्यावेळी गाड्या आत जातांना फार प्रॉब्लेम होत आहेत . तर त्या पाईपची सुविधा त्यांना करुन देण्यात यावी. असे त्यांचे बरेचसे प्रॉब्लेम आहेत. गाडी एखादी खराब झालीतर त्यामुळे आपण ती संख्या वाढवावी. कारण शहराची लोकसंख्या वाढलेली आहे. शहराचा विकास मोठ्या प्रमाणावर होत चाललेला आहे. त्यानुसार गाड्यांची संख्या आपण वाढविणे गरजेचे आहे. त्यांना आवश्यक बाबी देखील आपण पुरवठ्यात त्यांना जे जे पाहिजे असेल त्या संदर्भात आढावा घेऊन त्यांना त्या गोष्टी पुरवाव्यात अशी मी विनंती करते.

मा. महापौर :-

नक्की ताई. सन्मा. सदस्य राकेश शहाजी आप बोलीय ।

राकेश शहा :-

महापौर मॅडम की परवानगी से मॅडम , शिवसेना गटनेता निलम ढवणजी ने कहा की बहूत सारी सुचनाये दि है अभी उनके सहयोगी दल ने जो सुचना दि की जुबेरजी ने 33 टक्के जी.आर. के

**हिसाब से काम होना चाहिये । जुबेरजी की सुचना माननी चाहिये की निलम ढवणजी की ? अभी मै ठराव पढ रहा हुँ ।**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या अग्निशमन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात सोबत जोडण्यात आलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदी म ध्ये दुरुस्त्या करुन सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे रक्कम रु.२२.५५ लक्ष इतक्या शिलकेच्या अंदाजपत्रकास आजची मा . महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| **तपशिल** | 2019-20 (सुधारित अंदाज) | 2020-21 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अग्निशमन जमा (हस्तांतरणा सहित) | 4224.11 | 4875.95 |
| अग्निशमन खर्च | 1923.75 | 4853.40 |
| **अखेरची शिल्लक** | 2300.36 | 22.55 |

**संजय थेराडे :-**

**अनुमोदन आहे.**

**मा. महापौर :-**

**सन्मा. सदस्य श्री. राकेश शाहजी यांनी मांडलला ठरावावर कोणाला काही बोलायचे आहे का ? इनामदार साहेबांचा हाथ वर आहे. त्यांना बोलण्याची परवानगी देत आहे.**

**जुबेर इनामदार :-**

**महापौर मॅडम, धन्यवाद याच्यामध्ये माझा परत तोच मुद्दा असणार आहे . शासनाच्या वतीने आपल्याला येणारे जे काही अनुदान असेल अग्निशमन विभागामधुन तोही येणार नाही . शासनाने जे आदेश दिले होते त्याच्यामध्ये स्पष्टरुपी त्यांनी आपल्याला समजवलेले आहे की कशा प्रकारे तुम्हाला करावे लागणार आहे . याच्यामध्ये त्यांनी सर्व विभागांना सुचना देण्यात येते की , त्यांनी कार्य क्रमा अंतर्गत सर्व चालु योजनांचा आढावा घ्यावा. व जेवढ्या योजना पुढे ढकलण्या सारखे आहेत किंवा रद्द करण्या सारखे आहेत त्या निश्चित कराव्यात . रद्द योजनांसाठी वित्त विभागाला प्रस्ताव पाठवावा व पुढे ढकलण्या सारखे योजनांन अभावी त्यांच्या स्तरावर स्थगिती म्हणून घो षीत करावे असा हा स्पष्ट आदेश आपल्याला देण्यात आलेला आहे . खरतर हा अर्थसंकल्प चर्चेला येण्याचा आधी ह्या विषयावर प्रशासनाने आपल्याला मदत केली पाहिजे होती . हे निवेदन आपल्याला केलेच नाही म्हणून आता हा आपण अर्थसंकल्प तयार करायचा. त्याच्या नंतर त्याला दिलेला निधी मध्ये इतके भरपुर अंतर येणार आहे. कारण ह्याचा परिणाम परिवहन सेवेला अग्निशमन विभागाला , वृक्षप्राधिकरणाला मुळ अंदाजपत्रकामधुन आपल्याला बरेच निधी हस्तांतरण करावे लागतील . अग्निशमनचे तसे नाही . अग्निशमनचे स्वतंत्र बजेट असल्यामुळे तरीही शासनाकडून कुठलीही निधी आप ल्याला अपेक्षित असती तर ती आपल्याला मिळणार नाही. हे आपल्याला गृहीत धरुन चालावे लागेल. शासनाच्या बऱ्याच निधी मध्ये मी तर बोलेल जी .एस.टी. मध्ये सुद्दा हे अंतर पडणार आहे . म्हणून महापौर मॅडम आपल्याला प्रशासनाला जवाब विचारायला पाहिजे . आयुक्त साहेबांनी निवेदन के ले पाहिजे होते की अशा प्रकारे आपल्याला शासनाकडून हे आदेश आलेले आहेत. आदेशानुसार आपल्याला अर्थसंकल्प जो आहे तो त्या प्रमाणे तुम्हाला निश्चित करावा लागेल. निधी निश्चित करावी लागेल. यातला अंदाज निश्चित करावा लागेल. म्हणून महापौर मॅडम केलेल्या अग्निशमनाचाही ठ रावावर माझी सुचना आहे. आमच्या काँग्रेस पक्षाचा वतीने दिलेल्या तुमच्या निधीवर आमचा विरोध दर्शवा.**

**मा. महापौर :-**

**ठिक आहे.**

**निलम ढवण :-**

**महापौर मॅडम, राकेशजी आपण जो पश्न उपस्थित केला की , त्यांचे सहकारी जुबेरजी आणि ढवणजी यांचे मांडायचे जुबेरजींना आता जी वास्तवता आहे स्टेट गव्हर्नमेंटचा जी .आर. चे आपल्या समोर त्यांनी कथन केलेले आहे. त्यामुळे जे तुम्हाला जी.आर. पोषक असतात त्या जी.आर. चा वापर तुम्ही करता आणि जे जी.आर. तुम्हाला पोषक नसतील त्याचा विरोधात तुम्ही बोलत असता जी.आर. च्या विरोधात ढवण मॅडम वेगळी कोणी नाही ढव ण मॅडम ह्या सभागृहाची एक सदस्या आहे. त्यामुळे ढवण मॅडमचे ऐकायचे की जी .आर. चे ऐकायचे शासनाच्या याच्यानुसारच आपल्याला प्रशासन चालवायचे आहे. महानगरपालिका जुबेरजींनी बरोबर जे वास्तव आहे आपल्या समोर ठेवलेले आहे . त्यामुळे जुबेरजींचे एकायचे की ढवण मॅडमचे ऐकायचे हा प्रश्नच तिथे येत नाही. राकेशजी तुम्ही पण आमचे सहकारी आहात असे काही प्रश्न सभागृहात उपस्थित करु नका.**

**मा. महापौर :-**

**ठीक आहे ढवण ताई तुमचा ठराव आहे का?**

**निलम ढवण :-**

**ठराव नाही.**

**मा. महापौर :-**

**विरोध आहे?**

**निलम ढवण :-**

**नाही आमच्या ज्या सुचना आहेत त्या त्या करा आणि जुबेर इनामदारजीनी जे स्टेट गव्हर्नमेंटचा जी.आर. नुसार जे योग्य असेल त्यानुसार आपण निर्णय घ्यावा.**

**मा. महापौर :-**

**ठीक आहे, सन्मा. सदस्य जुबेर इनामदार यांनी विरोध दर्शविलेला आहे आणि सन्मा. सदस्या निलम ढवण ताई यांनी सुचना विचारात घ्याव्या असे म्हटलेले आहे.**

**निलम ढवण :-**

**जी.आर. नुसारच कामकाज करावे.**

**मा. महापौर :-**

**प्रशासन जी.आर. नुसारच कामकाज करते, सन्मा. सदस्य राकेश शाहजी यांनी मांडलेला ठराव हा मंजूर करण्यात येत आहे. सचिव साहेबांना विनंती करते पुढील विषयाचा वाचन करावे.**

**प्रकरण क्र. 9 व 13 :-**

**अग्निशमन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. २०/०३/२०२० रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १६०, ठराव क्र. १३३)**

**ठराव क्र. 02 :-**

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या अग्निशमन विभागाचे सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे अंदाजपत्रकात सोबत जोडण्यात आलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदी मध्ये दुरुस्त्या करुन सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे रक्कम रु.२२.५५ लक्ष इतक्या शिलकेच्या अंदाजपत्रकास आजची मा. महासभा मंजुरी देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| तपशिल | 2019-20 (सुधारित अंदाज) | 2020-21 (मुळ अंदाज) |
|---|---|---|
| अग्निशमन जमा (हस्तांतरणा सहित) | 4224.11 | 4875.95 |
| अग्निशमन खर्च | 1923.75 | 4853.40 |

| | | |
|---|---|---|
| अखेरची शिल्लक | 2300.36 | 22.55 |

सुचक :- श्री. राकेश शाह अनुमोदक :- श्री. संजय थेराडे
ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. 10, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन 2019-20 चे सुधारीत व सन 2020-21 चे मुळ अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेबाबत ("अ" + महिला व बालकल्याण , "अंध व अपंग "+ GNNURM, वृक्षप्राधिकरण, मा. स्थायी समिती समा दि . 20-03-2020 चे शिफारस केलेले प्रकरण क्र. 161 ठराव क्र. 134 प्रकारण क्र. 11 सन्मा. सदस्य श्री. जुबेर इनामदार यांचा दि. 05-08-2020 रोजीच्या प्रत्रान्वये दिलेला प्रस्ताव मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन 2019-2020 चे मुद्दा व सन 2020-21 चे मुळे अंदाजपत्रकास (अ) ( क) महिला व बालकल्याण , अंध व अपंग GNNURM, वृक्षप्राधिकरण, शिक्षण विभाग, अग्निशमन विभाग तसेच परिवहन विभाग व निधी कमी जासत करून मंजुरी देणे . प्रकरण क्र . 12, सन्मा. सदस्य श्री . सुरेश ज . खंडेलवाल यांचा दिनांक ०७/०८/२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- प्रकरण क्र. ८ मिरा भाईंदर महापालिकेचे "परिवहन सेवेचे" "सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मुळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत.**

**मा. महापौर :-**

**हया विषयावर कोणाला चर्चा करायची आहे का?**

**निलम ढवण :-**

**बांधकाम विषयावर मला बोलायचे आहे.**

**महापौर :-**

**निलम ढवण ताई बोला.**

**निलम ढवण :-**

**मला बांधकाम हया विषयावर बोलायचे आहे. आपल्या याच्यानुसार मार्केट बांधण्यासाठी मार्केट बांधकाम म्हणून तरतूद आयुक्त साहेबांनी 1 करोडची ठेवली होती आणि ती 50 लाखापर्यंत कमी करून मार्केट बांधण्यासाठी तरतूद केलेली आहे. तर ती तरतूद 50 लाखापर्यंत केली गेली. 7-8 महिने हया सगळ्या कामाची मार्केट बांधणे म्हणजे महापालिके तर्फे जे बांधले जात आहेत त्याची बील देखील अजून पेड झालेली नाहीत त्यांची 50-60 लाखांची बीले देखील तिथे पडलेली आहेत. आता 21 पर्यंतची जी बीले आहेत ती जर पास केली नाही तर ते मार्केट बांधण्याचे विकासकाची जी कामे आहेत ती कामे अर्धवर राहिलेली आहेत . ते पेन्डींग असल्यामुळे तर आपण ती कमीत कमी एक करोड पर्यंत तरी त्याची अमाऊंट करावी अशी आपणांस विनंती आहे . महापौर मॅडम दुसरी गोष्ट मा . बाळासाहेब ठाकरे कलादालन आणि मा . प्रमोद महाजनजी कलादालन यांच्यासाठी आपण जो महापालिकेने फंड अभा केलेला आहे. तर याच्यात आपली फार मोठी तफावत दिसून येते . आपल्याला काही गोष्टीची आठवण करून देवू इच्छिते की , आम्ही मागच्या टर्ममध्ये जेव्हा मा . आ बाळासाहेब ठाकरे यांच्या कलादालनाचा जे व्हा प्रस्ताव ठेवला त्याचवेळी आपल्याकडून आमदार प्रमोद महाजन साहेब यांचा देखील कला दालनासाठी आपला प्रस्ताव आला होता . आम्ही हया दोन्ही नेत्यांना आपले समजतो आणि त्यावेळी कुठची गोष्ट आम्ही न नाकारता दोघानांही साम्य कसे होईल दोघांची कलादालन कशी उभी राहतील याच्या साठी पूर्ण पाठपुरावा आमचे मा . आमदार प्रतापसर नाईक साहेब यांनी देखील केलेला होता. त्यानुसार त्यांना निधी देण्यासाठी पण आपल्याला आश्वासन दिले होते, परंतु त्यांनी तर**

त्याच्या पध्दतीने आमदार साहेब आपले प्रयत्न करत आहेत . पालकमत्र्यांने दिले आहे , खासदार साहेबांनी निधी दिलेला आहे , परंतु आपण महानगरपालिका तर्फे निधी देताना हे दोघांमध्ये आपली एवढी तफावत असणे म्हणजे फार म्हणजे राजकारण केल्यासारखे इथे आपल्याला दिसून येते . एक करोड बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी आपण दिला आहे आणि 15 करोड तुम्ही प्रमोद महाजन हयाच्यासाठी दिलेला आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, हे दोन्ही आदरणीय नेते आमच्यासाठी देखील तेवढेच आदर्शवादी आहेत आणि आमच्यासाठी तेवढेच प्रेरणादायक आहेत त्यामुळे आपण अशी महानगरपालिकेमध्ये त्यांच्या मलादालनासाठी अशी तफावत करणे योग्य नाही . त्यामुळे आपण ही तफावर दूर करून दोन्ही कलादालनासाठी समान निधी आपण देण्यात यावा ही आपल्याला विनंती आहे. कारण आम्ही हा कुठे भेदभाव केला नव्हता, आम्ही पुढे देखील करणार नाहीत, कारण आमदार प्रमोदजी महाजन हे देखील आमचे शिवसेनेसाठी फार मोठे व्यक्तीमहत्व आहे आणि आमच्या बरोबर युती झाली ही आमादार प्र मोद महाजन साहेबांबरोबर झाली होती . भले आता जरी नसली तरी भविष्यात पुन्हा कदाचित सांगता येत नाही आणि नाही असली तरी जे प्रेरक आहेत कुठल्याही पक्षाचे असुदेत जसे आमदार इंदिरा गांधी हया ही आम्हाला प्रेरक होत्या. असे नाही आहे की पक्ष म्हणून न बघता आपण द्यावा आ णि महानगरपालिकेचा निधी आहे त्याची समानता ठेवावी एवढी आपणास विनंती आहे.

प्रविण पाटील :-

मा. महापौर मॅडम ढवण मॅडमनी जो मुद्दा मांडला कलादालनाचे आज बांधकामचे बजेट आहे ते आपले आज मुळ बजेट आहे का? तो मुद्दा आहे का?

मा. महापौर :-

हो आहे.

प्रविण पाटील :-

तोच मुद्दा पून्हा पुन्हा प्रत्येक बजेटच्या वेळेला येतो. तोच मुद्दा पुन्हा अनुरेखीत करतो की जी बजेट तरतूद असते दोन्ही विषयाला शासनाकडून निधी येणार आहे हे आम्हाला मान्य आहे परंतु महानगरपालिकेचे दोन्ही ठराव एकाच वेळेला असताना एकाच वेळेला एकाच दिवशी झाले असताना बजेट तरतूद ही एवढी तफावत यापूढे नसावी अशी आपल्याला विनंती आहे . दोन्ही बजेट तरतूद ज्यावेळेला तुम्ही एक करोड आणि दीढ करोड मोठी तफावत आहे आणि कलादालनाचे ठराव आणि कलादालनासाठी जे जे प्रस्ताव किंवा ज्या ज्या डिझाइन आहेत त्या सगळया मंजूर असताना बजेट तरतूद नसताना एक कला दालन होईल आणि एक होणार नाही अशी भविष्यामध्ये अडचण येऊ शकते तर महापौरांना विनंती आहे की आता जी बजेटची प्रथम पायरी आहे ती आपण दोन्ही समान ठेवावी अशी आपणाला विनंती आहे.

मा. महापौर :-

ठीक आहे. सन्मा. सदस्य जुबेर इनामदारजी बोला.

जुबेर इनामदार :-

ठराव आधी घ्यायचा आहे की नंतर दोघांचा नंतर घ्यायचा आहे का?

मा. महापौर :-

तुम्ही ठराव मांडत आहात का?

जुबेर इनामदार :-

ठराव नंतर असणार आहे आधी चर्चा नंतर ठराव.

मा. महापौर :-

ठरावातच चर्चा मांडा ना.

जुबेर इनामदार :-

नाही आधी आम्ही चर्चा करून घेतो नंतर ठराव होऊ द्या आमचा ठराव होईल असे काहीतरी आपण करा.

प्रविण पाटील :-

मा. महापौर मॅडम तुम्ही ठरावामध्ये आमची सुचना घेणार आहात का?

जुबेर इनामदार :-

आम्ही विरोधात ठराव करणार?

निलम ढवण :-

प्रविणजी जेव्हा सर्वानुमते मंजूर म्हणतील त्यावेळेस सुचना घेतात की नाही ते कळेल ना.

प्रविण पाटील :-

कमीत कमी आमच्या सुचना तरी घ्या तुम्ही सुचना घेणार नसाल तर ठराव करायला लागेल.

निलम ढवण :-

सुचना तर घ्याव्याच लागतील?

चंद्रकात वैती :-

मा. महापौर मॅडम एकतर आपली पहिलीच सभा होत आहे आणि कोव्हिडच्या प्रार्दुभावात आपल्याला ही आजची सभा संबधी त करायला लागत आहे . वास्तवत: उपस्थित असलेल्या 83 पेक्षा अधिक सदस्यांची सर्वाचीच इच्छा होती की प्रत्येकाने काही तरी बोलले पाहिजे . बजेटचा हा विषय आज असताना मला एक गोष्ट नक्की सांगायची आहे की ह्या बजेटमध्ये आपल्याला जीएसटी अनुदान हे 221 रू अपेक्षित आहे आणि शा सनाकडून अनुदान 580 करोड रू . अपेक्षित आहेत ह्याच्यात निश्चितच कूठेतरी आपल्याला त्रास होणार आहे शेवटी वसूली शासनाकडून आपल्याला उत्पन्न येईल आपल्याला शासनाकडून अपेक्षित असलेले पैसे मिळतील जीएसटी मध्ये देखील आपल्याला फारसा परतावा मिळेल अशातला भाग नाही त्यात शासनाचा एक नक्की जीआर निघालेला आहे आणि त्याने आर्थिक व्यव्हाराना महानगरपालिकेने शासनाचे निर्देश काही दिलेले आहेत त्याला अनुसरून हा ठराव करावा आणि माझे मत आहे की मागचा बजेट पासून आपल्याला सातत्याने आपले पेमेन्ट खूप बाकी आहे . त्यापूर्वी नविन कामांना आपण जेव्हा प्राधान्य द्याल तेव्हा ते प्राधान्य क्रम ठरवावा 20-20 ह्या वर्षाने सर्वाना संकटात टाकले आहे . त्यामुळे माझी सभागृहात विरोधी सदस्यांना देखील विनंती आहे की, ह्या प्रकरणात खूप खोलवर न जाता अगदी एकमेकांला समजून कारण शहर आपले आहे. शहरातला प्रत्येक भागाचा विकास झाला पाहिजे ह्या अनुषंगाने आपण वास्तवता एक जर आधीच पॉलिसी ठरवली असती ह्या ह्या कामांना प्रायोरिटी दिली पाहिजे तर आजच्या ह्या बजेट प्रोव्हिजनमध्ये तर तुम्ही कामाचे प्रायोरिटीने जर लिस्ट देता आली तर आपल्याला अधिक चांगला राहिला. आणि त्याच्यामध्ये प्रत्येक वॉर्डचा विचार करावा ही विनंती.

मा. महापौर :-

नक्की वैती साहेबांनी ही सुचना केलेली आहे त्याचा विचार नक्कीच करण्यात यावा.

जुबेर इनामदार :-

मा. महापौर मॅडम खरतर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर चर्चा चालू असताना काहीतरी शेरोशायरी किंवा कविता नसली तर हा अर्थसंकल्प पूर्ण होऊच शकत नाही . ह्यावेळी आपल्याबरोबर नविन आयुक्त् राठोड साहेब आहेत हा अर्थसंकल्प आपण तयार करतो त्याच्यासाठी एक चांगली कूठे तरी सापडली आणि तो एकदम फिट बसली . हर ,ख्वाईश का सूर जुदा और अलग राग है बजेट है कोई या अलादिन का चिराग है खजकिया और खुन नि कला पैसा ही पैस मिल गया तर आयुक्त महोदय खरतर तुमचे ह्या विषयावर लक्ष वेधू इच्छितो चर्चा अर्थसंकल्प अंदाजपत्रक आयुक्तावर भरपूर जबाबदारी असते . आयुक्तांनी आपला अंदाज तत्कालिन आयुक्त चंद्रकांत डांगे साहेबांनी हा

अर्थसंकल्प तयार केला आणि हा स्थायी समिती समो र मंजुरीसाठी पाठवला. स्थायी समितीने 1812 कोटी 83 लाख 57 हजारचा अर्थसंकल्प तयार केला आहे जमेची बाजूमध्ये अर्थ्रसंकल्प तयार केला हा दरवर्षी असेच केले जाते म्हणजे आमळी ह्याला फुगवलेला अर्थसंकल्प बोलतो खर्च दाखवला 1812 कोटी 83 लाख 57 हलार 21 लाखंनी आपल्याकडे शिल्लक राहणार आहे. साहेब आमच्याकडे 2014 पासुन माझ्याकडे आकडा आहे . मी 2014 ला जात नाही कारण भाजप सरकार मा . आमदार गिता जैन मॅडमनी तेव्हा व्यासपिठावर असताना हा 2014 पासून भाजप चा पुढचा काळ सुरू झालेला आहे तरी मी जास्तीत जास्त तुम्हाला 2017 ते 2018 पर्यत तुमच्यापूढे येऊ इच्छितो आम्ही बजेट तयार केल्यानंतर तुम्ही अंदाज तयार केल्यानंतर तुम्ही स्थायी समितीकडे देतात अंदाज तयार केल्यानंतर सुध्दा त्याच्यामध्ये तफावर किती प्रमाणात असते . हे विचारधीन असावे लागते. कारण आम्ही त्याचे सुधारित बजेट तयार करतो सुधारित अर्थसंकल्प म्हणजे मुळ बजेट अंदाज तयार झाल्यानंतर सुधारित मध्ये तफावत काही नाही तरी 40% ची तफावत आहे . 2019-20 स्थायी समितीने सर्वसाधारण मालमत्ता कर यांच्यामध्ये 140 कोटी रू. तरतूद केली होती .140 कोटीची केलेली तरतूद सुधारित मध्ये प्रशासनाने त्याला मंजुरी घेताना 70 कोटी रू. केली फरक किती झाला 50 कोटीचा आणि वास्तविकता अशी आहे की जे जमा झाले फक्त 60 कोटी रुपये गेल्या 2019-20 मध्ये गेले. लॉकडाऊन सूरू झाल 14 मार्चला तो पर्यत मनपाने कामकाज सूरू होते लौक पैसे भरत होते म्हणजे साहेब तफावर किती टक्क्याची तफावर कारण सुधारित मध्ये च 50% चा फरक आहे आणि जमेच्या बाजूच्या अनुषगांने नेहमी खर्च पकडतो अंदाजपत्र तयार करतो खर्च तयार केले जातात. तुम्हाला बरेच दालन बांधायचे आहेत ब -याचे मोठ मोठ्या इमारती करायच्या आहेत रस्ते कॉक्रीटीकरण करायचे आहेत बरीच विकासाची कामे झालीच पाहिजे पण त्याला आपली आर्थिक परिस्थिती काय आहे याचाही विचार करणे गरजेचे आहे आमची आर्थिक परिस्थिती डबघाईला आहे . आकडे फुगवल्यानंतर अर्थसंकल्प होत नाही तो अर्थसंकल्प ह्या शहराला बुडवेल आणि तो बुडवत चाललेला आहे 50% ची तफावर मालमत्ता करामध्ये ही छोटीमोटी तफावत नाही आहे. मोकळया जागेवरती कर ह्या वर्षामध्ये जो लादला त्याच्यामध्ये 72% कमी आलेला आहे . म्हणजे अशी आमची परिस्थिती आहे हा अर्थसंकल्प अशा प्रकारे तयार केला जातो त्याला काही मुळ कारण नाही आयुक् तांने दिलेला खर्च संकल्पामध्ये स्थायी समितीने केलेली वाढ ठिक आहे त्यांना अशी अपेक्षा अ सेल की पालिकेने दिले पाहिजे परंतु पैसा यायला पाहिजेना साहेब तुम्हाला सांगतो एवढया वर्षामध्ये 2017-18 ला जेव्हा नोटबंदी झाली त्याच काळामध्ये आमच्याकडे सर्वात जास्त मालमत्ता कराचा पैसा वसूल झाला म्हणजे लोकांकडे जी थकबाकी होती ती आली. आता थकबाकी सुध्दा यायला जास्त प्रमाणात राहिलेली नाही ही खरी वस्तुस्थिती आहे साहेब स्थानिक संस्था करामध्ये आमची हिच परिस्थिती आहे एक टक्का अधिभार तो आम्हाला ह्या वर्षामध्ये चालू वर्षामध्ये काय परिस्थती असणार आहे प्रॉपर्टी मार्केट लोकांकडे पैसा शिल्लक राहणार नाही तर लोक कसले इनव्हे स्टमेन्ट करतील कसली स्टॅम्प डयूटी भरतील ही आपली वस्तुस्थिती आहे साहेब खरी परिस्थिती आहे ते आपल्याकडे हे येणा-या वर्षामध्ये येईल असे काही दिसत नाही जी एस टी तर 100% साहेब जे आपल्याकडे येत होते त्याच्या पैसा 83% येणार श्री. चंद्रकांत वैती साहेबांनी आपली भु मिका बरोबर मांडली आम्ही त्यांच्याकडून बदल नाही शिकलो आम्ही प्रयत्न करतो त्याच्या सारखा विषय मांडायचा आणि खरी परिस्थिती आहे . जी.एस.टी. आपल्याकडे 100% राज्य शासन त्याप्रमाणे देणार नाही . आजपर्यंत देत आला म्हणजे गेल्या वर्षी आपल्याकडे जवळ पास जास्तच त्यांनी दि ले आणि साहेब जमेच्या बाजूमध्ये पूर्ण वर्षाची जी परिस्थिती होती ती तुमच्या समोर आणून देवू इच्छितो . साहेब आपल्याकडे सन 2021 मध्ये स्थायी समितीने अंदाज दिला होता 1681 कोटी रूपयांचा सुधारित आपल्याकडे सरळ 1047 कोटी म्हणजे साहेब 48% डेफिशियटचा आम्ही अर्थसंकल्प सा दर करतोय आयुक्त महोदय तुम्ही दिलेल्या अंदाजमध्ये सुधारित जेव्हा केले जाते त्याच्यामध्ये नेहमी फरकच असतो . 40-43% फरक नेहमी

राहिलेला आहे. इथे कुठे तरी आपण आपले पाऊल मागे घेतले पाहिजे आणि आपली जी खरी परिस्थिती आहे त्याला सामोरे जायला पाहिजे. अर्थसंकल्प मोठा केलेला आहे श्री. निलम ढवण ताईने आमची विनंमी केली त्यांनी त्यांची भावना समोर मांडली किंवा त्यांची अपेक्षा आहे ती त्यांनी सभागृहाच्या समोर ठेवलेली आहे. खरी परिस्थिती काय आहे. आमच्याकडे तो निधी आहे का नाही कारण आयुक्त महोदय माझे तर असे मत आहे आयुक्तांनी गेलेल्या निधीला खरं तर दिलेले याकडे अर्थसंकल्प सादर केलेला जास्तीत जास्त 2-5% दिला पाहिजे पण हा केला जात नाही कारण का की त्याला विभागीय अधिकारी जबाबदार आहेत. साहेब मालमत्ता कराच्या अधिकारीने स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे की, आम्ही करून शकत नाही का करत नाही ? बाकीच्या अधिकाऱ्यांनी तसेच केले पाहिजे, विभागीय अधिकाऱ्यांनी त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. तुम्ही करा तुमचा कॉस्ट म्हणजे आम्ही काहीही आकडे करायचे कारण याच्यावरती विरोध का बोट ठेवतोय साहेब त्याला कारण आहे. एकदा त्याला स्थायी समितीने मंजुरी दिली , स्थायी समिती आणि महासभा ज्याची स्थायी समिती त्याचीच महासभा स्थायी समितीने फुगवलेले आकडे दिले महासभेमध्ये बहूमताने मंजुरी घेतात आणि त्या आकड्याचा अनुषंगाने खर्च केला जातो. साहेब आमच्याकडे नरेश गिते साहेब होते सन 2018-19 असे पुस्तक आम्हाला असा ग्रंथ दिला होता. 4 हजार कोटी रुपयाची कामे याच्यामध्ये बाकी होती हे आपल्याला साडे चार हजार कोटी रुपयेची डेफिशियट काम चालू आहे. आपण कमीत कमी पैसे देऊ शकलेलो नाही कामे सुरू केली फक्त ती कामे केल्यानंतर त्यांना पैसे कोणी तरी बोलला ठेकेदाराला पैसे दिले जात नाहीत. पैसे देणार कुठून आम्ही काय करतो साहेब मंजुरी घेतो आणि काय बोलतो स्थायी समितीमध्ये प्र श्न उपस्थित केले जातात की, तुमच्याकडे निधी उपलब्ध आहे का ? आज कुठे ह्या वर्षामध्ये खर्च पडणार आहे, पुढच्या वर्षामध्ये पडेल. परंतु पुढच्या वर्षामध्ये पण तिच परिस्थिती आहे. आपण टॅक्स किती वर्षे वाढविलेला नाही, वाढवू शकत नाही, परिस्थिती जशी होती तशी बिकट आहे क रू शकत नाही. उत्पन्नाचे स्त्रोत कमी खर्चाचा स्त्रोत दर वर्षी 10% पेक्षा जास्त वाढत चाललेला आहे. साहेब ह्या वर्षामध्ये तुम्हाला 2020-21 मध्ये सुध्दा आम्ही सुधारित अर्थसंकल्पाचा अंदाज घेतला तर 42% जास्त आहे. जेव्हा ॲक्च्युअल आपल्या हातामध्ये येईल कारण ह्या गे ल्या वर्षातला अजून आलेला नाही. ह्या वर्षाचे ॲक्च्युअल आपल्या समोर येईल तेव्हा परिस्थिती भयंकर बिकट असणार आहे. कारण हा वर्षे खरं तर महापौर मॅडम, आयुक्त महोदय, हा आपल्याला कोरोना वर्षे म्हणून जाहिर केला पाहिजे. साहेब दुसरी परिस्थिती समोर आणतो. आज आपल्याकडे आस्थापनेवरचा खर्च हा महापौर मॅडम, प्रामुख्याने मुद्दा आहे. आपले याच्यावरती लक्ष केंद्रीत करू इच्छितो. आमच्या स्थायी आस्थापनेवरचा खर्च 114 करोड 13 लाख 46 हजार रुपये आणि अस्थायी आस्थापना म्हणजे कॉन्ट्रॅक्ट लेबर त्याच्यामध्ये प्रामुख्याने सुरक्षा रक्षक , आपले वृक्षप्राधिकरण उद्यान वगैरे विभागासाठी मजूर पुरवठा आणि आरोग्य विभागावरती सर्वात जास्त साहेब याचा खर्च आपल्या वरती पडत आहे. 341 कोटी 49 लाख 50 हजार रुपये एकत्रित आपल्याकडे 445 कोटी 28 लाख 41 हजार रुपये हा खर्च पडतो. स्थायी व अस्थायी आस्थापनेचा सोहब मुळ अंदाजपत्रकामधून तुम्हाला फक्त 35% खर्च करता येते, आस्थापनेवर आमचा खर्च 37 कोटीने जास्त आहे. पुढच्या वर्षामध्ये हा अर्थसंकल्पामधला अंदाज आपला आस्थापनेवरचा खर्च अजून वाढणार आहे म्हणून परत परत ह्या जी .आर. नुसार तुम्हाला ग्वाही देत आहे. ह्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे. बांधकामवार खर्च करू नये, नवीन पदे भरू नये, सगळे काही दिलेले आहे. सर्व स्पष्टरुपी केलेले आहे त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे आपल्याला साहेब करावी लागेल कारण तुमची आमची मजबुरी आहे. चालू वर्षामध्ये आपण पतर मालमत्ता करावर येवू चालू वर्षामध्ये महापौर मॅडम, तुम्हाला आणि आम्हाला चांगले माहिती आहे की, हा मालमत्ता कर आपल्याकडे वसूल होऊ शकत नाही, असे होणार साहेब तुम्ही आणि आम्ही एकत्र बसून निर्णय घेतला मालमत्तेत 100% सूट देऊ, पाणीच्या बिलामध्ये सूट देऊ मी म्हणतो 100% माफ करा. मालमत्ता 1100 कोटी आपल्याकडे, दुसरा 82

कोटी रुपयाचे पाणी पुरवठाचा विषय आहे . 100% त्यांना सूट किती पाहिजे साहेब , करताना ते कसे करता येईल त्याचे ही तुम्हाला पर्याय दाखवतो , आपल्याकडे निधी तिथून नाही उपलब्ध झाली तर आपल्याकडे बाकीच्या जागेवर निधी त्याचा कायदा डायरेक्ट लोकांना आपण पोहचवू शकतो कारण कुठेतरी आर्थिक मदत महानगरपालिकने खरं तर कोरोनाच्या प्रादुर्भावामध्ये केली पाहिजे लोकांचे खायचे वांदे झालेले आहेत. कामकाज आजही बंद आहेत. पुढच्या 5 महिन्यामध्ये कामकाज कसे सुरू होईल हे सांगणे कठीण आहे . ट्रेन अजून सुरू नाहीत , ट्रेन कधी सूरू होतील हे सांगता येत नाही, प्रादुर्भाव कमी होईल, नाही होईल हा एक प्रश्न चिन्ह आहे. साहेब, हस्तांतरणाचा विषय आपल्याकउक आहे कर्ज आपण विसरलो आपण भरपूर कर्ज घेतलेले आहेत , आपल्याला कर्जाचे हफ्ते भरावेच लागतील. आजच्या तारखेत 240 कोटी 37 लाखाचे कर्ज आपल्या डोक्यावर आहे. वार्षिक म्हणजे 41 कोटी रूपये आपण त्याचा हफ्ता करतोय हे कसेही करून आपल्याला कर्ज पूर्ण करावे लागणार GST मधून काय उत्पन्न येणार आहे माहीत नाही , बाकीच्या परिस्थितीत तुमचे उत्पन्नाचे स्त्रोत राहिलेले नाही. गेल्या वर्षामध्ये मालमत्तावर कमी जमा झाला , पुढच्या वर्षामध्ये मालमत्ता कर किती येणार आहे ते सांगणे कठीण आहे. साहेब, सर्वसाधारण मालमत्ता कर तुम्ही कव्हर करू शकाल आमची मांग असेल तर वृक्षप्राधिकरण, अग्निशमन विभाग, शिक्षण विभाग हा सगळा प्रकार आपल्या जागे वरती आहे.

मा. महापौर :-

इतर सदस्यांना सुध्दा बोलायचे आहे.

जुबेर इनामदार :-

साहेब, हस्तांतरणाचा विषय आहे , आपल्या अर्थसंकल्पामध्ये महिला बालकल्याणला करतो , वृक्षप्राधिकरणला करतो, साहेब, हे हस्तांतरण ह्या वर्षी आपल्याला थांबवावे लागतील, ह्याला थांबविणे गरजेचे आहे तुम्ही हस्तांतरण थांबविले तरच सगळ काही चालेल साहेब , 6 महिने काही न करता आपले कामकाज चाजू आहे , असलेले राहिले किती 6 महिने ह्या पुढचा 6 महिन्यामध्ये आपल्याला जगून जगायचे आहे . लोकांना घेऊन चालायचे आहे . साहेब हस्तांतरणाचा विषय आहे , हस्तांतरण आपल्याकडे, परिवहन, पाणी पुरवठा विभाग , महिला बालकल्याण विभाग , वृक्षप्रधिकरणला "अ" बजेटमधून मुळ बजेट मधून हस्तांरण करतो कुठे तरी थांबवायला पाहिजे , हे कुठे तरी थांबले तर आपले बाकीचे अर्थसंकल्पावर त्याचा परिणाम चांगला पडेल. निधी कमी दिली, खर्च कमी करतील खर्च कमी होईल हे वर्षे फक्त आणि फक्त कोरोना वर्षे याच्या पलीकडे कुठलाही निर्णय ह्या वर्षी तर घेतला नाही पाहिजे. साहेब, ही माझी स्पष्ट भूमिका आहे. निधी कधी उपलब्ध होईल बाकीची कुठली आपल्याला कामच करायचे नाहीत, आपल्याला कामे थांबवायची आहेत. मला तर वाटत नाही कुठला ही सदस्य तुम्हाला ठिक आहे आम्ही आगृह करू श्रीम . निलम ढवण मॅडमने जसा आगृह केला तसा मी सुध्दा तुमच्याकडे येवून करणार आहे मात्र......

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य श्री. जुबर इनामदार साहेब, तुमचा जर ठराव असेल तर तुम्ही मांडा.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, मला अजून पाच मिनिट बोलण्याची संधी द्या . माझा विषय संपत आलेला आहे.

मा. महापौर :-

नाही देऊ शकत, इतर लोकांना बोलायचे आहे, थोडक्यात बोला.

जुबेर इनामदार :-

मला कल्पना आहे , व्हिडीओ कॉन्फन्सवर चाललेले आहे म्हणून मला लवकरात लवकर आटोपायला पाहिजे तरी ही आयुक्त महोदय , ह्या वर्षामध्ये महापौर मॅडम, आपला करं तर बांधकाम

विभागामध्ये जो खर्च असतो तो आपल्या ला कुठे तरी आटोक्यात आणायला पाहिजे . साहेब, आपल्याकडे प्रभाग निधी, नगरसेवक निधी, महापौर निधी, उपमहापौर निधी, बरेच काही आपल्याकडे नगरसेवकाच्या माध्यमातून विकसीत करणात होतो ते सगळे उद्याने , मैदाने याला सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये भरपूर निधी राखीव ठेवली हो ती ती तुम्हाला ह्या वर्षाची निधी बाजुला करावी लागेल, हा पुढचा वर्षी आपल्याला सगळ काही ढकलता येईल . परमेश्वर करो हे वर्षे लवकरात लवकर संपो हे वर्षे संपले तर आम्ही पुढच्या वर्षामध्ये काही तरी नवीन हा कोरोना संपला तर आपल्याला नवीन काही तरी करात येईल ही अपेक्षा आपण परमेश्वराला करू शकतो तसेच महापौर मॅडम , आपल्याकडे आता निधीची कमतरता आहे. राज्य शासनाने आपल्याला त्यांच्या सूचनाच्या माध्यमातून आपल्याला पाठविलेले आहे . निधी तुमच्याकडे कमी आहे , तुम्हाला निधी कमी प्राप्त होणार आहे . आता मे 14-2020 म्हणजे हे चालू वर्षामध्ये कोरोनाच्या परिस्थितीमध्ये ह्या देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र दामोदर मोदी साहेबांनी एक कोरोनाचे पॅकेज डिक्लिअर केले. 20 लाख कोटी रूपयाचे पॅकेज डिक्लिअर केले होते. महापौर मॅडम, तुम्ही बी.जी.पी. चे महापौर आहात . मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये बी.जी.पी. चे शासन आहे, केंद्रमध्ये बी.जी.पी. सरकार वर आहे. ह्या महानगरपालिकेसाठी जास्त पैसे मागू नका, केंद्राकडून त्या 20 लाख कोटी मधून तुम्ही फक्त 0.01 टक्के जास्त नको आहे.

मा. उपमा. महापौर :-

जुबेर इनामदार भाई अपना मिरा भाईंदर छोटासा है, केंद्र पे मत जाईऐ।

जुबेर इनामदार :-

मै छोटीसी रक्कम माँग रहा हूँ और उसकी डिटेल भी देता हॅ।

मा. महापौर :-

जुबेर इनामदार साहेब, तुम्हाला बोलायला संधी दिली, तुम्ही बजेटवर बोला. इथे नगरसेवकाना पण बोलायचे आहे, केंद्रानी जी रक्कम दिली असेल ती राज्य शासनाला दिलेली आहे . राज्य शासन योग्य निणी मिरा भाईंदर शहरासाठी देत आहे ते सुपूर्त करणार आहेत असे आश्वासन मा . मुख्यमंत्री महोदयांनी त्यावेळी त्याच्या निवेदनात केलेले आहे त्यावेळी तुम्ही पण त्याठिकाणी उपस्थित होतात.

जुबेर इनामदार :-

आपल्याला ह्या वर्षामध्ये आमच्या पक्षाच्या वतीने स्पष्ट मांग आहे.

मा. महापौर :-

तुम्ही तुमचा ठराव मांडू शकता.

जुबेर इनामदार :-

मी आमचा ठराव मांडणार आहे , ह्या चालू काँग्रेस पक्षाच्या वतीने मांग आह , ह्या चालू वर्षामध्ये मालमत्ता करामध्ये 100% सूट पाणी बिलामध्ये 100% सूट देण्यात यावी, वाणिज्य भत्ता त्यांना 50% सूट देण्यात यावी , मालमत्ता करामध्ये सुध्दा आणि पाणीपट्टीमध्ये दुसरं गेल्या वर्षी 2019-20 मध्ये ज्या लोकांनी मालमत्ता कर भरलेला नाही त्यांच्यावरती कुठलाही प्रकारचा व्याज लावू नये. तुम्ही खरोखरच सिरीयस असाल तर ह्या अर्थसंल्पामधून तुम्हाला ती तरतूद काढावी लागेल , तुम्ही ती तरतूद काढली नाहीत तर याचा अर्थ होईल तुम्ही लोकांची फसवणूक करत आहात . तुम्ही केलेल्या गोष्ट खोट्या आहेत.

मा. महापौर :-

तुम्ही जी मागणी केलेली आह ती मा . मुख्यमंत्र्यांनी आदेश दिलला आहे आणि लेखी पत्रातून निवेदन सुध्दा दिलेले आहे त्याची बैठक झालेली आहे . वेळोवेळी त्याबाबत आपण चर्चा केलेली आहे त्यानुसारच आजचा हा विषय इथे आलेला आहे . सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील यांना मी परवानगी देत आहे त्यांनी निवेदन करावे.

निलम ढवण :-

मॅडम मला बोलण्याची संधी द्या.

मा. महापौर :-

धृवकिशोर पाटील साहेब तुम्हाला ठराव मांडायचा आहे का ? का चर्चा करायची आहे ? सन्मा सदस्या श्रीम. निलम ढवण ताई यांना मी परवानगी देते.

निमल ढवण :-

धन्यवाद मॅडम, पहिल्यांदा सभेला जेव्हा सुरूवात झाली, तेव्हा देखील टॅक्स संदर्भात हा विषय झाला होता परंतु आम्हाला म्यूटवर ठेवलेले असल्या कारणाने त्या संदर्भात आम्हाला त्यावेळी बोलता आले नाही म्णून आता ह्या एकंदरीत याच्यामध्ये कोरोना परिस्थितीमध्ये जो टॅक्स आहे , पाणीपट्टी आहे ती आम्हाला शिवसेना पक्षाच्या वतीने देखील 100% रद्द करावी म्हणजे घेवू नये आणि नगरसेवकांना दिलासा द्यावा. त्यासाठी जो आपला बजेमध्ये काही फरक पडत असेल आणि त्यामुळे ज्या बजेटवर आपल्याला काही परिणाम होत असेल तर त्यासाठी वेळोवेळी राज्य सरकारने आपल्याला जसे मागितले त्या नुसार निधी पालकमंत्री साहेब , असूदेत, आमदार साहेब असू देत , खासदार साहेब सदस्यांनी इथे आणून दिलेला आहे आणि त्याच प्रमाणे बजेटमध्ये जर तरतुदीम ध्ये अजूनही आपल्याला गजर असेल तर आपले आमदार , मुख्यमंत्र्यांनी देखील आपल्याला वचन दिलेले आहे जर निधी तुम्हाला जो लागेल तो मी पुरवायला तयार आहे त्यामुळे आपण निधीचा विचार न करता नागरीकांच्या सोयीसाठी कोरोनामध्ये वेठीस गेलेले सगळे नागरीक त्यांना दिलासा मिळण्या साठी 3 महिन्याचा टॅक्स असुदेत, पाणी पट्टी असूदेत जे आहे ते पूर्णपणे कॅन्सल करून नागरीकांकडून न घेता ती महानगरपालिके मार्फत आपण त्यांना फक्त 50% सूट न देता 100% सूट द्यावा आणि एक दिसाला द्यावा जनतेच्या पाठीशी खंबीरपणे आपण सगळी जण मिळून ऊभे राहूया आणि त्यासा ठी आपण ते 100% सूट द्यावी अशी आपणांस शिवसेना पक्षाच्या वतीने विनंती करते.

मा. महापौर :-

श्री. चंद्रकांत वैती साहेबांना बोलायचे आहे का? चंद्रकांत वैती सोहेबांना मी बोलायची परवानगी देते.

चंद्रकांत वैती :-

असे आहे की, सगळयांकडून ज्या मागण्या होत आहेत म्हणजे आपण पण एक मागणी ठेवली की, टॅक्स मध्ये सवलत दिली पाहिजे. आता पाणीपट्टीत आली ही मागणी लोकप्रीय मागणी होऊ शकते परंतु कायदा ह्या गोष्टी नक्की मान्यता देणार नाही . म्हणजे आपण आज काही तरी करतो आणि उद्या प्रशासन तो ठराव विखंडीत करण्यासाठी पाठवणार मग ठराव विखंडन होऊन आल्यानंतर काय करणार, आल्यानंतर त्याचा इफेक्ट लोकांवर येणार नाही आपण ह्यासाठी अधिकाऱ्यांशी चर्चा करावी आणिजो अधिकाधिक लाभ देता येईल आपण काय 100% सूट सांगितली तर 100% सूट देण्याचे प्रावधान कायद्यात नाही , एवढी गोष्ट लक्षात ठेवा कारण काय आपण काही तरी करू आ णि त्या लोकांसाठी आपण मागणी करत आहोत त्यांना त्याचा फायदा होणार नाही म्हणजे लोकांमध्ये एक आशा जागृत मग तो दोष कोणावरती येणार तर तुमच्या आमच्या सारख्या लोकप्रतिनिधीवरती येणार की, तुम्ही सभागृहात जी मागणी केली होती मग का पुन्हा त्याचा आपण पाठपुरावा करणार का आणि पाठपरावा केला तर यश मिळेल का ? संभव नाही कदाचित राज्य शासनाकडून अधिक आपल्याला सवलत कशी घेता येईल याच्यामध्ये पण याला अधिकारी शासन आणि प्रशासन दोघांमध्ये जर व्यवस्थित संवाद झाला नाही एकमेकांचे मान्यता झाली नाही तर आपल्याला असे काही करता येणार नाही. टॅक्सच्या बाबतीमध्ये आपण सांगतो की , आपण सूट देवू व्याजामध्ये सूट देवू तसे पाहिले तर व्याजामध्ये सूट देण्याचे 10% अधिकार आयुक्तांना आहेत परंतु आयुक्तांकडे बसून आपण त्याच्या मधोमध्य साधला पाहिजे की , आपल्याला पाहिले काय करता येईल . तुमची जर याबाबत चर्चा झाली

असेल तर चांगली गोष्ट आहे, नसेल तर अजित मुठे साहेब हे अनुभवी आहेत आणि त्यांच्याशी चर्चा करावी. आताच आपापसात चर्चा करून घ्या की , आपल्याला जास्तीत जास्त काय सूट देता येईल किंवा ठराव करताना अधिकाधिक जो लाभ नागरिकांना देता येईल अशा प्रकारचा ठराव करावा नाही तर यांनी 100% शिवसेना किंवा काँग्रेस आमचे मित्रपक्ष 100% ची सूट मागतील आपण 50% चुकीचा ठराव मांडू आणि खरं तर 50% आणि 100% दोन्ही आकडे माफ होणार नाहीत . म्हणजे मान्य होणार नाही. द्यायला पाहिजे मग आणखीन कुठची गोष्टीमध्ये आपण नागरीकांना लाभ देऊ शकतो याचा विचारविनिमय झाला पाहिजे. एक गोष्ट आहे त्रिकालाबाधीत सत्य आहे पैशाचे सोंग करता येत नाही, त्याच्यामध्ये आपल्याला पैसे येतील हा महत्त्वाचा प्रश्न आहे . जातील कसे त्याला खूप मोकळ्या वाटा आहेत. आस्थापनेवरचा खर्चाला 50% पेक्षा अधिक आपला खर्च आहे. जो 42% असावा असे संकेत आहेत परंतु आपले ते खर्च स्थायी खर्च जे आहेत ते होतच राहणार आहेत . आपल्याला खर्च कमी कुठे करता येतील या बजेटमध्ये विचार झाला पाहिजे अशी माझी आपणांस विनंती आहे.

मा. महापौर :-

नक्कीच चंद्रकांत वैती साहेब.

चंद्रकांत वैती :-

धन्यवाद !

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या गिता जैना मॅडम यांनी हात वर केलेला आहे मी त्यंना बोलण्याची परवानगी देते.

गिता जैन :-

धन्यवाद मॅडम, मला वाटले मला जे सांगायचे होते त्यातले काही चंद्रकांत वैती साहेबोनीच सांगितले आहे. एक गोष्ट खरी आहे की, आपण विनाकारण खुप सारा पैसा खर्च करत आहोत, मग ते कुठल्याही बांधकामात असूदेत उद्यानात असू देत आता लेटेस्ट टेंडर निघाले ते बघणार तर आपल्याला दिसून येणार की , आपल्याला ज्या ज्या गोंष्टी एवढी गरज नाही त्याचे ही टेंडर आपण काढले आहे. इथे जर बेलवटे साहेब असतील तर मला माहिती पाहिजे की , अजून आपली थकबाकी किती आहे? आपणाला देण्याचे बील किती आहे. आपण फक्त नवीन सुरू करत आहोत , लोक इथून तिथून ओरडत आहेत की , आमचे बील होत नाही . जेव्हा बेलवटे साहेबांना विचारायला जातो तर सांगतात बील द्यायला पैसे नाहीत, झालेले काम द्यायचे जर आपल्याकडे पैसे नसतील तर मला असे वाटते की, नवीन कामात आपण कुठे तरी खूप बारीकीने नजर ठेवून जे खूपच महत्त्वाचे काम आहेत ते आपण करूया आपण जे 100% करत आहोत ते बिलकूल प्रॅक्टीकल नाहीच आहे. मला असे वाटते की तुम्ही कुठले तरी त्याला बायफरकेशन करावे . बेलवटे साहेब, तुम्ही रोज मला सांगत असतात बायफरकेशन करावे, शासनाचा जी.आर पण मध्ये आलेला होता की , आपल्याला 500 स्क्वेअर फुट जागेचा कमी नंतरचे जे आहेत इमारती त्यांना आपण 30% किंवा 20% सूट द्यावी असे काही तरी बायफरकेशन केले तर मला वाटेल कुठेतरी असे बायफरकेशन आणावे, जेणेकरून गरीब जनतेला जास्त फायदा मिळणार 500 च्या खालीला तुम्ही जास्त पर सेनटेजमध्ये सवलत दिली आणि त्यांनतर मोठी सदनिकाला जर तुम्ही 20-20 परसेंट सवलत दिली तर मला वाटते की, प्रॅक्टीकल जे असेत ते तुम्ही पाठवू शकाल आणि कदाचित ते मान्य ही होणार आहे . 100% तुम्हाला आम्हाला सगळ्यांना माहीत आहे होणार नाही . उद्या पेपरात प्रसिध्दी होणार की, महासभेत टॅक्स माफ झाले आणि ते होऊन येणार नाही तेव्हा परत तो रोष आपल्यालाच सामोरे जायचे आहे , तर माझी अशी पॅक्टीकली सलाह आहे की, तुम्ही तसे करू नये बेलवटे साहेब, आपली थकबाकी किती आहे ते आता आपल्याकडे आकडा आहे का? हरकत नाही साहेब, आकडा नसेल तर तरी ही मला परिस्थितीचे थोडे से तरी ज्ञान आहे

की, त्या हिशोबाने आपल्याकडे भरपूर थकबाकी आहे त्या थकबाकीचाही विचार करावा कारण ते बील त्यांची कामे झालेली आहेत ते आपण थांबवू शकत नाही कारण ते काम ऑलरेडी झालेले आहे . नवीन काम देतांना चंद्रकांत वैती साहेबांनी ही सांगितले की , तुम्ही त्यात पण लक्ष घाला आपल्याकडे जी.आर. पण आलेला आहे त्या नियमानुसार आपल्याला ते कामे सिलेक्ट करायची आहेत . मग मला असे वाटते अधिकारी आणि आपण सर्व बसून ते काम सिलेक्ट करा. आत ह्या शहराला लागेच कुठले काम गरजेचे आहे आणि अननेसेसरी तसे तुम्ही कमीत कमी करू शकता शहरात दोन दिवस जे बोंबाबोंब चालू आहे. दैनिक सिक्युरिटी सैनिकचे बॉन्सर मर्लीनजीला तुम्ही बोलायला संधी दिली नाही पण ते लिहीत आहेत की, सैनिक सिक्युरिटी आपल्याला कशाला हवी आहे. आपल्याला एक सिक्युरिटी प्रायव्हेट सिक्युरिटी कशाला पाहिजे, दोन तीन दिवस आयुक्त साहेब आपल्याला पण खुपसारी कम्प्लेंड आलेली आहेत त्या सैनिक सिक्युरिटीने जे लूटमार चालविलेली आहे आणि ता लूटमार चालवायला आपण त्यांना पगार देतोय ते कुठे तरी थांबवावे आणि असे बहुतेक जे अननेसेसरी खर्च आहे त्याला तुम्ही कुठे तरी थांबवा जेणे करून आता जे कोरोनामुळे आ पली आर्थिक परिस्थितीवर जो परिणाम झालेला आहे त्याला आपण खंबीरपणे उभे राहून जबाव देवू शकू महापौर मॅडम धन्यवाद !

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या जैन मॅडमने जी सुचना केलेली आहे तो अनावश्यक खर्च आता जो कोरोना काळ चालू आहे तो थांबवावा . त्यांच्या सुचनेचा विचार करावा. सन्मा. सदस्य श्री. धृवकिशोर पाटील साहेब यांनी हातवर केला होता मी तुम्हाला परवानगी देते तुम्ही बोलू शकता.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, जुबेरजी आपके लिए एक शेर यकीन हो तो कोई भी रास्ता निकलता है हवा की और लेकर चिराग भी जलता है| महापौर मॅडम बजेट हा एक परवेचा शब्द असतो आणि प्रत्येकाला तोडी असतो. बजेटमध्ये उत्सुकता असते , राज्याचे बजेट असते , देशाचे बजेट असते . महापालिकेचे बजेट असते. प्रत्येकाला उत्सुकता असते. तुम्ही बघितले असाल की एक कॉलेजचा युवक जरी तो एक बजेट बनवतो गृहिणी सुध्दा एक बजेट बनविते. बिझनेसमेन बजेट बनवतो, मार्केट वर्ग बजेट बनवतो की आपल्याला किती उत्पन्न आहे आणि आपल्याला किती खर्च करायचा आहे. प्रत्येकला एक कसरत असते की आलेल्या उत्पन्नामध्ये आपल्याला तो खर्च भागवायचा असतो . प्रत्येकाला एक स्वप्न असतात की मला पण ही गाडी घ्यायची आहे , मला पण कपडे घ्यायचे आहेत, मला पण तरक्की करायची आहे. पण प्रत्येक माणूस जो असो हा त्या बजेट प्रमाणे काम करतो. जर नसेल तर तो लोन घेऊन करतो आणि त्याची ती परतफेड करतो . म्हणजे प्रत्येकाचा एक बजेट असतो त्याप्रमाणे महापालिकेचाही आपण एक अंदाज बांधतो की गेल्यावर्षी आपल्याला एवढे इनकम झाले होते. ह्यावर्षी गेल्यावर्षी एवढा खर्च झाला होता . आपल्याला ह्यावर्षी प्रत्येकाचा बजेट असतो त्याप्रमाणे महापालिकेमध्ये सुध्दा आपण एक बजेट करतो . माझे मित्र जुबेर इनामदार ह्यांनी पण सांगितले जुबेरजी माझ्या बरोबर दोन वेळा स्टॅन्डिंग कमिटीमध्ये होते . दोन्ही वेळा बजेटमध्ये चर्चा करताना एकदम व्यवस्थित हेडव्हाईज आम्ही चर्चा केली . प्रत्येक हेडमध्ये महापालिकेचे कर्मचाऱ्यांना आपण सुचना पण दिल्या की ह्याच्यामध्ये आपले उत्पन्न कमी का झाले याच्यामध्ये आपला खर्च कसा वाढवा. तर आपले काम असते जे प्रशासनाने बजेट दिलेले आ हे त्या बजेटमध्ये सविस्तर चर्चा करुन ते बजेट आपण पुटअप करतो. गेल्या दोन वर्षामध्ये आपण पण होतात. आपल्याला पण माहित आहे की टॅक्समध्ये अशी कितीतरी प्रकरण आहेत की ज्याच्यावरती अजून टॅक्स असेसमेंट झालेली नाही . अशा अनेक बिल्डींग आहेत अनेक इमारती आहेत . अजूनपर्यंत त्याच्यामध्ये टॅक्स असेसमेंट झालेली नाही. आपली ही जी टॅक्स असेसमेंट ही वर्षानुवर्षे त्या ह्याच्यावर चाललेली आहे. आज लोकांची छोटी घरे होती ती लोकांनी मोठी केलेली आहेत . त्याचा अजून सर्व्हे झालेला नाही . अजून ह्याच्यावरती इम्पलीमेंटेशन झालेले नाही. तुम्ही आज जे बोलतात की, 20 लाख करोड रुपये आदरणीय पंतप्रधान,

मा. नरेंद्र मोदीजीने जाहिर केलेले आहे. तुम्ही जरा तुमच्या सरकारला विचारा की किती पैसे आलेत. साहेब 2 लाख 70 करोड रुपये महाराष्ट्र गर्व्हमेंट डायरेक्टली आणि इनडायरेक्टली रेस करु शकते . आज केंद्र सरकारने जाहिर केले पंतप्रधानांनी दिलेले आहेत, राज्यात दिलेले आहेत. प्रत्येक राज्याची पॉप्युलेशन प्रत्येक राज्याला असलेली रिक्वायरमेंट त्यानुसार दिलेले आहेत. 78 हजार करोड रुपयाची सबसिडी दिलेली आहे. 28 हजार करोड रुपये पंतप्रधान ह्यांनी 3 महिन्यामध्ये आपल्या महाराष्ट्र सराकरला दिलेले आहे. पण महाराष्ट्र सरकारने मिरा भाईंदर महापालिकेला किती दिले हा प्रश्न आपण विचारायला पाहिजे होता सर पण तो तुम्ही विचारला नाही . आपण बजेटमध्ये बोलतात प्रत्येक गोष्टीचा ऊहापोह केला. परंतु त्याच बरोबर महाराष्ट्र गर्व्हमेंटने आपल्याला काय दिले . त्या दिवशी आदरणीय महापौर मॅडम यांनी मा . मुख्यमंत्री साहेबांना सांगितले की मिरा भाईंदर महापालिकेसाठी सुध्दा आपण फंड द्यावा. मुख्यमंत्री साहेब बोलले की जसे केंद्र आम्हाला देईल तस मी तुम्हाला देईल. म्हणजे याचाच अर्थ काय केंद्राकडून ते अपेक्षा करतात. आणि केंद्राने दिलेले आहेत. तुम्ही बघा आता मी गुगलवरती सर्च करुन बघितले की महाराष्ट्र गर्व्हमेंटला सेंट्रल गर्व्हमेंटने किती फंड दिला तो आपल्या निलमताई बोलल्या की कला दालन हा विषय निलमताईने सांगितले की प्रमोद महाजन हे आमचेच होते. प्रमोद महाजन साहेबांची युती झाली मॅडम ज्या वेळी प्रताप सरनाईक साहेब आपले सत्तेमध्ये होते आणि मुख्यमंत्र्यांकडून फक्त त्यांनी बाळासाहेब ठाकरे कलादानलाकरिता अनुदान आणले. प्रमोद महाजन कलादालनासाठी का आणले नाही . फक्त एकासाठीच आणले आणि आमची बघा किती मोठी मन आहेत की, महापालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये आयुक्तांनी फक्त 5 कोटीची तरतुद ठेवली होती आम्ही ती 25 कोटीची केली आणि प्रताप सरनाईक साहेबांचे पत्र आहे की बाळासाहेब ठकारे कलादालना करिता मी 25 करोड रुपये अनुदान महाराष्ट्र राज्य शासनाकडून आणणार . प्रमोद महाजन कलादालनासाठी का आणले नाही असा त्यांनी का भेदभाव केला . परंतु आम्ही भेदभाव केला नाही आम्ही दाखवून दिले ह्या बजेटमध्ये 25 करोड रुपये तरतुद आम्ही केली. 5 पट जास्त केली. आयुक्तांपेक्षा जास्त केली आणि आमच्यासाठी आम्ही फंड कमी ठेवला फक्त 15 करोड रुपये ठेवला. आदरणीय उध्दव साहेब मुख्यमंत्री त्यांना ही माहिती आहे की प्रमोदन महाजन हे खुप उच्च दर्जाचे नेते आहेत त्यांच्या कलादालनासाठी त्यांनी द्यायला पाहिजे होते पण त्यांनी ते सॅक्शन केले नाही . फक्त बाळासाहेब ठाकरे कलादालनासाठी सॅक्शन केले हे तुमच्या माहितीकरिता सांगतो . दुसरी गोष्ट जुबेरजी तुम्ही बोललात मिरा भाईंदर महापालिकेची आर्थिक परिस्थिती हालाकीची आहे. जुबेरजी 2002 पासून तर 2015 पर्यंत ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी आणि कॉंग्रेस पार्टीचे सरकार होते . तत्कालीन महापौर तुळशीदास म्हात्रे साहेब होते . त्यावेळी पण आपण बजेट बनविला होता . त्यावेळी आपला बजेटमध्ये आपण जे आयुक्तांनी अंदाज सादर केला होता त्याच्यामध्ये सुध्दा आपण वाढ केली होती. आज 50-50 टक्के, 40-40 टक्के, 30-30 टक्के आपण सुध्दा वाढ केली होती. आज तुम्ही म्हणालात की स्थायी आस्थापना आस्थापनाचा खर्च वाढत चालला आहे साहेब हा खर्च आजचा नाही हा खर्च पुर्वीपासून वाढत चालला आ हे. ज्या ज्यावेळी स्टॅन्डिंग कमिटीमध्ये हा विषय येतो त्या त्या वेळी आपण सुध्दा त्याला अनुमोदन देतो. आपल्याला पाठिंबा देता. आपण ही त्या ठरावाला पास करायला सपोर्ट करतो. जर सपोर्ट करता मग त्यावेळी हा विचार आपण करायला पाहिजे होता की, आपला खर्च वाढतो परंतु नाही आपल्या महापालिकेचा प्रत्येक नगरसेवक प्रत्येक सदस्य ज्या ज्या वेळी कर्मचाऱ्यांचा प्रश्न येतो त्या त्या वेळी आपण त्यांना सपोर्ट करतो आणि त्या त्या वेळी आपण त्यांना हे करतो. दुसरी गोष्ट आपण सांगितले की हस्तांतरण थांबविले पाहिजे. आज जर आपण हस्तांतरण थांबवले तर आपल्या शहराला पाणी मिळणार नाही . महापालिकेच्या मुळ बजेटमधून आपण पाणी विभागाला हस्तांतरण करतो. त्यावेळी ते पाणी आपल्याला सुरळीत येते. आता निलमताई बोलल्या की, मिरा भाईंरची जनतेसाठी परिवहन सेवा गरजेची आहे. जर आपण मुळ बजेटमधून परिवहन सेवेला जर बजेट ट्रान्सफर केला नाही तर आपली परिवहन सेवा चालणार नाही . एका ठिकाणी एक बोलतात

आणि दुसऱ्या ठिकाणी दुसरे बोलतात . हे तुम्हाला पाहिजे ते तुम्हाला पाहिजे मग अंदाजपत्रकातून हस्तांतरण करणे गरजेचे आहे . ज्यावेळी आपण खुर्ची बदलतो त्यावेळी आपल्याला कळते की ॲक्च्युअली परिस्थिती का य असते. ह्याच्यावरती तुम्हाला आणखीन एक शेर सांगतो आप गैरो की बात करते है , हमने अपने भी अजमाये है , लोग काटो की बात करते है हमने तो फुलो से भी चकमकाए है| जुबेरजी ऐसी बात है आपण अंदाजपत्रक ज्यावेळी करतो ज्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि काँग्रेस पार्टी ची सत्ता होती त्यावेळी सुध्दा आपण टॅक्स वाढविण्यासाठी प्रस्ताव आणला होता आणि त्यावेळी तत्कालीन विरोधी पक्षनेते नरेंद्र मेहताजी होते . त्यावेळी त्यांनी तो प्रस्ताव रद्द करुन शासनाकडून आणला होता. कारण की ती आपली टेक्नीक चूक होती म्हणून तो प्रस्ताव रद्द झाला होता म्हणजे ज्यावेळी तुम्ही एका विरोधी पक्षनेता बाकेवरती बसतात त्यावेळी आपली भुमिका वेगळी असते आणि ज्यावेळी सत्ताधारी याच्यावरती बसतात त्यावेळी आपली भुमिका वेगळी असते. आमदार गिता मॅडम बोलल्या की, खर्च हा कमी करायला पाहिजे. आज तुम्ही सांगा हे बरोबर आहे की आप ला खर्च आपण कमी केला पाहिजे. आपण बोललात बांधकामावरचा खर्च आटोक्यात आणला पाहिजे तर 100 टक्के बांधकामवरचा खर्च आटोक्यात आणा . परंतु जे काम आपण सुरु केली आहेत आज जे सिमेंट काँक्रीट रोडचे काम चालू आहेत आज जर ते आपण अर्धवट ठेवले तर नागरिकांना सुध्दा गैरसोय होईल. आपण आपली जी गटारे सुरु केलेली आहेत ते जर थांबवले तर त्याचा त्रास आपल्या मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील नागरिकांसाठी होईज जे गार्डनची काम आपण सुरु केली आहेत जी विकास कामे आपण सुरु केली ते जर आपण थांबवली तर नागरिकांना गैरसोय होईल म्हणून आपले जे काम असते एक नैतीक जबाबदारी असते जे आपण सुरु केलेले काम आहे ते आपले काम हातात घेतले पाहिजे. आपण सगळी सोंग आणू शकतो पण पैशाचे सोंग आणू शकत नाही . हे तुमचे आमचे सगळ्यांचे काम आहे. आज प्रमोद महाजन सभागृह आपण बनविले , मिनाताई ठाकरे सभागृह आपण बनविले. आज ते सभागृह म्हणून आ ज आपल्याला कोव्हिड सेंटर आय .सी.यू वॉर्ड तिथे उभा करता आला. हे जर आपण बनविले अनसे तर कस करता आले असते . ही दुरदृष्टी त्या वेळच्या राजकारणीकडे होती म्हणून त्यांनी केले. हे जर आपण नाही केले असते तर कसे झाले असते म्हणून खर्च काही गोष्टीकडून आपल्याला गरजेचे सुध्दा आहे आणि दुसरी गोष्ट की आर्थिक परिस्थिती आपली महापालिकेची त्याला कुठे ना कुठेतरी आपण सगळे सुध्दा जबाबदार आहोत . आपण ज्यावेळी सत्तेमध्ये होतो किंवा असतात त्यावेळी सुध्दा आपला खर्च आपण आटोक्यात आणला ही सिस्टम पूर्वीपासून चालू झालेली आहे. आज नाही नगरपरिषद अस ताना पासून ह्या सभागृहामध्ये नगरपरिषद सुध्दा बजेट घ्यायचे. महानगरपालिकेचा बजेट असायचा. प्रत्येक बजेटमध्ये आपण कुठेना कुठेतरी वाढ केली आपण चुकीची वाढ केलेली नाही. जर ह्याच महापालिकेच्या कर विभागाचे कर्मचारी म्हणा किंवा दुसरे कुठले कर्मचारी जर जीव तोडून त्या प्रमाणे आज आपण बोलतो त्याचप्रमाणे त्यांनी वसुली जर केली असती तर आज ही नोबत आली नसती. आणखी दुसरी गोष्ट तुम्हाला सांगतो की आज आपली सुध्दा सत्ता आहे तुम्ही बघा तुम्ही मागे जा 2015 ते 2017 आणि त्याच्या अगोदर 2014-15 म्हणजे 5 वर्षाच्या कार्यकाळामध्ये आमदार नरें द्र मेहता आणि देवेंद्र फडणवीस तत्कालीन मुख्यमंत्री असताना त्यांनी मिरा भाईंदर महापालिकेच्या जनतेसाठी मिरा भाईंदर महापालिकेला कितीतरी कोटी रुपये अनुदान म्हणून आणून दिले . साहेब आज हे तुमचे काम आहे निलम ताई तुमचे काम आहे . आज पालकमंत्री आपले आहेत. सत्ता काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादीचे आहेत. आज तुमचे मंत्री आहेत. तुम्ही ठणकाऊन सांगितले पाहिजे तुम्ही बिनधास्त कामे करा आम्ही आमच्या गर्व्हमेंटकडून अनुदान आणू. आम्ही आमच्या गर्व्हमेंटकडून निधी आणून देऊ. असे तुम्ही ठणकाऊन सांगितले पाहिजे. तुम्ही काळजी करु नका मान्य करतो तुम्ही आता जो जी.आर चा उल्लेख केला हा जी.आर माझ्याकडे आहे. 4 मे चा तुम्ही जर ह्या जी .आर मध्ये हे फक्त स्टेट गर्व्हमेंटसाठी आहे . महापालिकेसाठी नाही. त्याच्यामध्ये पाठीमागच्या पेजमध्ये बघा कुठेही महापालिकेला हा जी .आर अग्रेशीत केला नाही . हा

**जी.आर फक्त स्टे ट गर्व्हमेंटचा कन्सनसाठी अग्रेशीत केलेला आहे . हा महापालिकेला तसा लागु होत नाही. फक्त हा जो जी .आर आहे हा स्टेट गर्व्हमेंटसाठी आहे याच्यामध्ये बघा पाठी पानामागे बघा कुठेही म्हटले नाही की मिरा भाईंदर महापालिका आयुक्त किंवा कुठल्याही महापालिका आयुक्त असे म्हटले नाही. त्याच्यामुळे तुम्ही जे म्हणतात की ह्याचा तुम्ही जो दाखला दिला याच्यामध्ये काही अंशी बरोबर पण असेल परंतु आपले काम आहे आपली नैतिक जबाबदारी आहे की आपण हे काम करावे. त्याच्यानंतर दुसरी गोष्ट मी तुम्हाला सांगतो की आज जी .आर जरी असेल तसेच निलमताई बोलले हे प्रत्येक वेळी आपण आपआपल्या फायद्यासाठी आपण जी .आर ची हे करतो मॅडम कसे असते ज्यावेळी आपण एखादी गोष्ट करतो त्यावेळी कायद्यामध्ये जी तरतूद असते त्याप्रमाणे आपल्याला काही काम करावे लागते आणि जनतेसाठी रात्री आपली झोपायची वेळ असते पण कुठला एखादा जर फोन आला की इसको ॲडमिट करने का है, ॲम्ब्युलन्स दो लगेच ॲब्युलन्स पाठवतो की नाही म्हणजे आपण एवढे तत्परतेने काम करतो की नाही . तरी त्याप्रमाणे आपण त्याला कधी कधी जो जी .आर थोडासा करावा लागतो आणि आपल्याला ते करावे लागतात . तुम्ही आता म्हटले जुबेरजींना आणि निलमताई शिवसेना आणि काँग्रेस पक्षाची भुमिका आहे की पाणीप्टीमध्ये आणि हाऊस टॅक्समध्ये 100 टक्के सुट दिली पाहिजे. तुम्ही एखाद ठिकाणी म्हणतात की एवढा खर्च आहे तेवढा खर्च आहे मग आपण जर 100 टक्के सुट दिली तर हाव पॉसिबल. सरकार सर्वांना महापालिका सर्वांना डिफिकल्ट आपण शंभर नाही आप ण 200 टक्के सुट देऊ शकतो . तुम्ही तुमच्या राज्य सरकारकडून निधी आणला पाहिजे . आम्ही 50 टक्के सुट देऊ म्हणतो , 50 टक्के जी उरलेली आहे तुम्ही त्यांच्याकडून फंड आणा . 50 करोड आणा, 100 करोड आणा. आपण त्यांना आपल्या मिरा भाईंदर नागरिकांना आपण जास्त सवलत देऊ शकतो. परंतु तस ते पॉसिबल होत नाही. म्हणून माझी तुम्हाला सगळ्यांना विनंती आहे की आपण सगहे एकच आहोत तर आपल्याला ह्या सगळ्या गोष्टींचा ऊहापोह केला पाहिजे आणि मी तुम्हाला सांगतो की अख्या महाराष्ट्रामध्ये आणि अख्या ऑल ओवर इंडियामध्ये मिरा भाईंदर महापालिका ही पहिली महापा लिका आहे ज्यांनी 50 टक्के सुट मालमत्ता कराच्या घरपट्टीमध्ये सुट दिली आहे. बाकी अजूनपर्यंत कुठेही केलेली नाही. आपली ठाणे महापालिका तिथे आपली सत्ता आहे . तिथे केलेली आहे का ? नाही केली माझी तुम्हाला विनंती आहे की मिरा भाईंदर हे नंबर वन आहे . महापालिका ही आपली नं बर 1 राहील. जो आपण 50 टक्के सुट मा . उपमहापौर आणि मा. महापौर यांनी जाहिर केलेली आहे 50 टक्के सुट मालमत्ता करात कर घटपट्टीत करा. ह्याला आपण सगळ्यांनी मिळून सपोर्ट केला पाहिजे. सगळ्यांनी मिळून त्याला डन केले पाहिजे आणि एकमताने हा ठराव मंजूर झाला पाहिजे अशी मा झी आपणांस विनंती आहे.** मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक मा . स्थायी समितीने मंजुरीस शिफारस केलेली आहे.

- यावर्षी Covid-१९ कोरोना विषाणूजन्य आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यामुळे लॉकडाऊनच्या कार्यकालात शहरातील दैनंदिन कामकाज, औद्योगिक, लघु उद्योग, व्यवसाय धंदे ठप्प झाल्याने नागरीकांना , व्यवसायिकांना तसेच हातावर पोट असलेल्या कामगारांना बऱ्याच आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे . गोरगरीब व सर्वसामान्य नागरीकांची आर्थिक परिस्थीती अगदी बेताची झालेली असल्याने थोडा आर्थि क हातभार देण्याकरीता महापालिकेतर्फे आकारण्यात येणाऱ्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील निवासी व बिगर निवासी मालमत्ता कराचा भरणा दि .३१ ऑक्टोबर-२०२० पर्यंत केल्यास निवासी व बिगर निवासी मालमत्ता कराच्या घरपट्टीत ५०% रिबेट नागरीकांना व व्यापारी वर्गास देण्यात यावा, त्यानंतर रिबेट देता येणार नाही.
- महापालिकेची मालमत्ता कराची सन २०१९-२० या आर्थिक वर्षापर्यंतची थकबाकीची वसुली होणेकरीता मालमत्ता धारकांनी थकबाकीचा एकत्रित भरणा दि.३१ ऑक्टोबर-२०२० पर्यंत केल्यास त्यांच्या व्याजामध्ये संपूर्ण माफी देण्यात यावी.
- महापालिका अधिकारी व कर्मचारी यांना मोबाईल मध्ये वापरणेकामी देण्यात आलेले सिमकार्ड व त्याकरीता त्यांना देण्यात येणारी ठराविक मासिक रक्कम बंद करुन दि .०१ सप्टेंबर २०२० पासून सदर सुविधा बंद करुन

महापालिकेने बिलाची रक्कम अदा करु नये . तसेच अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या मोबाईल करीता सद्यस्थितीत असलेला भ्रमणध्वनी क्रमांक स्वत: नावावर करुन स्वत: देयक अदा करावे.

- अधिकारी व कर्मचारी यांना सद्यस्थितीत देण्यात आलेले भाड्याचे वाहन किंवा स्वत:चे वाहन वापरुन देण्यात येणारी प्रतिपुर्तीची रक्कम शासनाच्या धोरणानूसार देण्यात आलेली नसल्याने ही सुविधा बंद करण्यात यावी . शासन धोरणानुसार महापालिकेचे आयुक्त, अतिरीक्त आयुक्त, प्रभाग अधिकारी / सहा. आयुक्त इ. अधिकारी वगळता वाहनांसाठी पात्र असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांची यादी करुन मान्यतेस्तव तसेच वाहन प्रतिपूर्ती रक्कम निश्चित करणेकामी महापालिकेची वाहने व त्याचा वापर याबाबतची माहिती देखील मा . स्थायी समिती पुढे सादर करुन मान्यता घेण्यात यावी. विशेष बाब म्हणून महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी व पदाधिकारी यांना वाहन उपलब्ध करुन द्यावयाचे असल्यास तसा प्रस्ताव मा. स्थायी समितीमध्ये सादर करुन निर्णय घ्यावा.
- महापालिकेच्या विविध कार्यालयाच्या ठिकाणी महापालिकेमार्फत वृत्तपत्र , मासिके देण्यात येतात परंतु यापुढे महापालिकेमार्फत केवळ एकाच ठिकाणी वृत्तपत्रे देण्यात यावीत.
- शासन अनुदान/शासन निधी मधून करावयाच्या कामांना शासनाने लेखी मान्यता दिल्यानंतरच व निधी उपलब्ध झाल्यानंतरच मान्यता दिलेल्या रक्कमेएवढ्या कामांच्या खर्चाबाबत सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांच्याकडुन प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेवून निविदा प्रक्रिया करण्यात यावी.
- मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध आरक्षणाच्या जागेमध्ये खाजगी कामातुन विकसीत करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार सदर जागेचे हस्तांतर व विकसीत करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे प्रस्ताव सादर करावा.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन केंद्रांच्या इमारती व त्यांच्या जागा यांची रेडी रेकनर प्रमाणे रक्कम ठरवून सदर विभागाकडुन महानगरपालिकेकडे हस्तांतर करुन घेण्यात यावी.
- मंजुर होवून कार्यादेश दिलेल्या ज्या कामांच्या जागा विवादित आहेत किंवा ताब्यात आल्या नाहीत अशी सर्व विकास कामे रद्द करावीत.
- मोकळ्या जागेवरील कर (OLT) लॉकडाऊन कालावधीत शासनातर्फे इमारत बांधकामाचे कार्य बंद करण्यात आले असल्याने ठराविक कालावधीत इमारती पुर्ण करता आल्या नसल्याने इमारत बांधकामावर आकारण्यात आलेला मोकळ्या जागेवरील (OLT) कराचा कालावधी इमारत बांधकाम सुरु करण्यापर्यंत वाढविण्यात यावा . तसेच इमारतीचा प्लान पास करतेवेळी बांधकाम व्यवसायिकांना डेव्हलपमेंट चार्ज एक रक्कमी भरावा लागत असल्याने सद्यस्थितीत मार्केट परिस्थीतीचा विचार करता व महापालिकेचे उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीकोनातून डेव्हलपमेंट चार्ज हप्त्यामध्ये भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिल्यास बांधकाम व्यवसायिक महापालिकेत अधिक प्रमाणात इमारती बांधकामाचा प्लान मंजुरीकरीता येतील पर्यायी महापालिका निधीमध्ये वाढ होईल.
- महापालिकेचे सभागृह (हॉल), बाजार फी शुल्क व वसुली, तात्पुरते मार्केट मधील शुल्क, होर्डींग्ज, जाहिरात कर, मार्केट भुई भाडे, BOT भाडे व पार्किंग एरीया इ . महापालिकेने भाड्याने दिलेले आहेत. यापासुन महापालिकेस उत्पन्न प्राप्त होत आहे. परंतु लॉकडाऊन कालावधीमध्ये या सर्व सुविधा बंद केल्याने त्यांच्या उत्पन्नात घट झाली आहे. प्रशासनाने लॉकडाऊन कालावधीतील भाडे / शुल्क कमी करुन स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करुन मान्यता घ्यावी.

कोविड-१९ या आजाराच्या प्रादुर्भावामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चात वाढ व घट येणार आहे , त्यामुळे सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात सोबत जोडण्यात आलेल्या लेखाशिर्षनिहाय बाबी विचारात घेवून त्या त्या लेखाशिर्षातंर्गत उत्पन्नाच्या व खर्चाच्या आकड्यांमध्ये दुरुस्ती करुन घेण्यास सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे रक्कम रु.२५ लक्ष इतक्या शिल्लकेचे मुळ अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम (१००) अन्वये तसेच सोबत जोडलेल्या बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील विकास कामांच्या यादीस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| **तपशिल** | **२०१९-२० (सुधारित अंदाज)** | **२०२०-२१ (मुळ अंदाज)** |
|---|---|---|
| एकुण जमा | 119277.15 | 184181.09 |
| एकुण खर्च | 118605.15 | 184156.09 |
| **अखेरची शिल्लक** | 672.00 | 25.00 |

सन 2020-21 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात केलेल्या विविध लेखाशिर्षातुन करावयाच्या देखभाल व दुरुस्ती तसेच नविन कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके बांधकाम व पाणी पुरवठा विभागाने तयार केली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**बांधकाम विभाग**

<table>
<tr><td>1</td><td colspan="2">मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध संस्थानी खोदलेले रस्ते , पावसाळ्यात पडणारे खड्डे वार्षिक मुदतीने दुरुस्ती करणे.</td><td>रु.35,00,00,000/-</td></tr>
<tr><td>2</td><td colspan="2">मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे , नाले, फुटपाथ यावरील झाकणे वार्षिक मुदतीने बसविणे.</td><td>रु.2,00,00,000/-</td></tr>
<tr><td>3</td><td colspan="2">मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालये वार्षिक मुदतीने साफसफाई, दुरुस्ती करणे.</td><td>रु.6,00,00,000/-</td></tr>
<tr><td>4</td><td colspan="2">मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील / सार्वजनिक जागेवरील माती, बांधकाम साहित्य इ .उचलुन वाहतुक करणे कामी वार्षिक मुदतीने आवश्यक मशिनरी व मनुष्यबळ भाड्याने घेणे.</td><td>रु.2,00,00,000/-</td></tr>
<tr><td>5</td><td colspan="2">मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे, नाले फुटपाथ वार्षिक मुदतीने दुरुस्ती करणे, स्लॅब दुरुस्ती करणे.</td><td>रु.2,00,00,000/-</td></tr>
<tr><td>6</td><td colspan="2">मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संक्रमण शिबीराची रेन्टल इमारती वार्षिक मुदतीने आवश्यक दुरुस्ती व देखभाल करणे.</td><td>रु.1,00,00,000/-</td></tr>
<tr><td>7</td><td colspan="2">मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यात येणाऱ्या विविध आरक्षणाच्या सार्वजनिक जागांना कुंपणभिंती बांधणे (वार्षिक मुदत)</td><td>रु.2,00,00,000/-</td></tr>
<tr><td rowspan="16">8</td><td colspan="2">मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील सार्वजनिक मालमत्ताची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती कामे करणे.</td><td rowspan="16">रु. 5,00,00,000/-</td></tr>
<tr><td>उद्याने / मैदाने</td><td>रु.50,00,000/-</td></tr>
<tr><td>स्मशानभुमी, दफनभुमी</td><td>रु.25,00,000/-</td></tr>
<tr><td>मनपा मुख्य कार्यालय इमारत</td><td>रु.50,00,000/-</td></tr>
<tr><td>मनपा प्रभाग कार्यालये</td><td>रु.25,00,000/-</td></tr>
<tr><td>शाळा इमारती, बालवाडी, अंगणवाडी</td><td>रु.50,00,000/-</td></tr>
<tr><td>अग्निशमन केंद्र</td><td>रु.50,00,000/-</td></tr>
<tr><td>स्काय वॉक , पुतळे, सभागृह, समाजमंदिरे, विरंगुळा केंद्र, स्टेज, वाचनालय, अभ्यासिका व इतर सार्वजनिक इमारती</td><td>रु.50,00,000/-</td></tr>
<tr><td>बॅस डेपो, बस स्टॅण्ड</td><td>रु.25,00,000/-</td></tr>
<tr><td>आयुक्त / महापौर निवास</td><td>रु.50,00,000/-</td></tr>
<tr><td>विविध नामफलक, दिशादर्शक फलक</td><td>रु.25,00,000/-</td></tr>
<tr><td>आरोग्य केंद्र, रुग्णालय इ.</td><td>रु.25,00,000/-</td></tr>
<tr><td>तळी, विहीरी</td><td>रु.25,00,000/-</td></tr>
<tr><td>दुभाजक, वाहतुक बेट</td><td>रु.25,00,000/-</td></tr>
<tr><td>सार्वजनिक इमारती गळती प्रतिबंधक कामे</td><td>रु.25,00,000/-</td></tr>
<tr><td colspan="2"></td></tr>
<tr><td>9</td><td colspan="2">मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध महानगरपालिकेचे स्ट्रीट लाईट पोल एल.ई.डी. ने बदलणे.</td><td>रु.1,35,57,500/-</td></tr>
<tr><td>10</td><td colspan="2">मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, फुटपाथ ठिकाणी लेन मार्कींग,</td><td>रु.1,00,00,000/-</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | झेब्रा कॉसिंग, स्टॉप लाईन, थर्मोप्लास्टीक पेंट, रंगकाम इ. कामे वार्षिक मुदतीने करणे | |
| 11 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख खाड्या मधील गा ळ काढणे, कांदळवन काढणे, खाड्याची खोली व रुंदी वाढविणे खाड्यामधील अतिक्रमण काढून खाड्यांची सफाई करणे. | रु.35,00,00,000/- |
| 12 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सर्व वातानुकुलित यंत्रे वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.50,00,000/- |
| 13 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सर्व उद्‌वाहने वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.1,00,00,000/- |
| 14 | सर्वधर्मीय उत्सव अंतर्गत विविध व्यवस्था करणे.<br>(मे. धारावी डेकोरेटर्स यांचे मंजुर दराने) | रु.1,50,00,000/- |
| 15 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे सर्व सिग्नल , ब्लीकर वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.50,00,000/- |
| 16 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या स्मशानभुमीतील शवदाहीन्या , चिमनी एअर एक्झॉस्ट सीस्टीम यांची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.75,00,000/- |
| 17 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील शितपेट्या यांची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.15,00,000/- |
| 18 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या जनरेटरची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे | रु.25,00,000/- |
| 19 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या झोपडपट्टी व चेणा काजुपाडा भागातील स्ट्रीट लाईट ची तसेच मनपाचे विविध हायमास्ट , डेकोरेटीव पोल, सोलर दिव्यांची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.2,50,00,000/- |
| 20 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे सर्व वॉटर कुलर , पाणी शुध्दीकरण यंत्रणा वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.15,00,000/- |
| 21 | सर्वधर्मीय उत्सव अंतर्गत विविध व्यवस्था करणे. (पंचवार्षिक खर्च) | रु15,00,00,000/- |
| 22 | मनपा मुख्य कार्यालय इमारत पाचवा मजला बांधणे. | रु.3,46,04,393/- |
| 23 | मिरारोड (पूर्व) शितलनगर परिसरातील पावसाळी पाण्याचा निचरा होणेसाठी शांती प्लाझा (बँक ऑफ बडोदा) ते अय्यपा मंदीरा पर्यंत नविन आर.सी.सी. नाला बांधणे. | रु.3,88,95,000/- |
| 24 | मिरारोड भाईंदर स्टेशन दरम्यान भाईंदर रेल्वे फाटक क्र.35 येथील पादचारी भुयारी मार्ग (Subway) गळती प्रतिबंधक उपाययोजना व दुरूस्ती कामे करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे रक्कम जमा करणे. | रु.61,26,188/- |
| 25 | मिरारोड (पूर्व) त्रिवेणी महापौर बंगल्याची दुरूस्ती व सुशोभिकरण करणे. | रु.79,41,450/- |
| 26 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेची मुख्य कार्यालय , प्रभाग कार्यालय इतर रेन्टल हाऊसिंग , संक्रमण शिबीरे , सबवे, उड्डाणपुल पाण्याच्या टाक्या , स्काय वॉक, सार्व.सभागृह, वाचनालय, आयुक्त/महापौर निवास, अभ्यासिका विरंगुळा केंद्र , समाजमंदिरे, बालवाड्या, शाळा, अंगणवाड्या, चौपाट्या, आरोग्य केंद्र , हॉस्पीटल, स्मशानभुमी, दफन भुमी इ . मैदाने, उद्याने, तलाव, फुट ओव्हर ब्रीज, सबवे वाहतुक बेट, मधील सर्व विद्युत दुरुस्ती, मिटर पंप दुरुस्ती इ. देखभाल व दुरुस्तीचे काम वार्षिक मुदतीने करणे. | रु.2,00,00,000/- |

| | | |
|---|---|---|
| 27 | मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्व .इमारतीमधील तसेच सभागृह , स्थायी समिती सभागृह माईक सिस्टीम , EPBX, इंटरकॉम UPS System वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.25,00,000/- |
| 28 | मनपा क्षेत्रात आरक्षण क्र.246, 365 येथे विरंगुळा केंद्र बांधणे. | रु.1,00,00,000/- |
| 29 | मिरारोड (पुर्व) मेजर कौस्तुभ राणे जॉगर्स पार्क विकसित करणे. | रु.2,00,00,000/- |
| 30 | मनपा क्षेत्रातील स्मशानभूमीतील शवदाहीनीसाठी गॅस सिलेंडरचा पूरवठा करणे. | रु.50,00,000/- |
| 31 | भाईंदर (प.) प्रभाग क्र. 1 मधील गणेश देवल नगर नितिन चाळ ते सिमला गल्ली शौचालय पर्यंत नाला बांधणे. | रु. 58,75,500/- |
| 32 | भाईंदर (प.) प्रभाग क्र. 1 मधील गणेश देवल एस.टी.पी प्लान्ट ते गणेश आनंद नगर सार्व शौचालयपर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे. | रु. 2,36,84,500/- |
| 33 | भाईंदर (प.) प्रभाग क्र. 1 मधील जयबजरंग नगर येथील रविंद्र माछी ते स्वामी नारायण मंदिर नाला पर्यंत गटर बांधणे. | रु. 48,09,000/- |
| 34 | भाईंदर (प.) प्रभाग क्र. 1 मधील गणेश देवल नगर येथील सार्व . शौचालयाची पुर्न:बांधणी करणे. | रु.50,00,000/- |
| 35 | भाईंदर (प.) प्रभाग क्र.1 मधील जयअंबे नगर नं.1 येथील दिलिप सलुन ते सुल्तान खान यांचे घरापर्यंत गटर बांधणे. | रु.24,95,000/- |
| 36 | मनपा क्षेत्रात महीला भवन बांधणे. | रु.3,00,00,000/- |
| 37 | घोडबंदर गाव रोड बस डेपो - 60 फिट रोड गटार बांधणे. | रु.50,00,000/- |
| 38 | भाईंदर (पूर्व) रेल्वे फाटक ते गोडदेव नाका पुर्न:पृष्ठीकरण करणे. | रु.1,00,00,000/- |

पाणीपुरवठा विभाग

- पाणी पुरवठा विभागातील मलनि:सारण केंद्र देखभाल दुरुस्ती

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनि :सारण केंद्रांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | रु.902.08 लक्ष |
| 2 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जेसल येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन स्टँड-बाय पंपाचा पुरवठा , उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे . तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरिंग आणि VFD आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे | रु.36.00 लक्ष |
| 3 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सेक्टर नं .3 मिरारोड, येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन + स्टँड-बाय पंपाचा पुरवठा , उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे. तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरिंग आणि VFD आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे | रु.62.00 लक्ष |
| 4 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सेक्टर नं.8 मिरारोड व सृष्टी, मिरारोड येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन स्टँड -बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे . तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरिंग आणि VFD आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे | रु.54.00 लक्ष |
| 5 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सृष्टी, मिरारोड येथील ड्रेनेज पंपगृहात | रु.16.00 लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | नवीन स्टँड-बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे. | |

- सिव्हर सकर मशिन खरेदी

| | | |
|---|---|---|
| 6 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलवाहिन्यामधील चोकअप काढण्यासाठी आवश्य क असणारी सुपरसकर मशिन तसेच अनुषंगीक यंत्रसामुग्री / उपकरणे खरेदी करणेबाबत तसेच एक वर्षासाठी मशिन चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे . तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरिंग आणि VFD आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे | रु.150.00 लक्ष |

- भुयारी गटार योजना

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 7 | मिरा भाईंदर महानगरपालिका भुयारी गटार योजनेअंतर्गत शिल्लक असलेले रहदारीच्या ठिकाणचे गॅपवर्कचे काम मॅक्रोटनलिंग पद्धतीने (ट्रेचलेस पद्धतीने) पूर्ण करणे. | रु.1050.36 लक्ष |

- पंपिंग स्टेशन किरकोळ खरेदी / दुरुस्ती

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 8 | ठाणे येथील साकेत व कापुरबावडी व भाईंदर (पुर्व) येथील फाटक पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | रु.167.89 लक्ष |
| 9 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जनता नगर येथील पंप गृहात नवीन स्टँड-बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे. | रु.15.00 लक्ष |
| 10 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाली येथील पंप गृहात नवीन स्टँड -बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे. | रु.24.00 लक्ष |

- वितरण व्यवस्था किरकोळ खरेदी दुरुस्ती

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 11 | मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेअंतर्गत साकेत ते हटकेश पर्यंतच्या 1590 / 1350 मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.112.76 लक्ष |
| 12 | पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजुर कर्मचारी पुरवठा करणे. | रु.300.00 लक्ष |

- नविन जलवाहिनी टाकणे

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 13 | भाईंदर (प) उत्तन येथील उत्तन नाका ते रमा हॉटेल पाली पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.96.87 लक्ष |
| 14 | मिरारोड (पूर्व) प्लेझट पार्क जंक्शन ते एम .आय.डी.सी. जलकुंभापर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.140.00 लक्ष |
| 15 | एम.आय.डी.सी. जलकुंभ येथे राष्ट्रीय महामार्ग क्र.08 रस्ता छेदून एच.डी.डी पध्दतीने पाईप टाकणे. | रु.125.00 लक्ष |
| 16 | मिरारोड (पुर्व) बालाजी हॉटेल ते सृष्टी जंक्शन पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.38.50 लक्ष |

| | | |
|---|---|---|
| 17 | मिरारोड (पुर्व) डेल्टा जंक्शन ते दालमिया कॉलेज जंक्शन पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.45.00 लक्ष |
| 18 | मिरारोड (पुर्व) पेणकरपाडा येथे दरवेश प्रकल्प ते ताराचंद कंपनी उघाडीपर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.34.00 लक्ष |
| 19 | मिरारोड (पुर्व) कनाकिया येथील मेरी गोल्ड 1,2 पासून युनिक हाईट पुनम गार्डन पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.53.50 लक्ष |
| 20 | कॉंक्रिट रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरित करणे . (सन 2020-21) | रु.400.00 लक्ष |

- पाणी पुरवठा विभागातील खालील विविध कामे

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | सुधारीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | शांती पार्क मलनि :सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |
| 2 | सृष्टी मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे. | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |
| 3 | शांती नगर सेक्टर 3 मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे. | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |
| 4 | शांती नगर सेक्टर 8 मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची मलनि:सारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे. | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |
| 5 | जेसल पार्क मलनि :सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे. | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |
| 6 | एम.एम.आर.डि.ए. कडून रेंटल हाऊसिंग स्किम अंतर्गत लोढा क्वा या इमारती मधील मलनि :सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | रु.14.46 लक्ष | रु.23.00 लक्ष |
| 7 | पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजुर कर्मचारी पुरवठा करणे | रु.160.00 लक्ष | रु.422.00 लक्ष |
| 8 | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विंधन विहिरींची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे | रु.13.95 लक्ष | रु.24.50 लक्ष |
| 9 | भुयारी गटार योजना | रु.49196.00 लक्ष | रु.51000.00लक्ष |
| 10 | साकेत ते हटकेश पर्यंतची फिडरमेन जलवाहिनीची देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.110.00 लक्ष | रु.150.00 लक्ष |
| 11 | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत 30 द.ल.लि. पाणी पुरवठयासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापुरबावडी) येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे | रु.49.38 लक्ष | रु.107.00 लक्ष |
| 12 | भाईंदर (पूर्व) फाटक येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे | रु.49.38 लक्ष | रु.82.30 लक्ष |
| 13 | साकेत, ठाणे येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे | रु.49.38 लक्ष | रु.82.30 लक्ष |

वरील सर्व कामांच्या अंदाजपत्रकांना व खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

## मिरा-भाईंदर महानगरपालिका

## सन 2020-21 चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा.महासभेचे अंदाज

## खर्च बाजू

(रूपये लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मा. स्थायी समिती अंदाज | मा.महासभेचे अंदाज |
|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता कर पुन: मुल्यांकन करणे | 800.00 | 500.00 |
| 2 | पदाधिकारी/अधिकारी वाहन भत्ता | 135.00 | 100.00 |
| 3 | वाहन खाजगी गाडया भाडे | 125.00 | 205.00 |
| 4 | आरोग्य स्थायी आस्थापना | 4412.80 | 3500.00 |
| 5 | वॉर्ड साफसफाई | 12000.00 | 11000.00 |
| 6 | एकात्मिक डास निर्मुलन योजना | 1150.00 | 900.00 |
| 7 | कंत्राटी कर्मचाऱ्यांना Gratuity देणे | 100.00 | 10.00 |
| 8 | रुग्णालय अस्थायी/आस्थापना | 850.00 | 750.00 |
| 9 | रुग्णालयीन कपडे धुलाई साफ/सफाई | 400.00 | 200.00 |
| 10 | अतिक्रमण पोलिस बंदोबस्त सुरक्षा/रक्षक | 376.00 | 300.00 |
| 11 | अतिक्रमण जेसीबी/गॅस कटर/ट्रक भाडयाने घेणे | 125.00 | 150.00 |
| 12 | बांधकाम- अस्थायी अस्थापना/सुरक्षा/ट्राफिक वॉर्डन | 600.00 | 400.00 |
| 13 | रस्ते देखभाल दुरुस्ती | 4000.00 | 3575.00 |
| 14 | सार्व.धर्मिय उत्सव मंडप/लाईट | 300.00 | 150.00 |
| 15 | सौर ऊर्जा निधी | 500.00 | 150.00 |
| 16 | कोविड-19 (शासन अनुदान) | 0.00 | 2040.00 |
| 17 | कोविड-19 (मनपा हिस्सा) | 600.00 | 880.00 |
| 18 | मनपा कर्मचारी सानुग्रह अनुदान | 350.00 | 175.00 |
| 19 | संगणक हार्डवेअर साहित्य खरेदी | 300.00 | 200.00 |
| 20 | डसबिन खरेदी | 50.00 | 5.00 |
| 21 | सक्शन पंप मशीन खरेदी भाडे | 70.00 | 50.00 |
| 22 | नवीन खेळणी/बेंचेस | 125.00 | 100.00 |
| 23 | आरक्षण क्र.264 मा.बाळासाहेब ठाकरे मैदान विकसित करणे | 50.00 | 10.00 |
| 24 | उद्यानात शिल्पकला पुतळे बसविणे | 50.00 | 10.00 |
| 25 | तरण तलाव बांधणे | 100.00 | 180.00 |
| 26 | घोडबंदर किल्ला सुशोभिकरण | 200.00 | 350.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 27 | घोडबंदर किल्ल्या शेजारी शिवसृष्टी प्रकल्प राबविणे | 300.00 | 500.00 |
| 28 | बुध्दविहार मेडीटेशन सेंटर | 150.00 | 300.00 |
| 29 | मनपा मार्फत होर्डींग्ज कॅन्टीलिवर उभारणे | 25.00 | 150.00 |
| 30 | आदिवासी पाडे विकसित करणे(शासन अनुदान) | 50.00 | 300.00 |
| 31 | आदिवासी पाडे विकसित करणे(मनपा हिस्सा) | 0.00 | 200.00 |
| 32 | मुलभूत सुविधा (मनपा हिस्सा) | 300.00 | 500.00 |
| 33 | मुख्यकार्यालय/प्रभाग कार्यालय फर्निचर | 300.00 | 150.00 |
| 34 | कम्युनिटी सेंटर बांधणे | 5.00 | 200.00 |
| 35 | आरक्षणे उद्याने विकसित करणे | 1200.00 | 1500.00 |
| 36 | कुंपणभिंत बांधकाम करणे | 75.00 | 150.00 |
| 37 | आरक्षण क्र.241 कम्युनिटी हॉल | 200.00 | 200.00 |
| 38 | कर पुस्तकी समायोजन | 0.00 | 5500.00 |
| 39 | पाणी बील | 6800.00 | 6400.00 |
| 40 | स्थायी आस्थापना (पाणी पुरवठा) | 378.91 | 300.00 |
| 41 | पंपिंग स्टेशन किरकोळ दुरुस्ती | 700.00 | 600.00 |
| 42 | टँकर भाडे | 250.00 | 150.00 |
| 43 | मलनि:सारण केंद्र (देखभाल, दुरुस्ती) | 830.00 | 750.00 |
| 44 | मलनि:सारण केंद्र विज देयक | 400.00 | 300.00 |
| 45 | मिटर कार्यशाळा | 350.00 | 300.00 |
| 46 | महिला बालकल्याण खर्च | 498.00 | 300.00 |
| 47 | वृक्षारोपण समाजिक वनिकरण | 100.00 | 50.00 |
| 48 | वृक्षारोपण मजूर पुरवठा | 150.00 | 100.00 |
| 49 | तिवराची लागवड | 50.00 | 1.00 |
| 50 | 50% शिक्षण वेतन | 1200.00 | 1100.00 |
| 51 | सानुग्रह अनुदान (शिक्षण विभाग) | 40.00 | 20.00 |
| 52 | शालेय विद्यार्थी गणवेश बॅच | 100.00 | 50.00 |
| 53 | शालेय विद्यार्थी दप्तरे/बुट/मोजे | 80.00 | 40.00 |
| 54 | संगणक प्रशिक्षण (शिक्षण) | 40.00 | 10.00 |
| 55 | माध्यमिक शिक्षण सुरु करणे | 50.00 | 5.00 |
| 56 | बालवाडी स्थायी आस्थापना | 159.17 | 110.00 |
| 57 | नवीन शाळा इमारत बांधणे | 800.00 | 500.00 |
| 58 | परिवहन "ब" अंदाजपत्रकाकडे हस्तांतरण | 2383.00 | 2000.00 |

## मिरा-भाईंदर महानगरपालिका

## सन 2020-21 चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा.महासभेचे अंदाज

### जमा बाजू

(रूपये लाखात)

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मा. स्थायी समिती अंदाज | मा.महासभेचे अंदाज |
|---|---|---|---|
| 1 | मोकळया जागेवरील कर | 2200.00 | 1600.00 |
| 2 | स्थानिक संस्था कर | 200.00 | 100.00 |
| 3 | 1% मुद्रांक शुल्क | 6000.00 | 5900.00 |
| 4 | GST अनुदान | 22100.00 | 20367.00 |
| 5 | जाहिरात कर | 360.00 | 200.00 |
| 6 | होर्डींग्ज/फलक | 1000.00 | 500.00 |
| 7 | सशुल्क वाहन कर/पे ॲण्ड पार्क | 115.00 | 50.00 |
| 8 | बाजार फी | 800.00 | 400.00 |
| 9 | रस्ता नुकसान भरपाई | 6000.00 | 5000.00 |
| 10 | परवाने दाखले | 200.00 | 95.00 |
| 11 | किल्ला जिर्णोध्दार अनुदान | 300.00 | 500.00 |
| 12 | कोविड शासन अनुदान | 0.00 | 2040.00 |
| 13 | आदिवासी वस्ती विकास अनुदान | 0.00 | 300.00 |
| 14 | नविन रस्ते/गटारे शासन अनुदान | 5400.00 | 0.00 |
| 15 | मालमत्ता करावरील व्याज | 1100.00 | 920.00 |
| 16 | मालमत्ता हस्तांतरण पासून उत्पन्न | 0.00 | 10000.00 |
| 17 | अग्निशमन अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 0.00 | 1000.00 |
| 18 | भुयारी गटार योजना कर्ज | 5000.00 | 4700.00 |

**राकेश शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

कोव्हिड 19 साठी काही नगरसेवकांनी निधी दिलेला आहे तो आपल्याला कोव्हिड 19 साठी वर्ग करायचा आहे. त्यामध्ये महापौर निधी आहे. 20 लाख सन्मा. सदस्य प्रविण पाटील साहेब यांनी 10 लाखाचा निधी दिलेला आहे. सन्मा. सदस्य राजेंद्र जैनजी यांनी 15 लाखाचा नगरसेवक निधी वर्ग करण्याकरिता सांगितलेला आहे . राकेश शहाजी यांनी 15 लाखाचा निधी दिलेला आहे . धृवकिशोर पाटील यांनी 15 लाखाचा नगरसेवक निधी दिला आहे . श्रीम. निलम ढवण ताई यांनी 15 लाखाचा नगरसेवक निधी दिलेला आहे . उपमहापौर हसमुख गेहलोतजी हयांनी 15 लाखाचा नगरसेवक निधी कोव्हिड 19 साठी दिलेला आहे . तो आपल्याला कोव्हिड 19 मध्ये वर्ग करायचा आहे . आजच्या

बजेटमध्ये आपण ह्याची मान्यता घेत आहोत. अजून कोणाला द्यायचा असेल तर तसे पत्र तुम्ही देऊ शकता. सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील साहेब यांनी मांडलेल्या ठरावावर कोणा ला बोलायचे आहे त्यांनी बोला.

**जुबेर इनामदार :-**

मॅडम माझा ठराव आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. सन्मा. सदस्य प्रविण पाटील यांना बोलायला मी संधी देते.

**प्रविण पाटील :-**

पहिली गोष्ट म्हणजे ठरावाच्या अगोदर तुम्ही आमची सुचना घेणार होते. ठरावामध्ये तर त्या घेणार आहात का? ढवण मॅडमने ज्या सुचना मांडलेल्या आहेत त्या घेणार आहेत का?

**मा. महापौर :-**

तुम्हाला विरोध करायचा आहे की फक्त सुचना मांडायच्या आहेत.

**प्रविण पाटील :-**

सुचना. जर सुचना नसेल मांडत तर आम्हाला त्याच्यावर विचार करावा लागेल ना . आमच्या सूचना आहेत. आमचा ठरावाला विरोध नाही. बजेटच्या बाबतीत आमच्या काही सुचना होत्या त्या फक्त मान्य करा.

**मा. महापौर :-**

सुचना विचारात घ्या असे म्हटलेले आहे . तुम्हाला सुचना मांडायच्या असतील तर लेखी स्वरुपात मांडा.

**प्रविण पाटील :-**

ढवण मॅडमने ज्या सुचना मांडलेल्या होत्या त्याच सुचना होत्या.

**मा. महापौर :-**

त्यांचा विचार करावा असे ठरावात म्हटले ना . सन्मा. सदस्या श्रीम. ढवण ताई यांनी ज्या सुचना मांडलेल्या आहेत त्या विचारात घेण्यात याव्या असे म्हटलेले आहे.

**प्रविण पाटील :-**

विषय तोच झाला की, ठरावात घेतात. आमचा मुळ ठरावाला विरोध नाही. फक्त ठरावाच्या बाजूने काही आमच्या सुचना आहेत त्या घेतल्या तरी चालेल.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ठराव मांडायचा आहे का?

**प्रविण पाटील :-**

ठराव नाही आमच्या सुचना आहेत. त्या सुचना तुम्ही विचारात घ्या बस एवढाच विषय होता.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. अजून कोणाला ह्या ठरावाबद्दल बोलायचे आहे का?

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम मला बोलायचे आहे. आमचे सन्मा. सहकारी ॲड. धृवकिशोर पाटील हे मगाशी परत आता त्यांनी परिवनहचा विषय काढला. मगाशी तुम्ही मला सांगितले त्या विषयावर मी तुम्हाला बोलायला देईन. त्यानंतर मला बोलायला दिले नाही . ठराव झाल्यावर पण मी त्या संदर्भात देखील प्रश्न विचारु शकते की ते म्हणत आहेत प्रत्येक वेळी स्पष्टीकरण देतात की तेव्हा सांगितले ठेकेदारांनी गाड्या बंद केल्या नाहीत . कामगारांनी बंद केल्या मग कामगारांचा पगार मिळाला नाही म्हणून कामगारांनी बंद केला ना. म्हणजे त्याला जबाबदार कोण ठेकेदारच होता ना. किती दिशाभूल करावी ती किती करावी. त्याला काही अर्थ आहे की नाही त्याच्यावर बरेच पॉईंट आहेत . आता त्यांनी तो

विषय का रिपीट केला ? मी माझ्या माहितीनुसार सांगते आम्ही तीन वेळा गेलो त्या -त्या वेळी कमिशनर साहेबांनी पहिला डेप्युटी कमिशनरने मिटींग घेतली होती . त्यानंतर कमिशनर साहेबांनी सोमवारी घेतली मग ह्यांना हे माहिती नाही का . म्हणतात आता आले ठेकेदारांची बाजू घेऊन आमच्याशी वाद घालायचे का. ठिक आहे तो परिवनहचा विषय झाला. आताचा विषय तुम्हाला सांगते. ते सांगत आहेत की प्रमोद महाजन साहेबांनी बाळा साहेब कला दालनाबद्दल जेव्हा आमदारांनी निधी आणला मग त्यावेळी सन्मा. नरेंद्र मेहता साहेब पण आमदार होते ना.

**प्रविण पाटील :-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब होते तेव्हा आणायचा होता ना.

**(सभागृहात गोंधळ)**

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव मांडायचा आहे का?

**निलम ढवण :-**

त्यांनी केलेल्या प्रश्नांवर ढवण मॅडमला त्यांनी प्रश्न विचारलेत मग मी उत्तर देते ना.

**मा. महापौर :-**

तुम्हाला बोलायला संधी दिलेली आहे. आता ठराव झालेला आहे. तुमचा दुसरा ठराव आहे का?

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, शेवटी याचा अर्थ हे दिशाभूल करत आहेत . मग तुम्ही आम्हाला स्पष्टीकरण द्या ना. त्यांनी आता विषय मांडले त्यांना स्पष्टीकरण देते ना . आमदार प्रताप सरनाईक जेव्हा आमदार म्हणून निधी आणतात त्यावेळी सन्मा . नरेंद्र मेहता साहेब पण आमदार होते . त्यावेळी कात्रजचे मुख्यमंत्री फडणवीस साहेब होते. त्यावेळी त्यांनी का नाही आणले. आणि आता दुसरी गोष्ट उध्दव साहेबांनी तुम्ही म्हणत आहात सेंट्रल गर्व्हमेंटकडून आणल्यानंतर स्टेट गर्व्हमेंट देईल म्हणून उध्दव साहेबांनी हे सांगितले.

**(सभागृहात गोंधळ)**

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम, धृवकिशोर ज्या वेळेला सभागृहाची दिशाभूल करतात त्यावेळेला तुम्ही त्यांना बोलत नाहीत. आता ढवण मॅडम बोलत आहेत तर तुम्ही त्यांना गप्प बसवा. 4 गोष्टी खऱ्या आणि 8 गोष्टी खोट्या बोलतात. डायरेक्ट मुख्यमंत्र्यांवर आरोप करत आहेत. आमदारावर आरोप करतात.

**(सभागृहात गोंधळ)**

**प्रविण पाटील :-**

धृवकिशोर पाटील बोलले त्याचे स्पष्टीकरण आम्ही देत आहोत . सरनाईक साहेबांनी 25 कोटी निधी आणला त्यावेळेला नरेंद्र मेहता आमदार होतेच ना . मुख्यमंत्री तेव्हा देवेंद्र फडणवीस होते. तेव्हा आणायचा होता. सभागृहात कशाला खोटे बोलायचे, कशाला दिशाभूल करायची.

**मा. महापौर :-**

एकानेच बोला.

**निलम ढवण :-**

माझे नाव घेऊन त्यांनी प्रश्न विचारले. त्यांची उत्तर मी देते. जेव्हा धृवकिशोर बोलत आहेत, सांगत आहेत दिशाभूल करायची ती किती करायची . मगाशी सांगितले आमदारांचे नाव तेव्हा दोघेही आमदार होते एक भाजप आणि एक शिवसेनेचे होते. आमच्या सरनाईक साहेबांनी जेव्हा निधी आणला आणि फडणवीस साहेब होते त्यावेळी का मागणी नाही केली ? प्रमोदजी महाजन कलादालन होणेसाठी मग त्यानंतर आता देखील एवढा निधी उध्दव साहेबांनी सरळ सांगितले होते प्रश् नात की जस तुम्ही म्हणत आहेत तुमचा जी.एस.टी आमच्याकडे पेंडींग आहे. तसाच आमचा पण सेंट्रल गर्व्हमेंटकडे पेंडींग

आहे. तुम्ही जेवढा निधी मागाल तेवढा द्यायला तयार आहोत . त्या दिवशीची रेकॉर्डींग काढा एवढे सगळे सांगताना देखील इथे सरळ सांगतात सेंट्रल गर्व्हमेंट देईल तेव्हा स्टेट गर्व्हमेंट . आम्ही तुम्हाला देऊ असे उध्दव साहेब बोलले एवढे खोटे . महापौर मॅडम तुम्ही होता तुम्हाला माहित आहे . मगाशी तुम्ही त्याचा उल्लेख पण केलेला आहे. उध्दव साहेबांनी सांगितलेले आहे जो निधी लागेल तो निधी मी द्यायला तयार आहे म्हणून.

**प्रविण पाटील :-**

तुमच्या पदाचा सन्मान करतो असेही उध्वजी बोलले.

**निलम ढवण :-**

आम्ही सत्तेत आहोत म्हणून आम्ही निधी आणावा म्हणून सांगत आहेत . सरनाईक साहेबांनी देखील पहिल्यांदा 15 कोटी आणून दिले. त्यानंतर 10 कोटी त्या दिवशी पालकमंत्री आले होते तेव्हा त्यांनी जाहिर केले आणि त्याच्या व्यतिरिक्त देखील निधी द्यायला तयार आ हेत आणि हे लोक आणायला तयार आहेत. मग तरी तुम्ही आरोप करता दुसऱ्या बद्दल चांगले तरी म्हणा . आम्ही उदार मनाने म्हणतो. जरी भाजपने कार्य केले तरी चांगले केले म्हणून आणि विकासाच्या आड आम्ही कधीच आलो नाही. हे राजकारण तुम्ही करत आहोत . हे राजकारण याच्यापुढे निलम ढवण मॅडम हे बोलले, निलम ढवण बोलल्या ते प्रुव्ह करायचे तोच शब्द ठेवायची निलम मॅडममध्ये ताकद आहे.

**मा. महापौर :-**

ढवण ताई तुम्ही जे बोललात त्याच्यावरती आता कोणीच स्पष्टीकरण देऊ नका.

**निलम ढवण :-**

त्यांनी पण तसे बोलायचे नाही त्यांना सांगा.

**मा. महापौर :-**

ढवणताई जेव्हा एक सदस्य................

**निलम ढवण :-**

आमच्या सर्व सुचना घेऊन आम्ही ज्या पहिल्यापासून मांडलेल्या आहेत त्या सुचना आणि आम्ही डबल ढोलकी कधी केली नाही . आम्ही जो शब्द आहे तो शब्द बाळासाहेबांनी आम्हाला तेच शिकविलेले आहे. जे बोलायचे तेच करुन दाखवायचे शेवट पर्यंत तोच शब्द ठेवायचा . आणि त्या पध्दतीने आम्ही आजपर्यंत वावरतोय. त्यामुळे ॲड. धृवकिशोरजींना सांगा की जेव्हा दुसऱ्यांवर आरोप करताना आरोप सिध्द करायची ताकद ठेवा . आम्ही आहोत आमचा शब्द कधीच पलटणार नाही . त्यामुळे असे आरोप परत कधीच करु नका. सभागृहात दिशाभूल करु नका आणि लोकांची पण.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्य कृपया आता कोणी बोलू नका . मी कोणालाच परवानगी देणार नाही . सन्मा. सदस्यांना मी विनंती करते की, ह्या शहरातले जेवढे आमदार होऊन गेलेत किंवा त्यांनी जे जे कार्य केलेले आहे ते सर्व मिरा भाईंदर शहराला माहित आहे . आणि ह्या ठिकाणी जे सदस्य उपस्थित नाही आहेत त्यांच्या बद्दल चर्चा उगीच करु नये आणि एक सदस्य जेव्हा स्पष्टीकरण मागतो त्यावेळेला दुसरा सदस्य उठून त्याचे स्पष्टीकरण देतो . तर ते एकमेकांमध्ये असलेले आपण दिलेले स्पष्टीकरण ते स्पष्टीकरण धृवकिशोर पाटील यांनी ह्या ठिकाणी मांडलेले आहे. त्यामुळे त्याच्यावरती चर्चा न करता आपल्या विषयावरती आपण जाऊ या . धृवकिशोर पाटील यांनी मांडलेला आहे . या ठरावावरती ज्याला समर्थन करायचे आहे किंवा विरोध करायचा असेल त्यांनी दुसरा ठराव मांडू शकता.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम माझा ठराव आहे.

**मा. महापौर :-**

डायरेक्ट ठराव वाचा. चर्चा नको.

**जुबेर इनामदार :-**

ठराव मांडण्याच्या आधी महापौर मॅडम.........

**मा. महापौर :-**

चर्चा अजिबात नाही ठराव मांडा.

**जुबेर इनामदार :-**

बजेटचा ठराव आहे. महापौर मॅडम, ठराव मांडणे तो माझा अधिकार आहे. माझा अधिकार कोणी हिसकाऊन घेऊ शकत नाही. तुम्हाला माहिती देऊ इच्छितो धृवकिशोर बोलले की आलेली सुचना मंत्रालय स्तरावर आहे........

**मा. महापौर :-**

धृवकिशोर वरती बोलू नका.

**जुबेर इनामदार :-**

कसे आहे. ते आमच्यामध्ये होते तोपर्यंत बरोबर होते त्यांनी दिशा बदलली दिल्लीवरून गल्लीपर्यंत असे खोटे बोलतात ना.

**मा. महापौर :-**

दिल्लीला तुम्हीच पोहोचले होते.

**जुबेर इनामदार :-**

आमच्याकडे होते तोपर्यंत चांगले होते. पालिकेला जी सुचना आलेली आहे महापौर मॅडम तो जो जी.आर आलेला महापालिकेला 8 मे ला आलेला आहे. त्याचा माझ्याकडे पुरावा आहे. दुसरं म्हणजे असे आहे की केंद्र शासनाने राज्य शासनाला निधी दिलेलाच नाही. हे डी.एन.ए चा रिपोर्ट आहे. सेंटर इग्नोर महाराष्ट्र 12 लाख करोड आत्म निर्भर पॅकेज शिवसेना उध्दवजी ठाकरेचा शुध्दमुखी दुसरं आम्हाला दिलेला आम्हाला आत्म निर्भर व्हायला सांगितले आम्हाला सांगितले थाळी वाजवा, मेणबत्ती पेटवा आम्ही पेटवली याच्यापलीकडे काही केलेले नाही . फक्त आम्हाला केलेले वादे हे बिनबुडाचे आहेत.

**मा. महापौर :-**

तुमचा ठराव आहे का? तुम्ही विषय वाचा.

**जुबेर इनामदार :-**

माझा ठराव आहे . महापौर मॅडम, ठरावाचे काय आहे . हा पूर्ण अर्थसंकल्प त्याच्यावरच चाललेला आहे.

**मा. महापौर :-**

ते वाक्य काढून टाका.

**जुबेर इनामदार :-**

अर्थसंकल्प कशावर चाललेला आहे ? अर्थसंकल्प चाललेला आहे निधीवर . निधी कोण देणार कोरोनाचा प्रार्दुभावामध्ये?

**मा. महापौर :-**

इनामदार साहेब तुम्ही जसे बोलतात तसे इतर सदस्य खूप चांगले बोलतात. पण मी त्यांना बोलू देत नाही कारण तुम्ही गटनेते आहात तुम्ही ठरावावर न बोलता............

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, अर्थसंकल्प अंदाजपत्रकावर चर्चा तासन तास चालते तुम्हाला घाई तरी काय आहे.

**मा. महापौर :-**

तुम्हाला भरपूर वेळ दिला.

**जुबेर इनामदार :-**

**माझे बरेच काही बोलायचे बाकी आहे 4 पाने बोलायची बाकी आहेत.**

**मा. महापौर :-**

**माझे हे म्हणणे आहे की सन्मा . धृवकिशोर पाटील यांनी जो ठराव मांडलेला आहे त्या ठरावावरती तुमची मान्यता आहे का?**

**जुबेर इनामदार :-**

**नाही.**

**मा. महापौर :-**

**नाही तर मग तुमचा ठराव आहे का?**

**जुबेर इनामदार :-**

**मी ठराव वाचणार आहे.**

**मा. महापौर :-**

**वाचा.**

**जुबेर इनामदार :-**

**महापौर मॅडम, ठराव वाचायच्या आधी माझी भरपूर इच्छा आहे तुम्हाला कविता ऐकवायची.**

**मा. महापौर :-**

**माझ्या दालनात येऊन कविता वाचा मी ऐकायला तयार आहे. माझ्या दालनात या.**

**जुबेर इनामदार :-**

**कारण ह्या विषयावर आज जो आजची सभा संपूच शकत नाही . कारण आपल्याला 20 लाख कोटी रुपये मधून 0.01 टक्के एक टक्का 200 कोटी जरी दिले तरी आपण ह्या शहराचा 100 टक्के मालमत्ता कर आणि पाणी पट्टीत सुट देऊ शकतो . फक्त 200 कोटी रुपये ती कशी देता येईल दिली पाहिजे आम्हाला त्याची शाश्वती नाही . वादा वो कर गए थे की देंगे 20 लाख करोड कब देंगे पाचवे दिन देंगे किसीसे सुन लिया होगा मोदिजीने यह दुनिया सिर्फ चार दिन की है | अशा प्रकारे ह्यांनी फक्त लोकांना वादे करायचे.**

**मा. महापौर :-**

**तुमचा ठराव आहे का? मी आधीच सांगितले होते तुम्ही अशा पध्दतीचे वक्तव्य करु नका. तो सभागृहाचा विषय नाही. तुम्ही ठरावावरती या.**

**जुबेर इनामदार :-**

**ते आमचे प्रधानमंत्री आहेत त्यांचा उल्लेख करायचा तो कुठे करायचा. ते लोकप्रतिनिधी आहेत. ह्या देशाचे लोकप्रतिनिधी आहेत . आम्ही त्यांना तिथे जाऊन जवाब वि चारु शकत नाही . तुमच्या माध्यमातून आम्ही विचारतो. अधिकार आहे माझा लोकतांत्रिक.**

**मा. महापौर :-**

**ठराव मांडा.**

**जुबेर इनामदार :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन 2019-20 चे सुधारित व सन 2020-21 चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. ("अ" + "महिला व बालकल्याण" "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण") अर्थसंकल्पीय अंदाजपत्र मंजुरीसाठी मा . महासभेमध्ये प्रस्तावित आहे. पूर्ण जग गेल्या पाच महिने नोवेल कोविड 19 कोरोना या महामारीने त्रस्त आहे . चायना वुहान शहरामधून सुरु झालेल्या या महारोगापासून कुठलाही देश सुरक्षित राहिलेला नाही . सदर महामारीचा प्रादुर्भाव गतीने या देशात संसर्ग करत आहे व आज रोगींची संख्या वीस लाखापर्यंत झाली आहे. या रोगावर उपचाराचे संशोधन कार्य सुरु असून उपचार प्रतीक्षेत आहे . कोरोना महामारी संसर्ग**

रोखण्यासाठी लॉकडाऊन हा उपाय असा प्रयोग केंद्र शासनाने केलेला असून , दि. 24/03/2020 पासून पुढील आदेशापर्यंत पूर्ण देश जसे थे या परिस्थितीत थांबेल. देश थांबले, त्याच बरोबर अर्थव्यवस्था ही थांबली. या देशाच्या जनसंखेच्या 77 टक्के लोकसंख्या कामगार वर्ग आहे . शिल्लक लहान व मोठे व्यावसायिक कामकाज करणारे आहेत . लॉकडाऊनमुळे प्रशासकीय नोकरी करणारे व काही प्रमाणात व्यवसायीक आपली आर्थिक बाजू सांभाळू शकले , बाकी 90 टक्के जनसंख्या या लॉक डाऊनमुळे आर्थिकरित्या दुर्मिळ झालेले आहे व पुढे किती अनिश्चित काळापर्यंत ही परिस्थित राहील हा एक प्रश्नचिन्ह आहे . मिशन बिगन अगेन या धर्तीवर लॉकडाऊनमध्ये काही प्रमाणात शिथिलता टप्याटप्याने देण्यात आली असली तरीही अर्थव्यवस्था सुधारण्यास अवधी लागणार आहे ही वस्तुस्थिती आहे. मिरा भाईंदर शहराच्या जनतेचा अर्थव्यवस्थेवर या लॉकडाऊनचा प्रभाव तितक्याच प्रमाणात आहे. या उपनगरामध्ये राहणारे रहिवासी हे मध्यम वर्ग , सामान्य वर्ग व अंतोद्य आर्थिक वर्गातले आहेत. या शहरात अंतोद्य वर्ग हा 48 टक्केहून अधिक आहे. छोटे व्यवसाय व नोकरी करणारा वर्ग ह्या शहराचा मोठा भाग आहे . ही जनसंख्या हातावर पोट घेऊन चालणारी आर्थिकरित्या अस्वस्थ व उध्वस्त झालेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन हा एक प्रशासनाचा भाग असून त्यांनी रहिवाशीयांना या परिस्थितीत मदतीचा हात पुढे केला पाहिजे , मिरा भाईंदर महानगरपालिका स्थायी समितीने वर्ष 2020-21 अंदाजपत्रकात मालमत्ता करातून 11100.00 कोटी तसेच पाणीपटी 8200.00 कोटी उत्पन्न प्रस्तावित केले आहे. तरी उपरोक्त विषय अभावी संकट निवारण निधी या दृष्टीकोनातून 2020-21 चालू वर्षाचामध्ये वणीज असतापनाला मालमत्ता करमध्ये 50 टक्के सूट व मालमत्ता कर (घरपट्टी) संपूर्णपणे 100 टक्के माफ करावी तसेच सदनिका, घरसंकुल यांना पाठवण्यात येणारे पाणी बिल 100 टक्के माफ करावे व वणीज असतापनाला 50 टक्के सूट देण्यात यावी. 2019-20 वर्षाचे मालमत्ता कर, पाणी देयक (बिल) रहिवाशी 31 मार्चपर्यंत अदा करु शकले नाही तरी त्यावर आकरण्यात येणारे व्याज संपूर्णपणे रद्द करावे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने 2020-21 अर्थसंकल्प अंदाजपत्रकात जमेची बाजू 181283.97 प्रस्तावित केली आहे तरी या जमेचा निधीमधून चालू वर्षाचे महसुली उत्पन्न मालमत्ता वर्षामध्ये कुठलेही नविन वि कास कार्य सुरु करु नये . 2019-20 मध्ये बांधकाम विभागाने दिलेले कार्यादेश यांनाही स्थगिती देण्यात यावे . सार्वजनिक बांधकाम विभागाचे फक्त अत्यंत गरजेचे डागडुगीचे काम सुरु ठेवावे. विकास कामे शासन निधी मधून करावे, प्रस्तावित असलेली कामे कोरोना प्रादुर्भाव संपल्यानंतर हाती घेण्यात यावी. शहरात कोरोना उपचारासाठी जास्तची सोय सुविधा उपलब्ध करावी पालिकेचा / शासनाच्या निधीचा योग्य वापर सदर कामासाठी करावा . तसेच महापौर , उपमहापौर, स्थायी समिती सभापती, नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग समिती निधी रद्द करावे तसेच मूळ अंदाजपत्रकातून इतर समितींना हस्तांतर होणारे निधी देण्यात येऊ नये चालू 2020-21 कोरोना वर्ष जाहिर करुन फक्त या महामारीला लढा देण्यासाठी पाऊल उचलावे . शहराचे रहिवाशी निरोगी राहिले तर विकास काम होत राहतील.

तरी सन 2020-21 अर्थसंकल्प अंदाज उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करुन प्रस्तावित आहे. प्रशासनाने काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असा मी ठराव मांडत आहे . तसेच दिनांक 4 मे 2020 शासन निर्णय क्र . अर्थ 2020/प्र.क्र. 65/ अर्थ राज्य शासनाचा सूचनांचा काटेकोरपणे अंमलबजावणी करावी असा ठराव मांडत आहे.

नुरजहाँ हुसेन :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सचिव साहेब दोन ठराव आले आहेत.

**जुबेर इनामदार :-**

काँग्रेस पक्षाच्या वतीने आम्ही ठराव केलेला आहे. मतदानाची गरज असेल तर घ्या. शिवसेना त्याच्यामध्ये समावेश होत असेल तर तसे शिवसेनेचे गटनेत्यांनी तसा निर्णय घ्यावा.

**मा. महापौर :-**

गटनेते निलम ताई तुम्हाला जुबेर इनामदार साहेबांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने मत मांडायचे की नगरसेवक धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने मांडायचे आहे.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम एक मिनिट. मला जरा विरोधी पक्षनेत्यांशी बोलू द्या.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम, मला सांगा की ढवण मॅडमने ज्या सुचना आहेत त्या ठरावात घेत असाल तर आम्ही त्या ठरावाच्या बाजूने नाहीतर आम्ही जुबेर इनामदारांच्या ठरावाच्या बाजूने आमचे मतदान राहील.

**मा. महापौर :-**

ठीक आहे. तत्पूर्वी अतिरिक्त आयुक्त वरुळकर साहेब काही सांगणार आहेत.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

महापौर मॅडम, कराबाबत मांडलेल्या सदर प्रस्तावावर प्रशासनाचे मत असे आहे की चालू वर्षाच्या सामान्य करावर जास्तीत जास्त 10 टक्के सूट देणे योग्य होईल. हा प्रशासनाचा मत आहे.

**प्रविण पाटील :-**

ठरावावर तर 50 टक्के आहे.

**मा. अतिरिक्त आयुक्त :-**

आस्थापनेचा खर्च कमी करण्याचा प्रयत्न आहे.

**जुबेर इनामदार :-**

मालमत्ता करामध्ये सूट द्या.

**मा. महापौर :-**

ह्या ठिकाणी आयुक्तांनी त्यांची भूमिका मांडलेली आहे . आपला ठराव धृवकिशोर पाटील साहेबांनी केलेला आहे. एक ठराव जुबेर इनामदार साहेबांनी केलेला आहे . दोन ठराव आलेले आहेत . निलम ढवण ताईन विरोधी पक्षनेता प्रविण पाटील साहेब यांच्याशी चर्चा केली असेल.

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम, आमचे मत असे आहे की तुमच्या ठरावाला आम्ही मंजूरी देतो पण आमच्या ज्या सुचना आहेत ज्या ढवण मॅडमने मांडलेल्या आहेत त्या सुचनेसह ठराव मंजूर करा.

**मा. महापौर :-**

तुमच्या सुचनांचा विचार करण्यात येईल . पण तुमच्या सुचना आता ठरावामध्ये घेता येणार नाही. कारण ठराव त्यांचा मांडून झालेला आहे.

**निलम ढवण :-**

ठराव जरी त्यांनी मांडला तरी सुचना तुम्ही पूर्ण सर्वानुमते मांडण्यापूर्वी तुम्ही सुचनेसहीत मान्य करतो म्हणून बोला. प्रविणजी सुचनासहीत मान्य करतो जेव्हा महापौर म्हणतील तेव्हाच सर्व होईल. जरी ठराव वाचला तरी सुचनेसहीत मान्य करतो. त्यांनी द्यायचा अनुमोदन रुलींग त्यांनी दिली तरी जमेल.

**चंद्रकांत वैती :-**

त्यांनी मांडलेल्या मुळ ठरावामध्ये आपण त्यांच्या उपसुचना स्वीकार करु शकता. परंतु ही जी प्राप्त परिस्थिती आहे ही सभा व्ही .सी. द्वारे चाललेली आहे. त्याच्यामुळे त्या उपसुचना तुमच्यापर्यंत

प्रत्यक्ष पोहोचलेल्या नाहीत. त्याच्यामुळे त्या उपसचुना केला जाईल असा जर निर्णय दिला तर त्या उपसुचना त्यात समाविष्ट होऊ शकतात.

निलम ढवण :-

वैती साहेब, त्यांना व्हाट्सअपवर अगोदर टाकलेल्या आहेत . कारण ऑनलाईन असल्यामुळे व्हॉट्सअप वर त्यांना लेटर दिले.

चंद्रकांत वैती :-

चालू सभेमध्ये व्हाट्स अप वगैरे पाहणे हे अयोग्य राहील आणि ते त्यांनी नक्कीच पाहिले असेल. संपूर्ण सभागृहाने तुमची सर्वांची निवेदन वाचलेली आहेत . मिरा भाईंदर शहर हे तुमच आमचं आहे आणि ह्या शहरातील नागरिकांच आपण प्रतिनिधीत्व करतो. त्याच्यामुळे कोणाची भूमिका चूकीची आहे अशातला भाग नाही आणि खूप चांगल सर्वांच मनापासून कौतुक . महापौराचं मनापासून कौतुक की खेळीमेळीच्या वातावरणात सभा पार पडते . उपासूचनांचा स्वीकार व्हावा. जुबेर इनामदार साहेबांना पण विनंती राहील की कुठलाही अट्टाहास न करता जसे मी पहिले सांगितल की लोकप्रतिनिधींच्या सुचनांचा स्विकार होणार नाही . आताच त्यांनी सांगितलं तुकाराम मुंडे साहेबांनी नागपूर महानगरपालिकेतील 10 टक्केच्या वरती मी माफ करणार नाही . म्हणून सांगितल म्हणून हे दोन्ही पक्षाचे गटनेते, विरोधी पक्षनेता आणि जे विद्यमा न पदाधिकारी आहेत, आयुक्त, उपआयुक्त यांच्या बरोबर एक संयुक्त बैठक करावी . जे देता येईल ते करावं आपण शंभर टक्के निर्णय घेतला तर लोकांना आपल्याला फायदा देता येणार नाही. म्हणून विनंती आहे की विचारपूर्वक ठराव व्हावा आणि ठरावामध्ये सगळ्यांना कसे समावेश खर्च करुन घेता येईल खास करुन जुबेर इनामदार साहेबांना विनंती आहे की आपण ह्या ठरावाला कुठे अडचण राहणार नाही . तो ठराव विखंडनासाठीच पाठवला जाईल. मग तो 50 टक्के असेल. आता वरुळकर साहेब तिथे आहेत त्यांच्याशी आताच चर्चा करुन घ्या आणि मग हा ठराव मतदानाला टाका आणि तसा जर आवश्यक असेल तर आपण दुरध्वनी द्वारे संबंधित दोन्ही गटनेत्यांशी संपर्क करावा ही विनंती आहे.

जुबेर इनामदार :-

मालमत्ता कराची ही केली आहे आणि पाणी पुरवठ्याची ही केली आहे . पाणीची ही देयक लोकांना भरावे लागेल.

निलम ढवण :-

महापौर मॅडम , गटनेता, विरोधी पक्षनेता आणि सत्ताधारी, महापौर, उपमहापौर यांची सगळ्यांची एकत्र मिटींग ठेवा आणि त्यानुसार जो निर्णय असेल तो त्यावेळी घ्या.

जुबेर इनामदार :-

निर्णय घेऊ नंतर पाहिजे तर समिती तशी तयार करत असाल नंतर निर्णय करता येईल . ठराव मांडला गेला आहे आपली भूमिका मांडली गेली आहे. भूमिकेवर मतदान असते ना.

निलम ढवण :-

सर्वांना एकत्रित सूट द्या असे नाही . पण ज्यांची खरोखर परिस्थिती नाही अशा पध्दतीने जे सर्वसामान्य लोक आहेत त्या व्यक्तीला आपण सूट सांगितली होती असे नाही की सगळच जे धनाढ्य आहेत. पैसे भरु शकतात त्यांनी आर्थिक स्थिती चांगली आहे असा प्रश्नच नाही. त्याच्यामुळे तुम्ही सुचनांचे जे आहे त्या सुचना घ्या. त्यानुसार तुमचा ठराव जो आहे त्या ठरावाला अनुमोदन जे रुलींग करणार आहात त्या रुलींगमध्ये गटनेता आणि यांची मिटींग झाल्यानंतर ह्या विषयावर फायनल निर्णय घ्या. तो विषय पेंडींग ठेवून तिथे निर्णय द्या.

धृवकिशोर पाटील :-

निलम ढवण मॅडम बोलल्या की त्यांच्या ज्या सुचना आहेत त्या ठरावामध्ये घ्या . निलम ढवण मॅडम तुम्ही आणि तुमच्या पक्षाचे नेते आदरणीय प्रताप सरनाईक साहेबांनी जे पत्र आणले आहे

त्या पत्रामध्ये जे लिहीलेलं आहे ते बाळासाहेब ठाकरे कला दालना करिता महाराष्ट्र गर्व्हमेंटने निधी दिलेला आहे.

**निलम ढवण :-**

आता हा विषय का काढत आहेत . महापौर मॅडम ऑब्जेक्शन आहे त्यांनी हा विषय नाही काढायचा. चर्चा नाही करायची.

**धृवकिशोर पाटील :-**

ढवण मॅडम ऐकून घ्या.

**निलम ढवण :-**

ॲड. धृवकिशोर पाटील मागचे विषय काढू नका.

**धृवकिशोर पाटील :-**

जोपर्यंत सुचना होणार नाही तोपर्यंत सुचना येऊ शकत नाही.

**निलम ढवण :-**

ते तुम्ही कसे ठरवणार महापौर मॅडम बसले आहेत. तुम्ही व्हा ना महापौर आणि द्या सूचना. तुम्ही कसे बोलणार तुम्हाला बोलायचा अधिकार काय आहे. महापौर आणि सचिव रुलींग देतील. तुम्ही प्रत्येक गोष्टीवर तुम्ही रुलींग देणार का ? रुलींग कोण देणार आहेत ? महापौर आणि सचिव जे योग्य असेल ते सचिव सांगतील. तुम्ही प्रत्येक वेळी दिशाभूल करत आहेत. सगळ्या गोष्टींची महापौर मॅडम तुम्हाला विनंती आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील साहेब आणि सन्मा. सदस्या निलम ढवण ताई ह्या सभागृहामध्ये दोन ठराव आलेले आहेत . पहिला ठराव सुचक श्री . धृवकिशोर पाटील यांनी मांडलेला आहे. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेला आहे. विरोधी पक्षनेता श्री. प्रविण पाटील यांनी विनंती केलेली आहे की पहिल्या ठरावा मध्ये सन्मा. सदस्या निलम ढवण यांनी ज्या सुचना मांडल्या आहेत त्या घेता येतील का? ठराव धृवकिशोर पाटील साहेबांनी मांडला असल्यामुळे, धृवकिशोर पाटील तुमच्या ठरावामध्ये तुमच्या सुचना मान्य करुन घेत असतील तरच तुमच्या सुचना त्यांच्या ठरावामध्ये घेतील. दुसरी गोष्ट जर दुसरा ठराव जुबेर इनामदार साहेबांनी मांडलेला आहे . त्यांनी तुमच्या सुचना आणि त्यांच्या ठरावात मतदान करता येईल.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, ॲक्च्युअली ठराव वाचण हे सन्मा . सदस्यांच काम आहे हे आम्ही मान्य करतो. पण महासभेमध्ये त्या ठरावावर निर्णय घेणे आपलं काम आहे. तुम्ही कसं सांगता त्यांनी वाचला म्हणजे त्यांनी निर्णय द्यायचा.

**मा. महापौर :-**

सुचना त्यामध्ये आल्या पाहिजे ना.

**निलम ढवण :-**

तो अधिकार तुमचा आहे.

**मा. महापौर :-**

आपण सचिव साहेबांकडून त्याचा अभिप्राय घेऊया.

**नगरसचिव :-**

ह्या विषयाला दोन ठराव ठराव आलेले आहेत. पहिला ठराव आहे सुचक श्री . धृवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. राकेश शाह. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्रीम. नुरजहाँ नजर हुसेन. आपण ज्या सुचना मांडल्या आहेत त्या आपल्या सुचना आपल्याला कोणत्या ठरावामध्ये ॲड करायच्या ह्याबद्दल आपण बोलून घ्या . ज्या ठरावामध्ये ॲड करायचे असेल त्याचे सुचक आणि

अनुमोदकांची मान्यता त्यांच्या ठरावामध्ये ॲड करण्याची असेल आपली सुचना त्या ठरावामध्ये ॲड केली जाईल आणि त्यानंतर आपले दोन्ही ठरावावर मतदान घेतले जाईल.

**निलम ढवण :-**

सचिव साहेब सुचक आणि अनुमोदक जर ते प्रत्येक ठरावात सुचनासहीत करायचे असेल त्याच्यामध्ये ॲड करायचे का नाही हा महापौरांचा अधिकार नाही का?

**नगरसचिव :-**

हा सुचक अनुमोदक यांचाच अधिकार आहे . त्यांनी ठराव मांडलेला आहे . तुमच्या सुचना घ्यायच्या की नाही घ्यायच्या हे त्यांनीच ठरवायचं.

**निलम ढवण :-**

महासभेमध्ये सर्वोच्च अधिकार कोणाचे आहेत.

**नगरसचिव :-**

त्यांचा ठराव मान्यता देण्याचा अधिकार आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

मॅडम ॲड धृवकिशोर पाटील बरोबर बोलले ना.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय मतदान कसं करणार . हात वर करुन का. कोणला नेटचा प्रॉब्लेम असणार आहे.

**निलम ढवण :-**

माझे पण बंद आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रॉटोकॉलने घ्या विषय संपला. पक्षप्रमुख बोलतात तुमच्याकडे आपली चर्चा तशीच झाली होती.

**नगरसचिव :-**

आपण दोन्ही पक्षाचे करुन ठराव बहुमताने मंजूर झाला असे घोषित करु.

**जुबेर इनामदार :-**

उपस्थिती सर्वांची होती आता तुम्ही प्रोटोकॉलने निर्णय घ्या विषय संपला.

**मा. महापौर :-**

ठिक आहे चालेल.

**प्रविण पाटील :-**

जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने करा.

**नगरसचिव :-**

प्रथम दुसरा ठराव मतदानासाठी पुकारतो . याच्यावर विरोध कोणाचा एवढच फक्त घेणार आहोत. दुसरा ठराव सुचक श्री . जुबेर इनामदार, अनुमोदन श्रीम. सय्यद नुरजहाँ नझर हुसेन यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे आहे त्यांनी सांगा.

**जुबेर इनामदार :-**

काँग्रेस पक्ष.

**निलम ढवण :-**

शिवसेना पक्ष.

**प्रविण पाटील :-**

सचिव साहेब आता एकूण आताच्या वेळेला 76 सदस्य उपस्थित आहेत . त्यापैकी काँग्रेसचे किती सदस्य आहेत आणि शिवसेनेचे किती सदस्य आहेत. आणि भारतीय जनता पार्टीचे किती सदस्य आहेत.

**नगरसचिव :-**

भारतीय जनता पार्टीचे 50 सदस्य उपस्थित आहेत, शिवसेनेचे 10 सदस्य उपस्थित आहेत आणि काँग्रेस पक्षाचे 09 सदस्य उपस्थित आहेत.

**निलम ढवण :-**

हया क्षणाची उपस्थिती आहे.

**निलम ढवण :-**

हया क्षणाची आमचे व्हिडीओच चालू नाहीत. बरेच लोकांचे म्यूट पण झाले आहेत.

**नगरसचिव :-**

जे जॉईंट आहेत त्याच्याबद्दल सांगतो.

**निलम ढवण :-**

जे जॉईंट आहेत हे तुम्हाला कसे कळणार ? माझा ही व्हिडीओ बंद आहे . मी बोलते आहे म्हणून तुम्हाला कळते. बाकीच्या नगरसेवकांना बोलायला मिळालेल नाही . त्याच्यामुळे ते आहेत की नाही ते कसे कळणार तुम्हाला.

**नगरसचिव :-**

आपण पहिले मतदानाची प्रकिया पूर्ण करुन घेऊ . नंतर आपण हया विषयावर बोलूया. श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने शिवसेना आणि काँग्रेस पक्ष यांनी मान्यता दिलेली आहे. हया ठरावाच्या विरोधात ज्यांना बोलायचं असेल त्यांनी मतदान द्यावं.

**मा. उपमा. महापौर :-**

सचिव महोदय शिवसेना, काँग्रेस और बी.जी.पी के तरफ से आपने कितना बताया|

**नगरसचिव :-**

बी.जी.पी चे 50 लोक उपस्थित आहेत, शिवसेनेचे 10 आहेत, काँग्रेसचे 09 आहेत.

**मा. उपमा. महापौर :-**

ज्या लोकांचे व्हिडीओ दिसत नाही तसे त्यांना क्लेरीफिकेशन द्या.

**निलम ढवण :-**

मॅडम, काही सन्मा. नगरसेवक भले ते बी.जे.पी चे असु दे, शिवसेनेचे असु दे, काँग्रेसचे असु दे. त्यांना बोलायला संधी न मिळाल्यामुळे ते तिथून उठलेले आहेत त्यांची नाराजगी आहे.

**मा. उपमहापौर :-**

मतदान प्रक्रिया पूर्ण करावी.

**नगरसचिव :-**

सूचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदक श्री. राकेश शाह यांच्या बाजूने ज्यांना मतदान करायचे आहे त्या गटनेत्यांनी आपली भूमिका मांडावी.

**मा. उपमहापौर :-**

मी भारतीय जनता पार्टीचा गटनेता धृवकिशोर पाटीलजीने जो ठराव रखा है भारतीय जनती पार्टी के अधिकृत सभी नगरसेवक उनकी तरफ से हमी देता हूँ|

**नगरसचिव :-**

सुचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदक श्री. राकेश शाह यांनी मांडलेल्या ठरावाच्या विरोधात ज्यांना मतदान करायचे त्यांच्या गटनेत्यांनी कृपया तुमची भूमिका मांडावी.

**निलम ढवण :-**

मी शिवसेना पक्षाच्या वतीने बोलते आम्ही दिलेल्या काही चांगल्या सुचना न घेतल्यामुळे आम्ही हया ठरावाच्या विरोधात आहोत . शिवसेना पक्षाचे सर्व नगरसेवक हया ठरावाच्या विरोधात आहेत.

**जुबेर इनामदार :-**

**काँग्रेस पक्षाचा हया ठरावाला विरोध आहे.**

**मा. महापौर :-**

**सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाला बहुमत मिळाल्यामुळे हा ठराव मंजूर करण्यात येत आहे.**

**प्रकरण क्र.** 10, 11 व 14 **:-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१९-२० चे सुधारित व सन २०२०-२१ चे मूळ अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेबाबत. ("अ" + "क" + "महिला व बालकल्याण" + "अंध व अपंग" + "JNNURM" + "P" + "वृक्षप्राधिकरण" + "शिक्षण") (मा. स्थायी समिती सभा दि. २०/०३/२०२० रोजीचे शिफारस केलले प्रकरण क्र. १६१, ठराव क्र. १३४)**

**ठराव क्र.** 03 :-

मा. स्थायी समितीने मंजुर केलेल्या सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक मा. स्थायी समितीने मंजुरीस शिफारस केलेली आहे.

- यावर्षी Covid-१९ कोरोना विषाणूजन्य आपत्कालीन स्थिती निर्माण झाल्यामुळे लॉकडाऊनच्या कार्यकालात शहरातील दैनंदिन कामकाज, औद्योगिक, लघु उद्योग, व्यवसाय धंदे ठप्प झाल्याने नागरीकांना, व्यवसायिकांना तसेच हातावर पोट असलेल्या कामगारांना बऱ्याच आर्थिक संकटांना सामोरे जावे लागत आहे. गोरगरीब व सर्वसामान्य नागरीकांची आर्थिक परिस्थीती अगदी बेताची झालेली असल्याने थोडा आर्थिक हातभार देण्याकरीता महापालिकेतर्फे आकारण्यात येणाऱ्या सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील निवासी व बिगर निवासी मालमत्ता कराचा भरणा दि.३१ ऑक्टोबर-२०२० पर्यंत केल्यास निवासी व बिगर निवासी मालमत्ता कराच्या घरपट्टीत ५०% रिबेट नागरीकांना व व्यापारी वर्गास देण्यात यावा, त्यानंतर रिबेट देता येणार नाही.
- महापालिकेची मालमत्ता कराची सन २०१९-२० या आर्थिक वर्षापर्यंतची थकबाकीची वसुली होणेकरीता मालमत्ता धारकांनी थकबाकीचा एकत्रित भरणा दि.३१ ऑक्टोबर-२०२० पर्यंत केल्यास त्यांच्या व्याजामध्ये संपूर्ण माफी देण्यात यावी.
- महापालिका अधिकारी व कर्मचारी यांना मोबाईल मध्ये वापरणेकामी देण्यात आलेले सिमकार्ड व त्याकरीता त्यांना देण्यात येणारी ठराविक मासिक रक्कम बंद करुन दि.०१ सप्टेंबर २०२० पासून सदर सुविधा बंद करुन महापालिकेने बिलाची रक्कम अदा करु नये. तसेच अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांच्या मोबाईल करीता सद्यस्थितीत असलेला भ्रमणध्वनी क्रमांक स्वत: नावावर करुन स्वत: देयक अदा करावे.
- अधिकारी व कर्मचारी यांना सद्यस्थितीत देण्यात आलेले भाड्याचे वाहन किंवा स्वत:चे वाहन वापरुन देण्यात येणारी प्रतिपुर्तीची रक्कम शासनाच्या धोरणानूसार देण्यात आलेली नसल्याने ही सुविधा बंद करण्यात यावी. शासन धोरणानुसार महापालिकेचे आयुक्त, अतिरीक्त आयुक्त, प्रभाग अधिकारी / सहा. आयुक्त इ. अधिकारी वगळता वाहनांसाठी पात्र असलेल्या अधिकारी /कर्मचारी यांची यादी करुन मान्यतेस्तव तसेच वाहन प्रतिपूर्ती रक्कम निश्चित करणेकामी महापालिकेची वाहने व त्याचा वापर याबाबतची माहिती देखील मा. स्थायी समिती पुढे सादर करुन मान्यता घेण्यात यावी. विशेष बाब म्हणून महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी व पदाधिकारी यांना वाहन उपलब्ध करुन द्यावयाचे असल्यास तसा प्रस्ताव मा. स्थायी समितीमध्ये सादर करुन निर्णय घ्यावा.
- महापालिकेच्या विविध कार्यालयाच्या ठिकाणी महापालिकेमार्फत वृत्तपत्र, मासिके देण्यात येतात परंतु यापुढे महापालिकेमार्फत केवळ एकाच ठिकाणी वृत्तपत्रे देण्यात यावीत.
- शासन अनुदान/शासन निधी मधून करावयाच्या कामांना शासनाने लेखी मान्यता दिल्यानंतरच व निधी उपलब्ध झाल्यानंतरच मान्यता दिलेल्या रक्कमेएवढ्या कामांच्या खर्चाबाबत सक्षम प्राधिकारी / प्राधिकरण यांच्याकडुन प्रशासकीय व आर्थिक मान्यता घेवून निविदा प्रक्रिया करण्यात यावी.
- मिरा भाईंदर महापालिकेच्या विविध आरक्षणाच्या जागेमध्ये खाजगी कामातुन विकसीत करण्याच्या दृष्टीने महानगरपालिका अधिनियम कलम ७९ नुसार सदर जागेचे हस्तांतर व विकसीत करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून अंतिम मान्यतेसाठी मा. महासभेपुढे प्रस्ताव सादर करावा.
- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन केंद्रांच्या इमारती व त्यांच्या जागा यांची रेडी रेकनर प्रमाणे रक्कम ठरवून सदर विभागाकडुन महानगरपालिकेकडे हस्तांतर करुन घेण्यात यावी.

➢ मंजुर होवून कार्यादेश दिलेल्या ज्या कामांच्या जागा विवादित आहेत किंवा ताब्यात आल्या नाहीत अशी सर्व विकास कामे रद्द करावीत.

➢ मोकळ्या जागेवरील कर (OLT) लॉकडाऊन कालावधीत शासनातर्फे इमारत बांधकामाचे कार्य बंद करण्यात आले असल्याने ठराविक कालावधीत इमारती पुर्ण करता आल्या नसल्याने इमारत बांधकामावर आकारण्यात आलेला मोकळ्या जागेवरील (OLT) कराचा कालावधी इमारत बांधकाम सुरु करण्यापर्यंत वाढविण्यात यावा . तसेच इमारतीचा प्लान पास करतेवेळी बांधकाम व्यवसायिकांना डेव्हलपमेंट चार्ज एक रक्कमी भरावा लागत असल्याने सद्यस्थितीत मार्केट परिस्थीतीचा विचार करता व महापालिकेचे उत्पन्न वाढण्याच्या दृष्टीकोनातून डेव्हलपमेंट चार्ज हप्त्यामध्ये भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिल्यास बांधकाम व्यवसायिक महापालिकेत अधिक प्रमाणात इमारती बांधकामाचा प्लान मंजुरीकरीता येतील पर्यायी महापालिका निधीमध्ये वाढ होईल.

➢ महापालिकेचे सभागृह (हॉल), बाजार फी शुल्क व वसुली, तात्पुरते मार्केट मधील शुल्क, होर्डींग्ज, जाहिरात कर, मार्केट भुई भाडे, BOT भाडे व पार्किंग एरीया इ. महापालिकेने भाड्याने दिलेले आहेत . यापासुन महापालिकेस उत्पन्न प्राप्त होत आहे. परंतु लॉकडाऊन कालावधीमध्ये या सर्व सुविधा बंद केल्याने त्यांच्या उत्पन्नात घट झाली आहे. प्रशासनाने लॉकडाऊन कालावधीतील भाडे / शुल्क कमी करुन स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करुन मान्यता घ्यावी.

कोविड-१९ या आजाराच्या प्रादुर्भावामुळे महानगरपालिकेच्या उत्पन्न व खर्चात वाढ व घट येणार आहे , त्यामुळे सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकात सोबत जोडण्यात आलेल्या लेखाशिर्षनिहाय बाबी विचारात घेवून त्या त्या लेखाशिर्षातंर्गत उत्पन्नाच्या व खर्चाच्या आकड्यांमध्ये दुरुस्ती करुन घेण्यास सन २०१९-२० चे सुधारीत व सन २०२०-२१ चे रक्कम रु.२५ लक्ष इतक्या शिल्लकेचे मुळ अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम (१००) अन्वये तसेच सोबत जोडलेल्या बांधकाम व पाणीपुरवठा विभागातील विकास कामांच्या यादीस ही मा. महासभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

| **तपशिल** | **२०१९-२० (सुधारित अंदाज)** | **२०२०-२१ (मुळ अंदाज)** |
|---|---|---|
| एकुण जमा | 119277.15 | 184181.09 |
| एकुण खर्च | 118605.15 | 184156.09 |
| **अखेरची शिल्लक** | 672.00 | 25.00 |

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. राकेश शाह**

**सन 2020-21 या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात केलेल्या विविध लेखाशिर्षातुन करावयाच्या देखभाल व दुरुस्ती तसेच नविन कामांची खालील प्रमाणे अंदाजपत्रके बांधकाम व पाणी पुरवठा विभागाने तयार केली आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

**बांधकाम विभाग**

| | | |
|---|---|---|
| **1** | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध संस्थानी खोदलेले रस्ते , पावसाळ्यात पडणारे खड्डे वार्षिक मुदतीने दुरुस्ती करणे.** | **रु.35,00,00,000/-** |
| **2** | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे , नाले, फुटपाथ यावरील झाकणे वार्षिक मुदतीने बसविणे.** | **रु.2,00,00,000/-** |
| **3** | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालये वार्षिक मुदतीने साफसफाई, दुरुस्ती करणे.** | **रु.6,00,00,000/-** |
| **4** | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यावरील / सार्वजनिक जागेवरील माती, बांधकाम साहित्य इ .उचलुन वाहतुक करणे कामी वार्षिक मु दतीने आवश्यक मशिनरी व मनुष्यबळ भाड्याने घेणे.** | **रु.2,00,00,000/-** |
| **5** | **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे , नाले फुटपाथ वा र्षिक मुदतीने दुरुस्ती करणे, स्लॅब दुरुस्ती करणे.** | **रु.2,00,00,000/-** |
| **6** | **मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संक्रमण शिबीराची रेन्टल इमारती वार्षिक** | **रु.1,00,00,000/-** |

| | | | |
|---|---|---|---|
| | मुदतीने आवश्यक दुरुस्ती व देखभाल करणे. | | |
| 7 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यात येणाऱ्या विविध आरक्षणाच्या सार्वजनिक जागांना कुंपणभिंती बांधणे (वार्षिक मुदत) | | रु.2,00,00,000/- |
| 8 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खालील सार्वजनिक मालमत्ताची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती कामे करणे. | | रु. 5,00,00,000/- |
| | उद्याने / मैदाने | रु.50,00,000/- | |
| | स्मशानभुमी, दफनभुमी | रु.25,00,000/- | |
| | मनपा मुख्य कार्यालय इमारत | रु.50,00,000/- | |
| | मनपा प्रभाग कार्यालये | रु.25,00,000/- | |
| | शाळा इमारती, बालवाडी, अंगणवाडी | रु.50,00,000/- | |
| | अग्निशमन केंद्र | रु.50,00,000/- | |
| | स्काय वॉक , पुतळे, सभागृह, समाजमंदिरे, विरंगुळा केंद्र, स्टेज, वाचनालय, अभ्यासिका व इतर सार्वजनिक इमारती | रु.50,00,000/- | |
| | बॅस डेपो, बस स्टॅण्ड | रु.25,00,000/- | |
| | आयुक्त / महापौर निवास | रु.50,00,000/- | |
| | विविध नामफलक, दिशादर्शक फलक | रु.25,00,000/- | |
| | आरोग्य केंद्र, रुग्णालय इ. | रु.25,00,000/- | |
| | तळी, विहीरी | रु.25,00,000/- | |
| | दुभाजक, वाहतुक बेट | रु.25,00,000/- | |
| | सार्वजनिक इमारती गळती प्रतिबंधक कामे | रु.25,00,000/- | |
| 9 | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध महानगरपालिकेचे स्ट्रीट लाईट पोल एल.ई.डी. ने बदलणे. | | रु.1,35,57,500/- |
| 10 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते , फुटपाथ ठिकाणी लेन मार्कींग , झेब्रा कॉसिंग , स्टॉप लाईन , थर्मोप्लास्टीक पेंट , रंगकाम इ . कामे वार्षिक मुदतीने करणे | | रु.1,00,00,000/- |
| 11 | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील प्रमुख खाड्या मधील गाळ काढणे , कांदळवन काढणे , खाड्याची खोली व रुंदी वाढविणे खाड्यामधील अतिक्रमण काढून खाड्यांची सफाई करणे. | | रु.35,00,00,000/- |
| 12 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सर्व वातानुकुलित यंत्रे वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | | रु.50,00,000/- |
| 13 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सर्व उद्वाहने वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | | रु.1,00,00,000/- |
| 14 | सर्वधर्मीय उत्सव अंतर्गत विविध व्यवस्था करणे.<br>(मे. धारावी डेकोरेटर्स यांचे मंजुर दराने) | | रु.1,50,00,000/- |
| 15 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे सर्व सिग्नल, ब्लीकर वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | | रु.50,00,000/- |
| 16 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या स्मशानभुमीतील शवदाहीन्या , चिमनी एअर एक्झॉस्ट सीस्टीम यांची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | | रु.75,00,000/- |
| 17 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील शितपेट्या यांची वार्षिक मुदतीने | | रु.15,00,000/- |

| | | |
|---|---|---|
| | देखभाल व दुरुस्ती करणे. | |
| 18 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विविध ठिकाणी असलेल्या जनरेटरची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे | रु.25,00,000/- |
| 19 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या झोपडपट्टी व चेणा काजुपाडा भागातील स्ट्रीट लाईट ची तसेच मनपाचे विविध हायमास्ट , डेकोरेटीव पोल, सोलर दिव्यांची वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.2,50,00,000/- |
| 20 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे सर्व वॉटर कुलर, पाणी शुध्दीकरण यंत्रणा वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.15,00,000/- |
| 21 | सर्वधर्मीय उत्सव अंतर्गत विविध व्यवस्था करणे. (पंचवार्षिक खर्च) | रु15,00,00,000/- |
| 22 | मनपा मुख्य कार्यालय इमारत पाचवा मजला बांधणे. | रु.3,46,04,393/- |
| 23 | मिरारोड (पूर्व) शितलनगर परिसरातील पावसाळी पाण्याचा निचरा होणेसाठी शांती प्लाझा (बँक ऑफ बडोदा ) ते अय्यपा मंदीरा पर्यंत नविन आर .सी.सी. नाला बांधणे. | रु.3,88,95,000/- |
| 24 | मिरारोड भाईंदर स्टेशन दरम्या न भाईंदर रेल्वे फाटक क्र .35 येथील पादचारी भुयारी मार्ग (Subway) गळती प्रतिबंधक उपाययोजना व दुरूस्ती कामे करण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडे रक्कम जमा करणे. | रु.61,26,188/- |
| 25 | मिरारोड (पूर्व) त्रिवेणी महापौर बंगल्याची दुरूस्ती व सुशोभिकरण करणे. | रु.79,41,450/- |
| 26 | मिरा-भाईंदर महानगरपालिकेची मुख्य कार्यालय , प्रभाग कार्यालय इतर रेन्टल हाऊसिंग, संक्रमण शिबीरे, सबवे, उड्डाणपुल पाण्याच्या टाक्या , स्काय वॉक, सार्व.सभागृह, वाचनालय, आयुक्त/महापौर निवास, अभ्यासिका विरंगुळा केंद्र , समाजमंदिरे, बालवाड्या, शाळा, अंगणवाड्या, चौपाट्या, आरोग्य केंद्र, हॉस्पीटल, स्मशानभुमी, दफन भुमी इ. मैदाने, उद्याने, तलाव, फुट ओव्हर ब्रीज, सबवे वाहतुक बेट, मधील सर्व विद्युत दुरुस्ती,<br>मिटर पंप दुरुस्ती इ. देखभाल व दुरुस्तीचे काम वार्षिक मुदतीने करणे. | रु.2,00,00,000/- |
| 27 | मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्व.इमारतीमधील तसेच सभागृह, स्थायी समिती सभागृह माईक सिस्टीम , EPBX, इंटरकॉम UPS System वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.25,00,000/- |
| 28 | मनपा क्षेत्रात आरक्षण क्र.246, 365 येथे विरंगुळा केंद्र बांधणे. | रु.1,00,00,000/- |
| 29 | मिरारोड (पुर्व) मेजर कौस्तुभ राणे जॉगर्स पार्क विकसित करणे. | रु.2,00,00,000/- |
| 30 | मनपा क्षेत्रातील स्मशानभूमीतील शवदाहीनीसाठी गॅस सिलेंडरचा पूरवठा करणे. | रु.50,00,000/- |
| 31 | भाईंदर (प.) प्रभाग क्र. 1 मधील गणेश देवल नगर नितिन चाळ ते सिमला गल्ली शौचालय पर्यंत नाला बांधणे. | रु. 58,75,500/- |
| 32 | भाईंदर (प.) प्रभाग क्र. 1 मधील गणेश देवल एस .टी.पी प्लान्ट ते गणेश आनंद नगर सार्व शौचालयपर्यंत सी.सी. रस्ता तयार करणे. | रु. 2,36,84,500/- |
| 33 | भाईंदर (प.) प्रभाग क्र. 1 मधील जयबजरंग नगर येथील रविंद्र माछी ते स्वामी नारायण मंदिर नाला पर्यंत गटर बांधणे. | रु. 48,09,000/- |
| 34 | भाईंदर (प.) प्रभाग क्र. 1 मधील गणेश देवल नगर येथील सार्व . शौचालयाची पुर्न:बांधणी करणे. | रु.50,00,000/- |
| 35 | भाईंदर (प.) प्रभाग क्र.1 मधील जयअंबे नगर नं.1 येथील दिलिप सलुन ते सुल्तान खान यांचे घरापर्यंत गटर बांधणे. | रु.24,95,000/- |

| | | |
|---|---|---|
| 36 | मनपा क्षेत्रात महीला भवन बांधणे. | रु.3,00,00,000/- |
| 37 | घोडबंदर गाव रोड बस डेपो - 60 फिट रोड गटार बांधणे. | रु.50,00,000/- |
| 38 | भाईंदर (पूर्व) रेल्वे फाटक ते गोडदेव नाका पुर्न:पृष्ठीकरण करणे. | रु.1,00,00,000/- |

पाणीपुरवठा विभाग

- पाणी पुरवठा विभागातील मलनि:सारण केंद्र देखभाल दुरुस्ती

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलनि :सारण केंद्रांची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | रु.902.08 लक्ष |
| 2 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जेसल येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन स्टँड -बाय पंपाचा पुरवठा , उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे . तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरिंग आणि VFD आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे | रु.36.00 लक्ष |
| 3 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सेक्टर नं .3 मिरारोड, येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन + स्टँड-बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे . तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरिंग आणि VFD आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे | रु.62.00 लक्ष |
| 4 | मिरा भाईंदर महानगरपालिके च्या सेक्टर नं .8 मिरारोड व सृष्टी , मिरारोड येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन स्टँड-बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे . तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरिंग आणि VFD आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे | रु.54.00 लक्ष |
| 5 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सृष्टी , मिरारोड येथील ड्रेनेज पंपगृहात नवीन स्टँड-बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे. | रु.16.00 लक्ष |

- सिव्हर सकर मशिन खरेदी

| | | |
|---|---|---|
| 6 | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मलवाहिन्यामधील चोकअप काढण्यासाठी आवश्य क असणारी सुपरसकर मशिन तसेच अनुषंगीक यंत्रसामुग्री / उपकरणे खरेदी करणेबाबत तसेच एक वर्षासाठी मशिन चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे . तसेच केंद्रीकृत रिमोट मॉनिटरिंग आणि VFD आधारित ऑटोमेशन सिस्टम लावणे | रु.150.00 लक्ष |

- भुयारी गटार योजना

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 7 | मिरा भाईंदर महानगरपालिका भुयारी गटार योजनेअंतर्गत शिल्लक असलेले रहदारीच्या ठिकाणचे गॅपवर्कचे काम मॅक्रोटनलिंग पद्धतीने (ट्रेचलेस पद्धतीने) पूर्ण करणे. | रु.1050.36 लक्ष |

- पंपिंग स्टेशन किरकोळ खरेदी / दुरुस्ती

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 8 | ठाणे येथील साकेत व कापुरबावडी व भाईंदर (पुर्व) येथील फाटक पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | रु.167.89 लक्ष |
| 9 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या जनता नगर येथील पंप गृहात नवीन | रु.15.00 लक्ष |

| | | |
|---|---|---|
| | स्टँड-बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे. | |
| 10 | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाली येथील पंप गृहात नवीन स्टँड -बाय पंपाचा पुरवठा, उभारणी, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे. | रु.24.00 लक्ष |

- वितरण व्यवस्था किरकोळ खरेदी दुरुस्ती

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 11 | मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा योजनेअंतर्गत साकेत ते हटकेश पर्यंतच्या 1590 / 1350 मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.112.76 लक्ष |
| 12 | पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजुर कर्मचारी पुरवठा करणे. | रु.300.00 लक्ष |

- नविन जलवाहिनी टाकणे

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 13 | भाईंदर (प) उत्तन येथील उत्तन नाका ते रमा हॉटेल पाली पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.96.87 लक्ष |
| 14 | मिरारोड (पूर्व) प्लेझट पार्क जंक्शन ते एम .आय.डी.सी. जलकुंभापर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.140.00 लक्ष |
| 15 | एम.आय.डी.सी. जलकुंभ येथे राष्ट्रीय महामार्ग क्र.08 रस्ता छेदून एच.डी.डी पध्दतीने पाईप टाकणे. | रु.125.00 लक्ष |
| 16 | मिरारोड (पुर्व) बालाजी हॉटेल ते सृष्टी जंक्शन पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.38.50 लक्ष |
| 17 | मिरारोड (पुर्व) डेल्टा जंक्शन ते दालमिया कॉलेज जंक्शन पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.45.00 लक्ष |
| 18 | मिरारोड (पुर्व) पेणकरपाडा येथे दरवेश प्रकल्प ते ताराचंद कंपनी उघाडीपर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.34.00 लक्ष |
| 19 | मिरारोड (पुर्व) कनाकिया येथील मेरी गोल्ड 1,2 पासून युनिक हाईट पुनम गार्डन पर्यंत जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु.53.50 लक्ष |
| 20 | कॉंक्रिट रस्त्यामध्ये बाधित होणाऱ्या जलवाहिन्या स्थलांतरित करणे . (सन 2020-21) | रु.400.00 लक्ष |

- पाणी पुरवठा विभागातील खालील विविध कामे

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | सुधारीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | शांती पार्क मलनि :सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |
| 2 | सृष्टी मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे. | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |
| 3 | शांती नगर सेक्टर 3 मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे. | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |
| 4 | शांती नगर सेक्टर 8 मलनि:सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची मलनि:सारण केंद्राची देखभाल/दुरूस्ती करणे. | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | जेसल पार्क मलनि :सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची देखभाल/दुरूस्ती करणे. | रु.33.64 लक्ष | रु.68.00लक्ष |
| 6 | एम.एम.आर.डि.ए. कडून रेंटल हाऊसिंग स्किम अंतर्गत लोढा क्वा या इमारती मधील मलनि :सारण केंद्राच्या पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | रु.14.46 लक्ष | रु.23.00 लक्ष |
| 7 | पाणी पुरवठा विभागात वितरण व्यवस्था व देखभाल दुरुस्ती अंतर्गत मजुर कर्मचारी पुरवठा करणे | रु.160.00 लक्ष | रु.422.00 लक्ष |
| 8 | मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील विंधन विहिरींची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे | रु.13.95 लक्ष | रु.24.50 लक्ष |
| 9 | भुयारी गटार योजना | रु.49196.00 लक्ष | रु.51000.00लक्ष |
| 10 | साकेत ते हटकेश पर्यंतची फिडरमेन जलवाहिनीची देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.110.00 लक्ष | रु.150.00 लक्ष |
| 11 | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत 30 द.ल.लि. पाणी पुरवठयासाठी बांधण्यात आलेल्या ठाणे (कापुरबावडी) येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे | रु.49.38 लक्ष | रु.107.00 लक्ष |
| 12 | भाईंदर (पूर्व) फाटक येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे | रु.49.38 लक्ष | रु.82.30 लक्ष |
| 13 | साकेत, ठाणे येथील पंपिंग स्टेशनची वार्षिक देखभाल/दुरुस्ती करणे | रु.49.38 लक्ष | रु.82.30 लक्ष |

वरील सर्व कामांच्या अंदाजपत्रकांना व खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**सन 2020-21 चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा.महासभेचे अंदाज**

**खर्च बाजू** (रूपये लाखात)

| अ.क्र | लेखाशिर्ष | मा. स्थायी समिती अंदाज | मा.महासभेचे अंदाज |
|---|---|---|---|
| 1 | मालमत्ता कर पुन: मुल्यांकन करणे | 800.00 | 500.00 |
| 2 | पदाधिकारी/अधिकारी वाहन भत्ता | 135.00 | 100.00 |
| 3 | वाहन खाजगी गाडया भाडे | 125.00 | 205.00 |
| 4 | आरोग्य स्थायी आस्थापना | 4412.80 | 3500.00 |
| 5 | वॉर्ड साफसफाई | 12000.00 | 11000.00 |
| 6 | एकात्मिक डास निर्मुलन योजना | 1150.00 | 900.00 |
| 7 | कंत्राटी कर्मचाऱ्यांना Gratuity देणे | 100.00 | 10.00 |
| 8 | रुग्णालय अस्थायी/आस्थापना | 850.00 | 750.00 |
| 9 | रुग्णालयीन कपडे धुलाई साफ/सफाई | 400.00 | 200.00 |
| 10 | अतिक्रमण पोलिस बंदोबस्त सुरक्षा/रक्षक | 376.00 | 300.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | अतिक्रमण जेसीबी/गॅस कटर/ट्रक भाडयाने घेणे | 125.00 | 150.00 |
| 12 | बांधकाम- अस्थायी अस्थापना/सुरक्षा/ट्राफिक वॉर्डन | 600.00 | 400.00 |
| 13 | रस्ते देखभाल दुरुस्ती | 4000.00 | 3575.00 |
| 14 | सार्व.धर्मिय उत्सव मंडप/लाईट | 300.00 | 150.00 |
| 15 | सौर ऊर्जा निधी | 500.00 | 150.00 |
| 16 | कोविड-19 (शासन अनुदान) | 0.00 | 2040.00 |
| 17 | कोविड-19 (मनपा हिस्सा) | 600.00 | 880.00 |
| 18 | मनपा कर्मचारी सानुग्रह अनुदान | 350.00 | 175.00 |
| 19 | संगणक हार्डवेअर साहित्य खरेदी | 300.00 | 200.00 |
| 20 | डसबिन खरेदी | 50.00 | 5.00 |
| 21 | सक्शन पंप मशीन खरेदी भाडे | 70.00 | 50.00 |
| 22 | नवीन खेळणी/बेंचेस | 125.00 | 100.00 |
| 23 | आरक्षण क्र.264 मा.बाळासाहेब ठाकरे मैदान विकसित करणे | 50.00 | 10.00 |
| 24 | उद्यानात शिल्पकला पुतळे बसविणे | 50.00 | 10.00 |
| 25 | तरण तलाव बांधणे | 100.00 | 180.00 |
| 26 | घोडबंदर किल्ला सुशोभिकरण | 200.00 | 350.00 |
| 27 | घोडबंदर किल्ल्या शेजारी शिवसृष्टी प्रकल्प राबविणे | 300.00 | 500.00 |
| 28 | बुध्दविहार मेडीटेशन सेंटर | 150.00 | 300.00 |
| 29 | मनपा मार्फत होर्डींग्ज कॅन्टीलिवर उभारणे | 25.00 | 150.00 |
| 30 | आदिवासी पाडे विकसित करणे(शासन अनुदान) | 50.00 | 300.00 |
| 31 | आदिवासी पाडे विकसित करणे(मनपा हिस्सा) | 0.00 | 200.00 |
| 32 | मुलभूत सुविधा (मनपा हिस्सा) | 300.00 | 500.00 |
| 33 | मुख्यकार्यालय/प्रभाग कार्यालय फर्निचर | 300.00 | 150.00 |
| 34 | कम्युनिटी सेंटर बांधणे | 5.00 | 200.00 |
| 35 | आरक्षणे उद्याने विकसित करणे | 1200.00 | 1500.00 |
| 36 | कुंपणभिंत बांधकाम करणे | 75.00 | 150.00 |
| 37 | आरक्षण क्र.241 कम्युनिटी हॉल | 200.00 | 200.00 |
| 38 | कर पुस्तकी समायोजन | 0.00 | 5500.00 |
| 39 | पाणी बील | 6800.00 | 6400.00 |
| 40 | स्थायी आस्थापना (पाणी पुरवठा) | 378.91 | 300.00 |
| 41 | पंपिंग स्टेशन किरकोळ दुरुस्ती | 700.00 | 600.00 |
| 42 | टँकर भाडे | 250.00 | 150.00 |
| 43 | मलनि:सारण केंद्र (देखभाल, दुरुस्ती) | 830.00 | 750.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 44 | मलनि:सारण केंद्र विज देयक | 400.00 | 300.00 |
| 45 | मिटर कार्यशाळा | 350.00 | 300.00 |
| 46 | महिला बालकल्याण खर्च | 498.00 | 300.00 |
| 47 | वृक्षारोपण समाजिक वनिकरण | 100.00 | 50.00 |
| 48 | वृक्षारोपण मजूर पुरवठा | 150.00 | 100.00 |
| 49 | तिवराची लागवड | 50.00 | 1.00 |
| 50 | 50% शिक्षण वेतन | 1200.00 | 1100.00 |
| 51 | सानुग्रह अनुदान (शिक्षण विभाग) | 40.00 | 20.00 |
| 52 | शालेय विद्यार्थी गणवेश बॅच | 100.00 | 50.00 |
| 53 | शालेय विद्यार्थी दप्तरे/बुट/मोजे | 80.00 | 40.00 |
| 54 | संगणक प्रशिक्षण (शिक्षण) | 40.00 | 10.00 |
| 55 | माध्यमिक शिक्षण सुरु करणे | 50.00 | 5.00 |
| 56 | बालवाडी स्थायी आस्थापना | 159.17 | 110.00 |
| 57 | नवीन शाळा इमारत बांधणे | 800.00 | 500.00 |
| 58 | परिवहन "ब" अंदाजपत्रकाकडे हस्तांतरण | 2383.00 | 2000.00 |

## मिरा-भाईंदर महानगरपालिका

## सन 2020-21 चे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा.महासभेचे अंदाज

### जमा बाजू

(रूपये लाखात)

| अ.क्र | लेखाशिर्ष | मा. स्थायी समिती अंदाज | मा.महासभेचे अंदाज |
|---|---|---|---|
| 1 | मोकळया जागेवरील कर | 2200.00 | 1600.00 |
| 2 | स्थानिक संस्था कर | 200.00 | 100.00 |
| 3 | 1% मुद्रांक शुल्क | 6000.00 | 5900.00 |
| 4 | GST अनुदान | 22100.00 | 20367.00 |
| 5 | जाहिरात कर | 360.00 | 200.00 |
| 6 | होर्डींग्ज/फलक | 1000.00 | 500.00 |
| 7 | सशुल्क वाहन कर/पे ॲण्ड पार्क | 115.00 | 50.00 |
| 8 | बाजार फी | 800.00 | 400.00 |
| 9 | रस्ता नुकसान भरपाई | 6000.00 | 5000.00 |
| 10 | परवाने दाखले | 200.00 | 95.00 |
| 11 | किल्ला जिर्णोध्दार अनुदान | 300.00 | 500.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 12 | कोविड शासन अनुदान | 0.00 | 2040.00 |
| 13 | आदिवासी वस्ती विकास अनुदान | 0.00 | 300.00 |
| 14 | नविन रस्ते/गटारे शासन अनुदान | 5400.00 | 0.00 |
| 15 | मालमत्ता करावरील व्याज | 1100.00 | 920.00 |
| 16 | मालमत्ता हस्तांतरण पासून उत्पन्न | 0.00 | 10000.00 |
| 17 | अग्निशमन अंदाजपत्रकातून हस्तांतरण | 0.00 | 1000.00 |
| 18 | भुयारी गटार योजना कर्ज | 5000.00 | 4700.00 |

| ठरावाच्या बाजुने | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|
| भारतीय जनता पक्षाचे उपस्थित सदस्य | शिवसेना व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उपस्थित सदस्य | निरंक |

ठराव बहुमताने मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रविण पाटील :-**

सचिव साहेब आताच मतदान झालेल आहे पण मला सांगा 75 सदस्य दाखवतात तुम्ही आणि एकूण जी नगरसेवक संख्या काऊंट केली बी .जे.पी. 50, शिवसेना 10 आणि काँग्रेसचे 09 तर एकूण 69 होतात आणि 75 सदस्य नोंद दाखवते. अधिकारी किती आहे.

**नगरसचिव :-**

चार अधिकारी आहेत, स्टेनो आणि पत्रकार आहेत.

**प्रविण पाटील :-**

ते पाच पकडले का ओके.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, काही सदस्यांना बोलायचे आहे. त्यांची भूमिका बाकी राहिलेली आहे.

**मा. महापौर :-**

आजची मिटींग ही पहिलीच आहे. जी आपण ऑनलाईन व्ही.सी. च्या माध्यमातून घेत आहोत. हा आपला सर्वांचा पहिला अनुभव आहे आणि सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा ही संधी मला मिळाली. परंतु आज शहरामध्ये कोरोनाचा प्रार्दुभाव असल्यामुळे आपण सर्व जणं एकत्रित येऊ शकत नाही. एकत्रित बसू शकत नाही आणि आपल्या सभागृहाची रचना तशी आहे. असे धोरण होते की स्व. प्रमोद महाजन हॉलमध्ये ही सभा घ्यायची होती परंतु आपल्या सर्वांना माहित आहे की आपल्या सभागृहाचे सन्मा. नगरसेवक आमगावकरजी हे कैलासवासी झाले तसेच पत्रकार बंधू श्री. यतिन गोलतकर ते सुध्दा कैलासवासी झाले. त्यामुळे ती सभा रद्द करुन पुढे ढकलली आणि ती सभा आज ह्या ठिकाणी घेतलेली आहे . परंतु अतिशय भावनिक सहकार्य आपल्या सर्वांनी ह्या ठिकाणी केलेला आहे. त्याकरिता मी आपण सर्वांना धन्यवाद देते. निलम ताईने जो मुद्दा उपस्थित केला होता सभेच्या वेळेला की आपण सभागृहाच्या सदस्यांना श्रध्दांजली दिली नाही तर ती श्रध्दांजली आणि आपल्या मिरा भाईंदर शहराचे बहुसंख्य कर्मचारी यांचे सुध्दा निधन झाले आहे तसेच नागरिक ह्या शहरामध्ये

राहतात. परंतु कोरोनाचा लढा देत असताना त्यांचे निधन झाले आहे . ह्या सर्वांचा शोकप्रस्ताव आता आपले सन्मा. नगरसेवक प्रशांत दळवी हे मांडत आहेत.

प्रशांत दळवी :-

कोरोनाचा प्रार्दुभाव जेव्हापासून झाला तेव्हापासून आजपर्यंत ह्याठिकाणी आपली एक ही महासभा होऊ शकली नाही आणि त्या दरम्यानच्या काळामध्ये हा कोरोनाच्या वाढत्या प्रार्दुभावामुळे एक ही सभा घेतलेली नाही. पहिली महासभा आपल्या माध्यमातून होत आहे आणि मला अत्यंत दु:खद अंतकरणाने हा शोकप्रस्ताव मांडू इच्छितो , माझे मित्र सहकारी , नगरसेवक, माजी स्थायी समितीचे सभापती पद भुषवले होते शिवसेनेचे विद्यमान गटनेते होते असे प्रिय मनमिळावू हरिश्चंद्र आमगावकर यां चे ह्या कोरोनामुळे निधन झालं तसेच सामना वृत्तपत्राचे वार्ताहार आदरणीय कैलासवासी नितीनजी गोलतकर यांचाही या कोरोनाच्या प्रार्दुभावामुळे निधन झाले . त्याचबरोबर महानगरपालिकेचे कर्मचारी वर्ग तसेच हॉस्पीटलमधले डॉक्टर , नर्स आणि ह्या मिरा भाईंदर शहरामधली प्रशासनाम धले कर्मचारी वर्ग , अधिकारी तसेच ह्या मिरा भाईंदर शहरामधील आपले प्रशासनाचे अनिल पवार यांनी आपले ट्राफीक चे पी .आय मध्ये आहेत. आदरणीय अनिल पवार साहेब यांचे ही ह्या कोरोनाच्या प्रार्दुभावामध्ये दु :खद निधन झालेले आहे आणि त्याच बरोबर ह्या मिरा भाईंदर शहरामधील मी अत्यंत दु:ख अंतकरणाने सांगेल की कालपर्यंतचा आकडा 328 ह्या कोरोनाच्या प्रार्दुभावामध्ये त्यांचे निष्पाप बळी गेलेले आहेत आणि मी ह्या सर्व नागरिकांना बंधुभगिनींनी भारतीय जनता पार्टी आणि तमाम मिरा भाईंदर शहरातील नागरिकांच्या वतीने आणि सभागृहाच्या वतीने हा शोकप्रस्ताव मांडलेला आहे. आणि त्यांना श्रध्दांजली अर्पीत करतो. ज्यांचे दु:खद निधन झाले त्यांच्या मृत आत्म्यास शांती लाभो तसेच हे दु :ख सहन करण्याची त्यांच्या कुटुंबीयांना ईश्वर शक्ती देवो मी त्यांना ह्या ठिकाणी श्रध्दांजली वाहतो. महापौर मॅडम आपण सगळ्यांनी उभे राहून श्रध्दांजली वाहूया.

दु:खवठा ठराव क्र. 04 :-

आपल्या सभागृहाचे सन्मा. नगरसेवक आमगावकरजी हे कैलासवासी झाले तसेच पत्रकार बंधू श्री. यतिन गोलतकर यांचे कोरोनाच्या प्रार्दुभावामुळे निधन झाले . त्याचबरोबर महानगरपालिकेचे कर्मचारी वर्ग तसेच हॉस्पीटलमधले डॉक्ट र, नर्स आणि ह्या मिरा भाईंदर शहरामधली प्रशासनामधले कर्मचारी वर्ग, अधिकारी तसेच ह्या मिरा भाईंदर शहरामधील आपले प्रशासनाचे अनिल पवार यांनी आपले ट्राफीक चे पी .आय मध्ये आहेत . आदरणीय अनिल पवार साहेब यांचे ही ह्या कोरोनाच्या प्रार्दुभावामध्ये दु:खद निधन झालेले आहे. त्यांचा शांकप्रस्ताव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. निलम ढवण अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

(सभा संपण्याची वेळ संध्या. 04.12 वाजता)

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)

नगरसचिव

मिरा भाईंदर महानगरपालिका